सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १७ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २८७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



!! जाहीर सूचना !!

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.





## महत्त्वाचे...

### सकल हिंदू समाजाच्या मोर्चावर नाशिकात दगडफेक

**नाशिक :** बांगला देशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ नाशिक येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चावर काही समाजकंटाकांकडून दगडफेक झाल्याने काही काळ वातावरण गंभीर होते. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. नाशिकमध्ये आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात व शांत आहे. दरम्यान महंत रामगिरी यांनी काही आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम समाजाच्या वतीने निदर्शने करण्यात आली आहेत. या घटनेवरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा तैनात करण्यात आली आहे.

# हरयाणात एक, जम्मू-काश्मिरात तीन टप्पे

## सणासुदींमुळे महाराष्ट्रातील निवडणुकीची घोषणा नाही


### आयोगाने केली विधानसभा निवडणुकांची घोषणा

### दोन्ही राज्यांत ४ ऑक्टोबरला मतमोजणी

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, १६ ऑगस्ट**

निवडणूक आयोगाने आज जम्मू-काश्मीर आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीची घोषणा केली. जम्मू-काश्मीरमध्ये १८, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांत तर, हरयाणात १ ऑक्टोबरला एकाच टप्प्यात निवडणूक होणार आहे. दोन्ही राज्यातील निवडणुकीची मतमोजणी ४ ऑक्टोबरला होणार आहे.

विज्ञान भवनात आयोजित पत्रपरिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी या दोन राज्यांमधील विधानसभा निवडणुकीची घोषणा केली. यावेळी निवडणूक आयुक्तद्वय ज्ञानेशकुमार आणि डॉ. सुखबीरसिंग संधू उपस्थित होते.



जम्मू-काश्मीर विधानसभेच्या ९० जागांपैकी पहिल्या टप्प्यातील २४ जागांसाठी १८ सप्टेंबरला मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीची अधिसूचना अमरनाथ यात्रा संपल्यानंतर २० सप्टेंबरला जारी केली जाणार असल्याचे राजीवकुमार यांनी सांगितले.


दुसऱ्या टप्प्यातील २६ जागांसाठी २५ सप्टेंबरला निवडणूक होणार असून, तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील ४० जागांसाठी १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. तिन्ही टप्प्यातील निवडणुकीची मतमोजणी ४ ऑक्टोबरला होणार आहे. ९० सदस्यीय हरयाणा विधानसभेसाठी एकाच टप्प्यात १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. हरयाणात २ कोटींवर मतदार २०,२६९ मतदान केंद्रांतून मताधिकार बजावणार आहेत. यात १ कोटी ५ लाख पुरुष मतदार तर, ९६ लाख महिला मतदार आहे. जम्मू- काश्मिरात ८७ लाख मतदार मताधिकार बजावणार आहेत.



विधानसभा निवडणुकीसाठी जम्मू-काश्मिरात मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करावे लागणार आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या काही भागात पूरपरिस्थिती असल्यामुळे तसेच गणेशोत्सव, सर्वपित्री अमावास्या, नवरात्र, दसरा आणि दिवाळी यासारख्या सणांमुळे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीची घोषणा करता आली नाही. योग्यवेळी महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकीची घोषणा केली जाईल, असे राजीवकुमार म्हणाले.

# बच्चू कडूंच्या प्रहारला 'बॅट', वंचितला 'गॅस सिलेंडर'

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, १६ ऑगस्ट**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर निवडणूक आयोगाने पक्ष चिन्हांमध्ये बदल केला आहे. आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाला 'बॅट' चिन्ह तर प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीला 'गॅस सिलेंडर' चिन्ह देण्यात आले आहे.

या निर्णयामुळे या पक्षांना यापुढे याच चिन्हावर आगामी विधानसभा निवडणूक लढवावी लागणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी बच्चू कडू यांच्या पक्षाकडे 'शिट्टी' हे चिन्ह होते. प्रहार पक्षाने यापूर्वी 'कपबशी' या चिन्हावर निवडणूक लढवली होती. आमदार बच्चू कडू यांनी निवडणूक आयोगाकडे अधिकृत चिन्हासाठी अर्ज केला होता. त्यावर त्यांना उत्तरादाखल 'बॅट' हे चिन्ह मिळाले आहे.

## एसएसएलव्हीचे अंतिम विकासात्मक उड्डाण यशस्वी

**श्रीहरिकोटा :** भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्रोने शुक्रवारी स्मॉल सॅटेलाईट लॉन्च व्हेईकल म्हणजेच एसएसएलव्हीच्या तिसऱ्या आणि अंतिम विकासात्मक उड्डाणाची यशस्वी चाचणी घेतली. विशेष म्हणजे, या उड्डाणातील पेलोड्चा वापर उपग्रह आधारित सर्वेलियन्स, नैसर्गिक संकट आणि पर्यावरणीय निगराणी तसेच ज्वालामुखीच्या हालचाली आदी संकटांची पूर्वकल्पना प्राप्त करण्यासाठी केला जाणार आहे.

'एलव्ही-डी३' असे या उड्डाणाचे नाव असून, आजच्या यशस्वी चाचणीमुळे उद्योगांना एसएसएलव्हीचा वापर करून त्यांच्या लहान उपग्रहांचे उड्डाण करण्याकरिता इस्रोची व्यावसायिक शाखा असलेल्या न्यू स्पेस इंडिया लि.सोबत सहकार्य करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# भ्रष्टाचाऱ्यांना भीती वाटायला हवी

## महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना फाशीच व्हावी

## स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याहून गरजले पंतप्रधान मोदी

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, १६ ऑगस्ट**

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली वाळवी आहे. याचा समूळ नायनाट करण्यासाठी आम्ही पावले उचलली असून, कायद्याच्या माध्यमातून भ्रष्टाचाऱ्यांच्या मनात जरब बसवण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. याशिवाय महिलांवरील अत्याचाराच्या दोषींना फाशीचीच शिक्षा व्हावी, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

गुरुवारी ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पर्वावर लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवल्यानंतर पंतप्रधानांनी देशवासीयांना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, आपल्या माता-भगिनींवर होत असलेल्या अत्याचारामुळे जनतेत संताप आहे. आम्हाला ते जाणवत आहे. महिलांवरील गुन्ह्यांचा त्वरित तपास करून दोषींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी. त्यांना फाशी झाली पाहिजे. त्यांच्या मनात भीती निर्माण करणे आवश्यक आहे.

६० वर्षांनंतर लागोपाठ तिसऱ्यांदा देशाची सेवा करण्याची संधी दिली. लोकांचे आशीर्वाद व्यर्थ जाणार नाहीत. प्रत्येकाची



सेवा, प्रत्येक कुटुंबाची सेवा, प्रत्येक क्षेत्राची सेवा करीत देशाला विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचवण्याचा संदेश मिळाला आहे. या लाल किल्ल्यावरून मी देशवासीयांना नमन करतो, असे पंतप्रधान म्हणाले.

### भारताची दिशा योग्य

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आपण प्रत्येक क्षेत्रात नवीन संधी निर्माण केल्या, आधारभूत सुविधांवर काम केले, गरजेनुसार काम केले तर, बदल दिसून येतील. आज दरडोई उत्पन्न दुप्पट झाले आहे, भारताची निर्यात वाढत आहे, परकीय चलनाचा साठा दुप्पट झाला आहे. भारताची दिशा योग्य आहे, वेग आहे, आपल्या स्वप्नात शक्ती आहे. आम्हाला आशा आणि शक्यता हवी आहे.

### सरकारला पत्र लिहून तुमच्या अडचणी सांगा

पंतप्रधान मोदी म्हणाले की, युवक, प्राध्यापकांना आवाहन करतो की, तुम्हाला येणाऱ्या छोट्या-छोट्या अडचणींबाबत सरकारला पत्र लिहा. यावरील उपयांबद्दल सांगा. कोणतेही कारण नसताना उभ्या राहिलेल्या या अडचणींविषयी सरकारला पत्राद्वारे सांगा. देशातील प्रत्येक सरकार संवेदनशील आहे. स्थानिक स्वराज्य संस्था असो, राज्य सरकार असो किंवा केंद्र सरकार तुम्ही लिहिलेल्या पत्राची दखल घेतली जाईल, याचा मला विश्वास आहे.

### 'एक देश एक निवडणुकी'साठी पुढे या

एक देश एक निवडणूक हे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र यावे, असेही पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. यावेळी नरेंद्र मोदी यांनी समान नागरी कायदा आणि अन्य महत्त्वाच्या मुद्यांवरही भर दिला. दरम्यान, महिलांवरील अत्याचाराच्या मुद्यावरून विरोधकांनी मोदी आणि भाजपावर हल्ला चढविला.

# आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत हिंसा घडल्यास सहा तासांत एफआयआर

## केंद्र सरकारच्या सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना


**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, १६ ऑगस्ट**

कोलकाता येथील महिला निवासी डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर केंद्र सरकारने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर पावले उचलण्यास सुरुवात केली. आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत अशा घटना झाल्यावर सहा तासांत एफआयआर नोंदवावा लागेल. एफआयआर दाखल करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असेल. यासाठी केंद्र सरकारने सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

केंद्र सरकारच्या या आदेशानुसार आरोग्य कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा हिंसाचार झाल्यास त्याची माहिती वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रमुखांनी तातडीने पोलिसांना देणे बंधनकारक असेल. आरोग्य मंत्रालयाच्या वतीने आरोग्य सेवा महासंचालकांनी जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, कर्तव्यावर असताना आरोग्य कर्मचाऱ्यांबाबत हिंसा घडल्यास त्याला संस्था जबाबदार असेल. याशिवाय सहा तासांच्या आत एफआयआर दाखल करावा लागणार आहे. तसे न झाल्यास वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रमुखावरही कारवाई होऊ शकते.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### मंद्रुप ग्रामीण रुग्णालयातील सर्वरोग तपासणी शिबिरात तब्बल ५३२ रुग्णांची तपासणी

**मंद्रुप, दि. १६ ऑगस्ट-**

मंद्रुपच्या ग्रामीण रुग्णालयात शुक्रवारी आठवडा बाजार असल्याने ग्रामीण रुग्णालय मंद्रुप, अश्विनी हॉस्पिटल कुंभारी व रोटरी क्लब उत्तर सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या सर्वरोग तपासणी व औषध वाटप शिबिरात ५३२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. प्रारंभी डॉ. जान्हवी माखिजा, डॉ. बी. जी. शितोळे, मंद्रुपचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक राठोड, हनुमंत कुंभार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. डॉ. अशोक राठोड यांनी आरोग्य शिबिराबद्दल माहिती देऊन महिला व बाळांना होणाऱ्या आजारांबाबत घ्यावयाची काळजी व म हात्मा फुले योजनेविषयी माहिती दिली. या शिबिरात बालरोग, कान, नाक, घसा तपासणी व औषध वाटप करण्यात आले. या शिबिरास डॉ. हर्षद दातार, डॉ. तन्मय पाटील, डॉ. शिवम राठी, डॉ. वैष्णवी भोसले, डॉ. स्वाती पट्टेम, डॉ. मानसी मालुसरे, डॉ. वनमाला गावडे उपस्थित होते. ७० गरोदर माता , ५२ रूग्णांची रक्त तपासणी, १८ रूग्णांची एक्स रे काढण्यात आली. डॉ. किरण गजकोष, डॉ. मिताली रेड्डी, डॉ. माणिक कदम, मेहमूद सुभेदार, वासंती लोणी, आसावरी सराफ आदींनी परिश्रम घेतले.



### केडगाव येथे केशर आंब्यांच्या रोपांचे वाटप

**करमाळा, दि. १६ ऑगस्ट-**

स्वातंत्र्यदिनानिमित्त केडगाव (ता. करमाळा) येथे गावातील तरूणांनी मिशन ग्रीन केडगाव उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना केशर आंब्यांच्या रोपांचे वाटप केले. वृक्षारोपण लक्ष्मण लोकरे, प्रशांत खोलासे, युवराज बोराडे यांच्या आर्थिक सहकार्यातून झाले. २८ मेपासून तरुणांनी एकत्र येऊन गावाच्या लोकसंख्येएवढी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करून या उपक्रमाची सुरुवात केली. आजपर्यंत या उपक्रमांतर्गत ५८३ वृक्षांची लागवड करण्यात आली असून यासाठी ७४ हजार रुपये खर्च लोकसहभागातून करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी वैभव बोराडे, शहाजी शिंदे, गणेश राऊत, सूर्यकांत केदार, डॉ. शहाजी कानगुडे, सूरज घनवट, प्रविण शिनगारे, आशिष बोराडे, उत्तम काळे, सौदा घाडगे, सचिन बोराडे, रवी लोकरे, लक्ष्मण लोकरे, प्रशांत खोलसे, युवराज बोराडे यांनी आर्थिक सहकार्य केले आहे.



### तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये सांगोला विद्यामंदिरला विजेतेपद

**सांगोला, दि. १६ ऑगस्ट-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज १९ वर्षे वयोगट मुलींच्या संघाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत अंतिम सामन्यात सिंहगड पब्लिक स्कूल, कमलापूर या संघास पराभूत करून प्रथम क्रमांक मिळविला. यशस्वी खेळाडू विद्यार्थ्यांचा संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. खेळाडूंना क्रीडा शिक्षक सुनील भोरे, प्रा. डी. के पाटील, प्रा. संतोष लवटे, नरेंद्र होनराव, सुभाष निंबाळकर, स्नेहल देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे सां. ता. शि. प्र. मंडळाचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद यांनी अभिनंदन केले.

### वक्तृत्व स्पर्धेत संस्कार खंडागळे प्रथम

**सांगोला, दि. १६ ऑगस्ट-**



स्व. आ. गणपतरावजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये संगेवाडी येथील संस्कार खंडागळे याने प्रथम क्रमांक पटकावला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या यशाबद्दल संस्कार खंडागळे याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### शिक्षक नीलकंठ लिंगे यांची स्वेच्छानिवृत्ती

**सांगोला, दि. १६ ऑगस्ट-**



शिक्षक नीलकंठ लिंगे यांनी २७ वर्षे प्रदीर्घ सेवेनंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यांनी गणित विषयाचे अध्यापन करीत असताना असंख्य गुणवंत विद्यार्थी घडविले. दर रविवारी जादा तास, प्रत्येक प्रकरणावर टेस्ट हे त्यांचे वैशिष्ट्य होते. शाळेत सांस्कृतिक विभाग, पालक, शिक्षक संघ, प्रसिध्दी विभाग यामध्ये त्यांचे योगदान होते. असंख्य गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली. जिल्हाध्यक्ष गणित मंडळ, जिल्हाध्यक्ष विज्ञान मंडळ, जिल्हा उपाध्यक्ष माध्यमिक शिक्षक संघ, अध्यक्ष रोटरी क्लब,आजीव सदस्य आपुलकी प्रतिष्ठान,उपाध्यक्ष साने गुरूजी कथामाला, सदस्य वारकरी सांप्रदाय मंडळ या विविध संघटनेत योगदान दिले. स्वेच्छानिवृत्ती नंतरचे आयुष्यात सामाजिक कार्य करत राहणार असे नीलकंठ लिंगे यांनी सांगितले.

# मोहोळमधील उपोषण तात्पुरते स्थगित

## अनगर अप्पर तहसील रद्द करण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतर निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १६ ऑगस्ट-**



अनगर येथे मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याच्याबाबत चालू असलेल्या आमरण उपोषणासह अन्य आंदोलनाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून मुंबई झालेल्या चर्चेमधून मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून ठोस आश्वासन मिळाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समितीचे सदस्य दीपक गायकवाड आणि उमेश पाटील यांनी दिली. यामुळे अनगर अप्पर तहसील कार्यालय मंजुरीमुळे मोहोळमध्ये जो तणाव निर्माण झाला होता. त्यातील वातावरण निवळले आहे.

गुरुवारी १५ ऑगस्ट रोजी सकाळी संघर्ष समितीच्या प्रमुख नेत्यांची बैठक बोलवण्यात आली होती. व्यापारी बंधूंनी बाजारपेठ बंद ठेवल्यामुळे आंदोलनाला बळ मिळाले होते. उपोषणकर्ते सहकारी जोपर्यंत अनगर येथील कार्यालय रद्द झाल्याचा आदेश येत नाही, तोपर्यंत उपोषण सोडायचे नाही असा त्यांचा निग्रह होता. मोहोळ तालुका बचाव संघर्ष समिती समितीचे सदस्य मनोहर डोंगरे, खा. धनंजय महाडीक, राजू खरे, उमेश पाटील, दीपक गायकवाड, विजयराज डोंगरे, संतोष पाटील, संजय क्षीरसागर, मानाजीबापू माने, चरणराज चवरे, बाळासाहेब गायकवाड आदींनी १४ ऑगस्ट रोजी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची भेट घेऊन वस्तुस्थिती कथन केली होती. त्यामध्ये संजय क्षीरसागर यांनी तालुक्याचा नकाशा दाखवत हे गाव नेमके कुठे आहे, याची माहिती दिली. याबाबत खा. धनंजय महाडिक यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. त्यानंतर संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय आणि योग्य ती चौकशी करूनच पुढे काय करायचे ते बघू कोणावरही अन्याय केला जाणार नाही, याची काळजी घेऊ असे ठोस आश्वासन मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी समितीला दिले. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी मोहोळमध्ये दुकाने उघडून व्यवहार पुन्हा सुरळीत झाले.

दरम्यान अनगर येथे मंजूर असलेले अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे या मागणीसाठी ४ ऑगस्टपासून धरणे आंदोलनासह अन्य आंदोलने मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने केली. ९ ऑगस्टपासून माजी नगरसेवक सत्यवान देशमुख, शिवरत्न गायकवाड, महेश देशमुख आणि संतोष सोलनकर या ४ युवकांनी आमरण उपोषण सुरू केले होते. दरम्यान गेल्या सोमवारी सकाळी तिरडी आंदोलन, रात्री शहरातून मशाल मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये दीड एक हजार नागरिकांनी सहभाग नोंदवला होता. वातावरण तणावग्रस्त बनल

### तर यापेक्षाही तीव्र आंदोलन

तालुका बचाव संघर्ष समितीच्या सर्व जेष्ठ नेत्यांच्या विनंतीचा म ान ठेऊन आणि मंत्रायलात या कार्यालयाची मान्यता रद्द करण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असल्याची माहिती मिळाल्यामुळे आम्ही आमचे आमरण उपोषण संस्थगित करीत आहोत. मात्र जर आमची या कार्यालयाच्या मुद्यावरून फसगत करण्याचा प्रयत्न झाला तर यापेक्षाही तीव्र आंदोलन करू. त्यानंतर कसल्याही परिस्थितीत माघार घेणार नाही. पाणीसुध्दा पिणार नाही. मोहोळकरांच्या स्वाभिमान जपण्यासाठी आमच्या प्राणांची बाजी लागली तरी बेहत्तर.

**-महेश देशमुख, जिल्हाप्रमुख, युवा सेना**

## श्रावणमास प्रवचनमाला - ९

# मानवी जीवनात अनुष्ठानाने अनुभूती प्राप्ती होत असते

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ ऑगस्ट-**

व्यवहारिक तथा पारमार्थिक पातळीवर अनुष्ठानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रपंचात विशिष्ट साध्यापर्यंत पोहोचताना त्यातील एकेक पाय इतर गोष्टींचा त्याग मागते. तद्वतच, परमार्थातही परमात्म्याशी अंतर्मुख होताना, लौकीकातील बाह्य जीवनाचा त्याग आपोआप होतो. नाथांचं साधना स्थळ शूलभंजन पर्वत येथे अनुष्ठान चालू आहे. अनुष्ठानाशिवाय विरक्ती येत नाही, हे सांगताना पूज्य डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले प्रवचनमालेच्या आज नवव्या सत्रात ब्रह्म हे शब्दाच्या पलिकडे असलेले तत्त्व आहे. जेथे ऐक्य असते तेथे शब्दाचा उच्चार नसतो. जे अद्वैत असते, ते शब्दाने व्यक्त करता येत नसते. आता एकनाथ या शब्दामधला जो एक आहे, तो शब्दाच्या पलिकडे गेलेला आहे, असे सांगतात.

गातीं एका ध्यातीं एका।
अंतरबाहीं पाहतीं एका।
अगुणां एक सगुणीं एका।
गुणातीत पाहातीं एका।
जनीं एका वनीं एका।
निरंजनी देखीं एका।
संत जना पढियें एका।
जनार्दनीं कडियें एका।।

मानवी जीवनात अनुष्ठानाने अनुभूतीची प्राप्ती होत असते. मानवी जीवनात अधिष्ठान असावं,अधिष्ठाना समोर अनुष्ठान असावं, अनुष्ठानात अनुसंधान असावं, अनुसंधानात अनुराग असावा, अनुरागातुन अनुभूतीची निर्मिती होत असते. शूलभंजन पर्वतावर झालेले अनुष्ठान आणि या अनुष्ठानातून आलेली अनुभूती म्हणजे हा अभंग आहे.

सगुण म्हणजे गुणासह आणि निर्गुण म्हणजे गुणरहीत या दोन्हींच्या पलिकडे अवस्था नाथबाबांची झालेली आहे. जनार्दन स्वामी नाथांना तीर्थयात्रेला जाण्याचा आग्रह करतात. नाथांकडून आतापर्यंतची झालेली साधना ही योग्य पध्दतीने झालेली होती. जनार्दन स्वामींना मनातून आनंद झाला. डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले तीर्थयात्रेविषयी बोलताना सांगतात, जोपर्यंत सगळे अवयव व्यवस्थित आहेत तोपर्यंत तीर्थयात्रा करावी. तीर्थयात्रेतून सुख मिळाले पाहिजे तसेच जीवनाचे सार्थक झाले पाहिजे या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तीर्थयात्रा पायी चालून करावी लागते. तीर्थस्थळी हरिकीर्तनाला जावे लागते. जनार्दन स्वामी व नाथांची आता तीर्थयात्रा सुरु झाली. त्यांचा पहिला मुक्काम चंद्रभट्टांच्या आश्रमात झाला.

या आश्रमात रोज 'चतु:श्लोकी' भागवत कथा सांगितली जात होती. चतु:श्लोकी भागवत म्हणजे चार श्लोकांचे भागवत पुराण. जनार्दन स्वाम ींना वाटले नाथाने चतु:श्लोकी भागवत कथेवर निरुपण करावे. पुढे त्यांच्यासोबत तीर्थयात्रेला चंद्रभट्टही निघाले. पंचवटीच्या काळाराम मंदिरात येथे नाथांनी पहिल्यांदा चतु:श्लोकी भागवतावर निरुपण केले. तिघांनी त्र्यंबकेश्वरला निवृत्ती नाथांचे दर्शन घेतल्यानंतर पुढील यात्रा नाथांनी एकटी करावी, असे जनार्दन स्वामी सांगतात. नाथांना वाईट वाटले. इकडे पैठणला नाथांचे आजोबा चक्रपाणी व आज्जी त्यांच्या आठवणीत दु:खात होते. पुराणिकांनी नाथांचा शोध घेण्यासाठी देवगडावर गेले. जनार्दन स्वामींनी सर्व हकीकत सांगितली. तीर्थयात्रा संपून पैठणला आल्यावर चक्रपाणी महाराजांना नाथांच्या भेटीचा फार आनंद झाला. पुराणिक जनार्दन स्वामींनी दिलेली दोन आज्ञापत्रे देतो. एक पत्र चक्रपाणी महाराजांना व दुसरे नाथांना दिले. त्या पत्रात नाथांनी गृहस्थाश्रम स्वीकारुन प्रपंच करावा असा उल्लेख होता.

# स्वामी समर्थ कारखान्याच्या पदरी पुन्हा निराशाच...!

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑगस्ट-**

राज्य सरकारने अक्कलकोटच्या भाजपाचे माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांच्या स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याला खेळत्या भाग भांडवलासाठी मार्जिन मनी लोनमधून पुन्हा वगळले. एकट्या कोल्हापूर जिल्ह्यातील ४ साखर कारखान्यांना सुमारे ६०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

राष्ट्रीय सहकार निगमकडून आर्थिक अडचणीत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य सरकारच्या थकहमीवर कर्ज देण्यात येते. या कारखान्याची निवड करण्यासाठी सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली आहे. या सामितीने याआधी १३ सहकारी साखर कारखान्यांची यादी तयार करून मंजुरी देण्यात आली होती. यामध्ये पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील कारखान्यांची नावे वगळून नव्याने शासन आदेश जरी करण्यात आला.

स्वामी समर्थ कारखान्याने एनसीडीसीकरिता रितसर अर्ज केलेला होता. सदर यादीत समावेश व्हावा याकरिता कारखान्याच्या पदाधिकाऱ्यानी भाजपाच्या वरिष्ठ मंत्री, लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन सकारात्मक चर्चादेखील झाली होती. नुकतेच सत्ताधाऱ्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेनेचे माजी खा. संजय मंडलिक यांच्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक सहकार साखर कारखाना (कागल) रुपये १५० कोटी, माजी राज्यमंत्री राजेंद्र पाटील येड्रावकर यांच्या शरद सहकारी साखर कारखाना (हातकणगले) रुपये २०२ कोटी, चंद्रदीप नरके यांचा कुंभी सहकारी साखर कारखाना (करवीर) रुपये १६४ कोटी तर भाजपाचे अमोल महाडिक यांच्या छत्रपती सहकारी साखर कारखाना (करवीर) १७६ कोटी रुपये देण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. मात्र स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचा रुपये ५० कोटीच्या प्रस्तावाला सर्व ती पूर्तता करूनदेखील अद्यापही मार्जिन मनी लोन प्रतिक्षेत आहे.

# उदयसिंह मोहिते-पाटील प्रशालेत स्मार्ट क्लास

**मंगळवेढा, दि. १६ ऑगस्ट**

उदयसिंह मोहिते-पाटील इंग्लिश मीडियम प्रशालेत स्वातंत्र्य दिनी स्मार्ट बोर्ड क्लासचे उद्घाटन विश्वस्त डॉ. नंदकुमार शिंदे, डॉ. पुष्पांजली शिंदे, महादेव शिंदे, प्राचार्य सुधीर पवार, डॉ. डी. जे. साळुंखे, लक्ष्मण नागणे, सोमनाथ इंगळे, संतोष कोळसे-पाटील व पालकांच्या उपस्थितीत झाले. तीन स्मार्ट क्लास रूम असणारी उद्यसिंह मोहिते-पाटील इंग्लिशमीडियम प्रशाला ही मंगळवेढ्यातील एकमेव प्रशाला आहे. प्राचार्य सुधीर पवार यांनी स्मार्ट बोर्डचे फायदे सांगितले. नीता थोरात आणि स्नेहल होनमाने यांनी स्मार्ट बोर्डचा डेमो सादर केला आणि त्याची कार्यप्रणाली समजावून सांगितली. प्रशालेने आयोजित केलेल्या उपक्रमाचे सर्व पालकांनी भरभरून कौतुक केले.



# अणदूरमध्ये महादेव मूर्तीची विटंबना; एका संशयिताला अटक

### पवित्र श्रावण महिन्यात घडलेल्या घटनेचे तीव्र पडसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १६ ऑगस्ट-**



ऐन हिंदूंच्या पवित्र श्रावण महिन्यात बुधवारी रात्री अज्ञातांनी येथील प्रसिद्ध धमुरे यांच्या डोंगरावरील महादेवाच्या मंदिरातील पिंडीची, नंदीची व जुन्या महादेवाच्या मूर्तीची तोडफोड करून विटंबना केल्याची घटना घडली असून या अत्यंत निषेधार्ह घटनेमुळे अणदूर व पंचक्रोशीतील तमाम हिंदू धर्मातील नागरिक महिलांनी संताप व्यक्त केला.

त्याच्या निषेधार्थ शुक्रवारी अणदूर, खुदावाडी येथे कडकडीत बंद पाळण्यात आला.पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका संशयितास अटक केली आहे. आजच्या अणदूर व खुदावाडी बंदला नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. जोपर्यंत संपूर्ण प्रकरणाचा तपास लागत नाही तो पर्यंत आंदोलन चालू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. २०० तरुणांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात निवेदन दिले. त्यामध्ये लवकरात लवकर या घटनेचा तपास लावावा व शनिवारी सकाळी १० वाजता हायवेवर रस्ता रोको करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. नीलकंटेश्वर मठाचे मठाधिपती श्री ष.ब्र.शिवयोगी शिवाचार्य महाराज यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. तर सर्वपक्षीय राजकीय व्यक्तींनी सकाळी १० वाजता अणदूर ग्रामपंचायतसमोर निषेध सभा घेतली. अणदूरमध्ये तणावपूर्ण शांतता आहे पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. घडलेल्या वाईट घटनेची पोलिसांकडून गंभीर दखल घेण्यात आली असून शुक्रवारी घटनास्थळी चोख बंदोबस्त ठेवून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. त्यासाठी डॉग स्कॉड, फिंगर प्रिंट तज्ज्ञ, सायबर तज्ज्ञ यांना बोलावून घेण्यात आले. डॉग स्कॉडच्या मदतीने एका ३४ वर्षीय संशयितास ताब्यात घेण्यात आले आहे. त्याची चौकशी चालू केली असून त्याच्यावर कलम २९८ बीएनएसनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक संजय जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांनी घटनास्थळी भेट दिली, डीवायएसपी निलेश देशमुख नळदुर्ग पोलीस ठाण्यात ठाण मांडून घटनेची चौकशी करीत आहेत तर त्यांना नळदुर्ग पोलीस ठाण्याचे नूतन सहायक पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे हे साहाय्य करीत आहे. तपास एपीआय अनंत कांगुणे हे करीत आहेत.

# कुस्ती स्पर्धेत पुरुषोत्तम कुलकर्णी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑगस्ट-**



महानगरपालिका अंतर्गत घेण्यात आलेल्या शालेय कुस्ती स्पर्धेत अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले ग्रुपचे पैलवान व न्यू हायस्कूल सलगरवाडी शाळेच्या वतीने कुस्ती खेळलेल्या पै. पुरुषोत्तम नरसिंह कुलकर्णी याने सलग दोन फेऱ्यामध्ये ज्ञानप्रबोधीनी हायस्कूलच्या दोन्ही पैलवानांना (४५ किलो आतील ग्रीको रोमन) १०:० गुणांनी चीतपट करून प्रथम क्रमांक मिळविला.

त्याला डबल उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले तसेच क्रीडा शिक्षक प्रकाश पवार, मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. पै.पुरुषोत्तम हा श्री क्षेत्र अक्कलकोटचे छोटू पैलवान यांचे नातू आहे. त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# देहाची आसक्ती सुटत नाही, तोपर्यंत जीवन हे प्रापंचिक असते : डॉ. जयवंत बोधले महाराज



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ ऑगस्ट-**

गुरुंची आज्ञा प्रमाण मानून गृहस्थाश्रम स्वीकारावा लागतो, असे पूज्य डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले आज प्रवचनम ालेच्या १० व्या सत्रात सांगतात.

## श्रावणमास प्रवचनमाला - १०

संतश्रेष्ठ शांतीब्रह्म एकनाथ महाराज तीर्थयात्रा संपून पैठणला आलेले आहेत. नाथबाबा सद्गुरु जनार्दन स्वामींच्या आज्ञेप्रमाणे नाथ महाराज गृहस्थाश्रम स्वीकारतात. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम या चार आश्रमांचे वर्णन भारतीय संस्कृतीने केलेले आहे. प्रत्येक आश्रमाची स्वतंत्र अशी तत्त्वे माणसाच्या कल्याणासाठी पूर्वसूरींनी आखून दिलेली आहेत. सर्व आश्रमांमध्ये गृहस्थाश्रम श्रेष्ठ समजला जातो. कारण, या आश्रमावर इतर सर्व आश्रम अवलंबून आहेत. जोपर्यंत या देहाची आसक्ती सुटत नाही. तोपर्यंत, मनुष्य जीवन हे प्रापंचिकच असते. गृहस्थाश्रमामध्ये प्रपंच चालवणे महत्त्वाचे मानले जाते. पैसा मिळवणे, साठविणे व त्याचा योग्य विनिमय करणे ही प्रक्रिया चालूच असते. उत्तम पध्दतीने केलेला प्रपंच मोक्ष मिळविण्याला कारणीभूत असते.

सद्गुरुंच्या मुखातून झालेली आज्ञा ही वेदासमान आहे, असे नाथांना वाटते. आता नाथांच्या विवाहाची तयारी करताना एका वेजापूर नावाच्या एका ब्राह्मणाची उपवर मुलगी होती. तो ब्राह्मण आपल्या मुलीला घेऊन पैठणला आला. नाथांचे आजोबा चक्रपाणी व आज्जी सरस्वती यांची भेट घेतली. मुलगी सुलक्षणी, नाकाडोळ्यांनी रुपस आणि चतूर पाहून चक्रपाणी आनंदीत झाले. भानुदास म हाराजांच्या कुळात आपली मुलगी जाणार असल्याने ब्राह्मणालाही आनंद झाला. सोपस्कार करुन नाथांचे गिरीजा यांच्याशी विवाह झाला. नाथ महाराज कुलीनता स्वरुप आहेत. त्यांच्याकडे तारुण्यता आहे. म्हणजेच, ते उत्साह मूर्ती आहेत. ते साधू-स्वभावाचे आहेत. साधूवृत्ती असलेले आहेत. तसेच, ते तपस्वी आहेत. ते विद्यावान आहेत. विद्या हे एक धन आहे. विद्याधनाची चोरी होत नाही; त्याची भावाभावात वाटणी होत नाही; म्हणून विद्याधन श्रेष्ठ आहे, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज मार्गदर्शन करतात. नाथांचा हा संसार नसून परमार्थच आहे. जिथे विवेक आणि शांती आहे. तिथे परमार्थ घडतो. एकनाथी भागवताम ध्ये स्वत: नाथांनी म्हटले आहे की, स्त्री आणि पुरुषांची विचारांची अनुकूता ज्यांच्याकडे आहे. त्यांचा प्रपंच उत्तम असतो. गिरीजाबाईंना सरस्वती आज्जी प्रपंचाचे धडे देतात. एके दिवशी सरस्वती आज्जीने प्राण सोडला. चक्रपाणी एकाकी राहू लागले. त्यांनीही आपला प्राण सोडला. आता मात्र नाथ हे एकटे राहिले. नाथांना आता गुरुशिवाय कोण नाही, असे वाटू लागले. आपण आता गोकुळाष्टमीचा उत्सव करु म्हणजे या उत्सवासाठी आपल्या सद्गुरुंना घरी बोलावणे सोयीचे होईल, असे नाथांना वाटले. सदरील प्रवचनमाला संत एकनाथ महाराजांच्या चरित्रातील विशिष्ट टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. नाथांच्या प्रापंचिक जीवनाची सुरुवात झाली असून त्यांच्या चरित्राचे हे निरुपण डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांच्या अमोघ वाणीने आज बार्शीतील घरोघरी संत नाथ महाराजांच्या चरित्राच्या कथेच्या गुजगोष्टी चालू आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नारायण राणेंना उच्च न्यायालयाची नोटीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.१६ ऑगस्ट:**

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघातील भाजपचे खासदार नारायण राणे यांना उच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे . बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून त्यांनी विजय मिळविला असल्याची तक्रार त्यांचे प्रतिस्पर्धी व ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. सारंग कोतवाल यांनी ही नोटीस बजावली असून १२ सप्टेंबर पर्यंत राणेंना व निवडणूक आयोगाला त्यावर आपले म्हणणे सादर करावयाचे आहे



राऊत यांनी ॲड.असीम सरोदे, ॲड. श्रीया आवले, ॲड. विनयकुमार खातू, ॲड. किशोर वरक यांच्या मार्फत ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेत नारायण राणे व त्यांच्या समर्थकांनी निवडणूक जिंकण्यासाठी बेकायदेशीर मार्गांचा वापर केल्याचा आरोप केला आहे. त्यासाठी त्यांना शासकीय यंत्रणेतील लोकांनी सहकार्य केल्याचा ही आरोप केला आहे. राणे यांनी मतदारांना धमकावून व पैसे वाटप करून फसव्या मार्गाने निवडणूक जिंकली आहे. याबाबत तक्रार दाखल करूनही त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे रत्नागिरी - सिंधुदुर्ग मतदार संघातील निवडणूक रद्द करून राणे यांना पुढील पाच वर्षे निवडणूक लढवण्यास बंदी घालण्याची मागणी राऊत यांनी केली आहे.

रत्नागिरी- सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचा जाहीर प्रचार ५ मे २०२४ रोजी संपला होता. त्यानंतरही राणे यांचे समर्थक व बीजेपी कार्यकर्ते डमी ईव्हीएम मशीनवर ''कमळ'' हे निवडणूक चिन्ह दाखवून प्रचार करत होते. तसेच काही ठिकाणी मतदारांना पैसे वाटत होते. याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार निवडणुकीच्या ४८ तासपूर्वी प्रचाराची कामे थांबवावी लागतात. राऊत यांनी उच्च न्यायालयाकडे सदर व्हिडिओच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे. तसेच रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा जागेसाठी नव्याने निवडणूक घेण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाला द्यावेत अशी मागणी केली आहे. शिवाय या याचिकेची सुनावणी होई पर्यंत राणेंवर संसदेत काम करण्यासाठी निर्बंध घालण्यात यावेत अशी म ागणी केली आहे. राणे यांचे पुत्र आमदार नितेश राणे यांनी १३ एप्रिल २०२४ रोजी घेतलेला जाहीर सभेत मतदारांना धमकावले. असा आरोपही केला आहे. ''भाजपच्या उमेदवाराला विशिष्ट भागातून आघाडी मिळाली नाही तर त्यांना निधी मिळणार नाही'' हा थेट मतदारांना धोका होता असंही ते म्हणाले आहेत. याबाबत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र त्यांच्या तक्रारीकडे निवडणूक आयोग लक्ष दिले नाही. त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या साधणार लाडक्या बहिणींशी संवाद

**तभा वृत्तसेवा । वशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ ऑगस्ट:**

महिला सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने घोषित केलेल्या 'लाडकी बहीण' योजनेचा ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झाला आहे. या योजनेबद्दल माता भगीनींच्या मनातील भावना जाणून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या रविवारी (दि .१८) राज्यातील लाडक्या बहिणींशी संवाद साधणार आहेत.



भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाने या उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्यासाठी पुढाकार घेत हा 'लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ' कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी शुक्रवारी दिली. त्या म्हणाल्या, अंधेरी पूर्व येथील महापालिकेच्या मैदानामध्ये सायंकाळी ५ वाजता होणा-या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुख्य उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाला १० हजार महिला उपस्थित रहाणार आहेत. कार्यक्रमाचे थेट प्रसारण सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून प्रत्येक जिल्ह्यातील दोन बहीणी फडणवीस यांच्याशी संवाद साधणार आहेत.
महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मनात धडकी भरली आहे.
म्हणूनच या ना त्या प्रकारे या योजनांमध्ये खोडा घालण्याचा हीन प्रयत्न करत आहेत .बारामतीच्या मोठ्या ताईंना दीड हजाराचे मोल कळणार नाही ,मात्र या योजनेमुळे राज्यातील माताभगिनी खूष असल्याचे टोला त्यांनी मारला.



## भाजपाचे माजी खा. शिशुपाल पटले यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ ऑगस्ट :**

भंडारा गोंदियाचे भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार शिशुपाल पटले यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत शुक्रवारी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे पुर्व विदर्भात काँग्रेस पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे ,असे प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी सांगितले. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांना तुमसुर मतदारसंघातून पक्षातर्फे उम ेदवारी दिली जाण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

टिळक भवन येथील प्रदेश कार्यालयात प्रवेश सोहळ्याचा कार्यक्रम झाला.यावेळी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, तुमसरचे माजी आमदार अनिल बावनकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना पटोले म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या गैरकाराविरोधात जनतेमध्ये प्रचंड संताप आहे. या सरकारच्या सत्ताकाळात शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, तरूण, व्यापारी, मध्यमवर्गीय असा एकही समाजघटक समाधानी नाही. प्रत्येक कामामध्ये ४०-५० टक्के कमिशन घेतले जात आहे.






## अग्रलेख...

# धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याचा मार्ग प्रशस्त...

देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची आवश्यकता प्रतिपादित केली. काळाच्या बरोबर जाण्यासाठी धर्मनिरपेक्ष नागरी कायदा आवश्यक आहे, यात शंका नाही. समान नागरी कायद्यासाठी मोदी यांनी यावेळी प्रथमच धर्मनिरपेक्ष नागरी कायदा हा अतिशय अचूक असा शब्द वापरला आहे. धर्मनिरपेक्ष म्हणजे सर्व धर्माच्या लोकांसाठी समान नागरी कायदा, म्हणजे कोणत्याही धर्माच्या लोकांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अन्याय होऊ न देणारा कायदा. देशातील विद्यमान कायद्याचे वर्णन मोदी यांनी सांप्रदायिक नागरी कायदा असे केले, जे अतिशय मार्मिक असे म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी समान नागरी कायद्याची आवश्यकता व्यक्त केली असल्यामुळे यावर व्यापक चर्चा झाली पाहिजे, असे आवाहन मोदी यांनी केले. त्यामुळे देशात आता समान नागरी कायदा वा मोदींच्या शब्दात सांगायचे तर धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यावर चर्चा सुरू झाली पाहिजे. चर्चेच्या मंथनातून धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याचे बहुपयोगी नवनीत बाहेर आल्याशिवाय राहणार नाही. भाजपाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यातून समान नागरी कायद्याचे आश्वासन वेळोवेळी दिले होते. मोदी यांनी लाल किल्ल्यावरील भाषणात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची जी आवश्यकता प्रकट केली, ती त्या दृष्टीने टाकलेले पाऊल म्हणायला हरकत नाही. धर्मनिरपेक्ष नागरी कायदा देशातील लोकांत धार्मिक आधारावर मतभेद करणार नसल्याची ग्वाही देणारा आहे. भाजपाने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम निष्प्रभ करण्यासोबत अयोध्येत राम जन्मभूमीवर राममंदिर उभारण्यासह आपल्या अनेक आश्वासनांची पूर्तता केली आहे. महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयकही संसदेत पारित केले आहे. आता फक्त समान नागरी कायदा आणि गोहत्या बंदी या दोन आश्वासनांची पूर्तता बाकी आहे. त्यामुळे येत्या काही वर्षांत देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायदा लागू झाला तर देशवासीयांना आश्चर्य वाटणार नाही.

विद्यमान कायदा देशात धर्माच्या आधारावर विभाजन करतो, समाजात श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा भेदभाव करतो, असा आरोप मोदी यांनी केला; जो कोणालाच नाकारता येणार नाही. यासाठी काँग्रेस जबाबदार आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून १९७७ चा अपवाद वगळता देशात काँग्रेसचे सरकार होते. २०१४ पासून २०२४ पर्यंतही गैरकाँग्रेसी सरकार देशात सत्तारूढ आहे. ढोबळमानाने विचार केला तर स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांपैकी जवळपास ६३ वर्षे देशात काँग्रेसचे सरकार होते. काँग्रेसने आपल्या राजकीय फायद्यासाठी बहुसंख्यकांवर अन्याय करत अल्पसंख्यकांचे लांगूलचालन केले, याचा सारा देश साक्षी आहे. काँग्रेसने आपल्या याच भूमिकेमुळे धार्मिक आधारावर ध्रुवीकरण करत देशाचे अपरिमित नुकसान केले, यात शंका नाही. कोणतेही सरकार पालक या भूमिकेत असते वा त्याने तसे असावे, असे अपेक्षित असते. ज्याप्रमाणे कोणतेही पालक आपल्या दोन मुलांत कोणताही भेदभाव करत नाही, त्याचप्रमाणे सरकारने देशातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना भेदभाव न करता सारख्या ममत्वाने वागवणे अपेक्षित असते. पण काँग्रेसने मतांच्या राजकारणासाठी असे कधी केल्याचे दिसले नाही. अल्पसंख्यकांचे लाड करूनच काँग्रेस थांबली नाही तर तिने बहुसंख्यकांवर अन्यायही केला. म्हणजे बहुसंख्यकांच्या हातातील घास हिसकावत तो अल्पसंख्यकांच्या हातात दिला. यामुळे काँग्रेसने जाणीवपूर्वक आपल्यावर अन्याय केल्याची भावना बहुसंख्यकांमध्ये निर्माण झाली, ज्याचे राजकीय नुकसान काँग्रेसला सहन करावे लागले. पण यानंतरही काँग्रेसचे डोळे उघडले नाही. गाढ झोपेत असलेल्याला जागे करणे सोपे असते, पण झोपेचे सोंग घेतलेल्याला झोपेतून जागे करणे कठीण असते; तशीच स्थिती काँग्रेसची झाली आहे.

मोदी यांनी आपल्या जवळपास ९८ मिनिटांच्या भाषणातून राष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक मुद्यांना स्पर्श केला आहे. 'वन नेशन वन पोल'ची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. देशातील विकासाचे चक्र अव्याहत फिरत ठेवण्यासाठी सर्व प्रकारच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या गेल्या पाहिजेत. आपल्या देशात वर्षातील ३६५ दिवसही कोणत्या न कोणत्या निवडणुका सुरू असतात आणि त्यामुळे देशाच्या वेगवेगळ्या भागात आचारसंहिता लागू असते. निवडणूक आचारसंहितेमुळे देशातील विकासाची कामे ठप्प आणि प्रभावित होत असतात. मोदींनी आपल्या भाषणात घराणेशाही आणि जातीयवादावरही जोरदार हल्ला चढवला आहे. देशात काँग्रेसच्या विशेषत: गांधी कुटुंबाच्या घराणेशाहीला देश विटला आहे. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी-वढेरापर्यंत या घराणेशाहीची पाळेमुळे पोहोचली आहे. राहुल गांधींनी लग्न न केल्यामुळे उद्या गांधी-नेहरू घराण्याचे वारस म्हणून प्रियांका वढेरा यांची मुलंही राजकारणात आली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. याच घराणेशाहीवर मोदी यांचा आक्षेप आणि नाराजी आहे. कोलकात्यात एका वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरवर झालेल्या निर्घृण बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा थेट उल्लेख मोदी यांनी आपल्या भाषणात केला नसला, तरी महिलांवरील वाढत्या अन्याय आणि अत्याचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणाचा तातडीने तपास होण्याची तसेच यातील दोषींना कठोर शिक्षा होण्याची जी आवश्यकता मोदी यांनी व्यक्त केली, ती अतिशय योग्य अशी आहे. कोलकात्यातील डॉक्टरवरील बलात्काराचे आणि हत्येचे प्रकरण संबंधित वैद्यकीय महाविद्यालयाने तसेच पश्चिम बंगाल पोलिसांनीही अतिशय बेजबाबदारपणे हाताळले, असे नाईलाजाने आणि व्यथित अंत:करणाने म्हणावेसे वाटते. या दोघांच्याही भूमिका दोषीला पकडून कठोरातील कठोर शिक्षा करण्याऐवजी त्याची पाठराखण करण्याची असल्याचे तपासाच्या घटनाक्रमावरून दिसून येते.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील सरकारची भूमिकाही या प्रकरणात कोणाला तरी वाचवण्याची असल्याचे जाणवते, त्यामुळेच कोलकाता उच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल पोलिसांच्या तपासावर नाराजी व्यक्त करत तपास सीबीआयकडे सोपवला आहे. लाल किल्ल्यावरून सलग ११ वेळा तिरंगा फडकवत मोदी यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचा विक्रम मोडला आहे. मनमोहनसिंग यांनी १० वेळा लाल किल्ल्यावरून तिरंगा फडकवला होता. लाल किल्ल्यावरून सर्वाधिक म्हणजे सलग १७ वेळा तिरंगा फडकवण्याचा बहुमान देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना मिळाला आहे. दुसऱ्या स्थानावर त्यांच्याच कन्या आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आहे. गांधी यांनी १६ वेळा लाल किल्ल्यावरून तिरंगा फडकवला. इंदिरा गांधी आणि पंडित नेहरू यांचा विक्रम मोदी यांना मोडता येईल का, हे येणारा काळच सांगणार आहे. मात्र, बापलेकीचा हा विक्रम मोदी यांनी मोडावा, अशी समस्त देशवासीयांची इच्छा असू शकते. कोणताही समारंभ कसा साजरा करावा, हे सांगण्याची मोदी यांची एक पद्धत आहे. यावेळच्या लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यासाठीही मोदी यांनी समाजाच्या वेगवेगळ्या वर्गातील काही लोकांना आमंत्रित केले. यात पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील पदकविजेते होते, त्याचप्रमाणे आशा वर्कर, लखपती दीदी, ड्रोन दीदी तसेच केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभार्थीही होते. मोदी यांनी देशातील राजकारणाचा चेहरामोहरा बदलवला आहे. जगात भारताला मानाचे स्थान मिळवून दिले. अविकसित तर सोडा, पण विकसित देशांचे प्रमुखही पंतप्रधान मोदी यांच्या विकासाभिमुख आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वाचे चाहते झाले आहेत. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला भलेही कमी पदके मिळाली असतील, एकही सुवर्णपदक मिळाले नसेल; मात्र जागतिक नेत्यांची कोणत्याही गटातील लोकप्रियतेबाबत ऑलिम्पिक स्पर्धा झाली तर त्यात सर्वाधिक सुवर्णपदके मोदी यांनाच मिळतील, यात शंका नाही.

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# टवाळा आवडे स्टॅण्डअप कॉमेडी!

सध्या 'मनोरंजन' या शब्दाचा अर्थ हरवलेला आहे. लोकांना वाटतं की, केवळ विनोद म्हणजेच मनोरंजन. पण मी स्वतः कला क्षेत्राशी संबंधित असल्याने हे नक्कीच सांगू शकतो की, विनोद हा मनोरंजनाचा फक्त एक प्रकार आहे. तुमच्या कलाकृतीने प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आणलं, तुम्ही प्रेक्षकांना भावुक केलं, त्यांना घाबरवलं तरी तुम्ही त्यांचं मनोरंजन केलं असंच म्हणावं लागेल. त्यामुळे केवळ हसवणं म्हणजे मनोरंजन करणे नव्हे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. कोणतीही कला असली तरी त्यात अनेक मर्यादा येतात. विशेषतः विनोद निर्मिती करणं सोपं काम नाही. चार्ली चॅप्लिन या महान कलाकाराने विनोद निर्मितीला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं आहे. पु. ल. देशपांडे, राम नगरकर हे मराठीतले दिग्गज. राम नगरकर यांच्या 'रामनगरी' या पुस्तकातलं पहिलं पान तुम्ही वाचायला सुरुवात करता तेव्हा तुमच्या ओठांवर जे स्मित फुललेलं असतं, ते शेवटच्या पानापर्यंत टिकून राहतं. ही त्यांच्या लिखाणाची किमया आहे. आपलं दुःख सांगताना माणूस समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर स्मित फुलवू शकतो, हे केवळ अद्भुत आहे. पु. ल. देशपांडे म्हणजे आजच्या भाषेत सांगायचं झालं तर स्टॅण्डअप कॉमेडियन. एक व्यक्ती समोर उभी राहून लोकांना हसवते, अशी स्टॅण्डअप कॉमेडीची साधी सोपी व्याख्या सांगता येईल. रॉवन टकिन्सन यांची स्टॅण्डअप कॉमेडी कल्पनांच्या पलीकडची असते. रॉवन तुम्हाला विनोदाच्या एक वेगळ्या दुनियेत घेऊन जातात. कधी कधी मला वाटतं की, विनोद हा रॉवन टकिन्सन यांच्या हुकुमाचा गुलाम आहे की काय! कारण ते अगदी साध्या साध्या गोष्टीतूनही विनोद निर्माण करतात.

मात्र घरात उंदरांचा सुळसुळाट होतो, तसा आता स्टॅण्डअप कॉमेडियन्सचा सुळसुळाट झाला आहे. मग हे लोक आपण जे करतो, त्याला विनोद समजू लागतात. कारण त्यांच्यासमोर बसलेले प्रेक्षक याच जमातीतील असल्यामुळे त्यांना भरभरून दाद देतात. सध्या शिव्या दिल्या तरी तो विनोद आहे, असं समजण्याचा प्रघात आहे. बिग बॉसचा विजेता मुनव्वर फारुकी हे त्यातलंच एक प्रकरण. मुनव्वर हा स्वतःला रॅपर आणि स्टॅण्डअप कॉमेडियन म्हणवून घेतो.



मुनव्वर हा त्याच्या थुकरट विनोदामुळे, अनेक मुलींसोबत असलेल्या त्याच्या संबंधांमुळे नेहमीच नकारात्मकरीत्या चर्चेत असतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुनव्वरने बिग बॉस जिंकल्यावर हजारो लोक याच्या स्वागतासाठी जमले होते. अहो बिग बॉस हा काही कौशल्य दाखवण्याचा कार्यक्रम आहे का? नृत्य, गायन, अभिनय अशी एखादी कला तिथे सादर केली जाते का? ऑलिम्पिक मेडलपेक्षा महत्त्वाचे आहे का? बिग बॉसमध्ये अतिशय थुकरट आणि वाह्यात गोष्टी केल्यानंतर इतकं जंगी स्वागत? म्हणजे मुनव्वर फारुकी आणि त्याच्या चाहत्यांचा मेंदू गुडघ्यात नव्हे तर तळव्यात आहे, असं म्हणावं लागेल. या मुनव्वरने हल्लीच एका स्टॅण्डअप कॉमेडीच्या कार्यक्रमात कोकणी माणसाला शिवी दिली आणि थट्टा केली. नितेश राणे यांनी मुनव्वरला चांगलाच दम भरला. त्यानंतर त्याने लाईव्ह येऊन जाहीर माफी मागितली. विनोद करण्यासाठी त्याला शिव्यांची गरज पडते? पुलंनी मुंबईकर, पुणेकर यांच्या गमती सांगितलेल्या आहेत. पुलंचे व्हिडीओ पाहताना आजही आपल्याला काही अपमानास्पद वाटत नाही. उलट आपल्याला आनंदच मिळतो. निखळ आनंद! अहो यालाच तर विनोद म्हणतात ना! फालतू बडबडीला आपण विनोद म्हणायला लागलो तर कसं चालेल?

समर्थ रामदास म्हणतात,

*टवाळा आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद ।*
*तामसास अप्रमाद । गोड वाटे॥*

याचा अर्थ ज्यांना ज्यांना विनोद आवडतो ते सगळेच टवाळ असतात, असं रामदासांना म्हणायचं नाही. उन्मत्त माणसाला छंद आवडतात. तामसी माणूस शांत बसू शकत नाही. तो सतत घोटाळे करत असतो. त्याचप्रमाणे टवाळ माणसाला उठता बसता विनोद करायला आवडतो, असं रामदास म्हणतात. समर्थांनाही विनोदाचे वावडे नव्हते. २४ वर्षांनंतर आईला गावी भेटायला गेल्यावर आई त्यांना म्हणाली, 'तू इतकी वर्षे बाहेर होतास. तुला खरोखर एका भयानक भुताने पछाडलेले होते, असे वाटते.' समर्थांचा मिश्कील स्वभाव बघा. समर्थ आईला गमतीने म्हणतात, 'हो, मला भुतानेच पछाडले होते.'

*होते वैकुंठीचे कोनी । शिरले अयोध्या भुवनी ।*
*लागे कौसल्येचे स्तनी । तेचि भूत गे माय॥*

प्रभू श्रीरामचंद्रांनी ओळख समर्थ इतक्या मिश्कीलपणे आईला करून देतात. म्हणजे 'टवाळा आवडे विनोद' असं म्हणणाऱ्या रामदासांना विनोदाचे वावडे नव्हते तर वाह्यात बडबडीला, इतरांचा अपमान करण्यात समाधान मानणाऱ्या टवाळखोरांसाठी हे वाक्य होतं. आज जर समर्थ रामदास असते तर नक्कीच टवाळा आवडे स्टॅण्डअप कॉमेडी, असं म्हणाले असते. कारण हे लोक टवाळखोरच आहेत. याआधी या मुनव्वर नावाच्या टवाळाने प्रभू श्रीरामचंद्र आणि माता सीतेवर गलिच्छ विनोद केला होता. हा मुनव्वर त्याच्या धर्मातल्या प्रतीकांवर विनोद करू शकतो का? आणि जर करू शकत नसेल तर हिंदू धर्म हा काय यांच्या मनोरंजनाचं साधन आहे का? मला प्रश्न पडतो की, समोर बसलेल्या प्रेक्षकांना भावना, स्वाभिमान काही नसतं का? आपल्या देवाधर्मावर कुणी वाह्यात विनोद करत असेल तर त्याला तिथल्या तिथे थांबवलं पाहिजे. त्याचा प्रतिकार केला पाहिजे. कलाकाराला इतरांच्या भावना दुखावण्याचा अधिकार नाही आणि याला जर अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणायचे असेल तर यांना स्वातंत्र्याचा अर्थ कळलेला नाही. स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी घेणे, जबाबदारी नाकारून उथळपणे वागणे नव्हे. त्यामुळे या लोकांना विनोद म्हणजे काय हेच कळलेलं नाही. विनोदी लेखनामागचा हेतू सांगताना पु. ल. देशपांडे म्हणतात, दाढी गुळगुळीत व्हावी, पण ती करताना जखम होऊ नये. ज्याची दाढी झाली, त्याला स्वच्छ झाल्यासारखं वाटावं...!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# लाजिरवाणेच...

जे देशासाठी लढले ते अमर हुतात्मे झाले, हे वाक्य इयत्ता तिसरी, चौथीत शिकवले गेले आणि आजही ते जवळपास प्रत्येकाच्या ध्यानात असायलाच हवे! काल स्वातंत्र्यदिनी एका हिंदी वाहिनीने 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट दाखवला. पाहणाऱ्यांच्या अंगावर शहारे आले नसतील तर त्यांच्या धमन्यांमध्ये हिंदुत्वाचा रक्तपुरवठा कमी असेल, असेच म्हणावे लागेल. स्वत:च्या स्वार्थासाठी इतिहासाचा विपर्यास केलाही गेला असेल. पण, आपण जे आज उपभोगतो आहोत त्यासाठी त्यांनी काय काय नाही भोगले तेव्हा कुठे आज आपण स्वातंत्र्यदिन साजरा करू शकतो. पण, त्याची जाण १०० गुणांच्या उत्तर पत्रिकेपर्यंत किंवा 'हिस्ट्री' या विषयात पीएच. डी. म्हणजे नोकरीचे कन्फर्मेशन! याशिवाय तो इतिहास आता इतिहासजमा होण्याची वेळ आली आहे. आम्हाला स्वातंत्र्य मिळाले आणि आम्ही आता ते स्वैराचाराकडे नेतो आहोत. अगदी हा देश ज्या संविधानावर चालतो आहे तेही बदलवण्यात येणार असल्याची कोल्हेकुई करण्यात आली. अरे, आजपर्यंत त्यात काळपरत्वे सुधारणा झाल्या. त्या पुढेही होत राहतील. पण, या स्वातंत्र्याने दिलेल्या हक्काचा वापर आता आम्ही आमच्या देशासाठी नव्हे तर जात, पात, धर्मासाठी करतो आहोत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला याचा विचार तर केलाच जात नाही. परंतु, स्वातंत्र्य मिळवणे ही त्यांची वैयक्तिक गरज होती, असा आविर्भाव सध्या समाजात पसरवला जात आहे. अगदी, ते लढलेच नाहीतपासून ते माफीवीर होतेपर्यंतचे राजकारण होते तेव्हा याचसाठी होता अट्टहास असेच काहीसे म्हणावे लागेल. ज्या संविधानाच्या भरवशावर आमचा देश चालतो आहे, त्याला खीळ घालण्याचे कर्मही 'लोकप्रतिनिधी ते लोकसेवक' करत आहेत. वेतन प्रत्येक नोकरदाराची गरज आहे. त्याला ते मिळालेच पाहिजे. परंतु, कमी काम आणि रग्गड वेतनाचेही अधिकारी जेव्हा वेतनवाढीसाठी संप पुकारत शासन, सामान्य नागरिकांना वेठीस धरतात तेव्हा याचसाठी स्वातंत्र्य मिळवले का असा प्रश्न विचारला जातो. अहो, याहीपेक्षा निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांची कहाणी आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात हर घर तिरंगा अभियानाचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. प्रशासनाने त्याचा अध्यादेश ग्रामपंचायतपर्यंत पाठवला. परंतु, वर्धा जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयापर्यंत तो संदेशच पोहोचला नव्हता. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कार्यालयांवर, शासकीय ग्रंथालयावर १३ ऑगस्ट रोजी झेंडा फडकलाच नव्हता. ही झाली शासनाच्या जावयांची कथा! त्यांना जास्तीत जास्त कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल. याशिवाय दुसऱ्या शिक्षेची तरतूद असेलही. पण, त्यांच्यासोबत संघटना जुळून आहेत. कारवाईचे संकेत येताच संघटनांकडून स्वातंत्र्यातून मिळालेल्या अधिकाराचा वापर केला जाईल! याशिवाय काहीच होणार नाही, हे पक्के! आम्ही १५ ऑगस्टला स्वातंत्र्य आणि २६ जानेवारीला प्रजासत्ताकदिन साजरा करतो. मात्र, या दोन्ही तारखांना लागून शनिवार, रविवार वा अन्य सुट्ट्या येतात का याचा विचार करून पर्यटनाचे नियोजन आखतो. झेंडावंदनाला बुट्टी मारण्याची तयारी करतात तेव्हा याचसाठी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले का असा प्रश्न विचारावासा वाटतो. आमचा देश युवांचा आहे. इतर देश वार्धक्याकडे वळत असताना आम्ही तरुण भारताचे नागरिक आहोत, हे आम्ही जेव्हा समजून घेतो तेव्हा परवा १५ रोजी आमच्या युवकांनी घातलेला नंगा नाच पाहून लाजिरवाणे वाटू लागले! अंगविक्षेप, वाहनांचे कर्कश आवाज, 'जहाँ डाल डाल पे सोने की चिडीयाँ' ते सैराटपर्यंतचे डिजेवर वाजत असलेले गाणे... आकंठ रिचवून झाल्यानंतर घरी जाण्याचे भानही नसणारे युवक पाहून आम्ही स्वातंत्र्यदिन फक्त झेंडावंदनापर्यंतच मर्यादित ठेवले का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. आमच्या पिढीला स्वातंत्र्यासोबत काही देणेघेणे नाही. स्वैराचार हवा आहे. कोणाचीही बंधनं नको आहेत. स्वातंत्र्याचा स्वैराचार मेट्रोसिटीतून लहान शहारांपर्यंतही पोहोचला आहे. याची चिंता आता कोणी, कोणासाठी करावी. कारण, हा देश आता फक्त राजकारणासाठी जातिपातीत विभागण्याचे महापाप सुरू असून त्याला आमची ही पिढी बळी पडते आहे. कारण, त्याला खरा इतिहास शिकवल्याच गेला नाही. आजही आमच्या पुढे गरिबी, बेरोजगारी, सामाजिक दरी हे प्रश्न आहेत. त्यासाठी आम्हाला एकत्र यावे लागेल. त्याशिवाय आमचे स्वातंत्र्य अपूर्ण आहे. परंतु, आमची पिढी स्वातंत्र्यदिनी दुपारनंतर एकत्र येते ती 'एकच प्याला'साठी लाज वाटते हे सर्व पाहून!

शेवटी...

'दिलों की धडकन, वतन की शान हो तुम, तिरंगे की आन-बान और शान हो तुम' असे म्हणताना अंगावर तिरंगा, वाहनांवर त्रिपल सीट, वाहतुकीच्या नियमांना धाब्यावर बसवत सुसाट धाब्यावर जाणारी वाहनं पाहून याचसाठी हवे होते का स्वातंत्र्य असे म्हणावेसे वाटते. बघा, प्रजासत्ताकदिन तरी लाजिरवाणा होऊ नये याचे नियोजन करा.

९८८१९०३७६५

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# समय बड़ा बेढंगा, आज आदमी बना लफंगा!

महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या नव्हे, प्रामुख्यानं उद्धव ठाकरेंच्या वैचारिक दिवाळखोरीला बघितल्यानंतर 'नास्तिक' या जुन्या चित्रपटातील गीताची आपसूक आठवण होते. सुमारे ६०-६५ वर्षांपूर्वी आजच्या मनुष्यविकृतीची तंतोतंत भविष्यवाणीच या गीताच्या गीतकाराने केली आहे, असे म्हणायला हरकत नाही.

त्यातील काही बोल आजच्या महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांच्या प्रवृत्तीला उद्धृत करतात.

*देख तेरे संसार की हालत क्या हो गयी भगवान,*
*कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान,*
*सूरज ना बदला, चाँद ना बदला, ना बदला रे आसमान,*
*कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान ॥*
*आया समय बड़ा बेढंगा, आज आदमी बना लफंगा,*
*कहीं पे झगड़ा, कहीं पे दंगा, नाच रहा नर होकर नंगा,*
*छल और कपट के हांथों अपना बेच रहा ईमान,*
*कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान ॥*
*राम के भक्त, रहीम के बन्दे, रचते आज फरेब के फंदे,*
*कितने ये मक्कार ये अंधे, देख लिए इनके भी धंधे,*
*इन्हीं की काली करतूतों से हुआ ये मुल्क मशान,*
*कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान ॥*

राजकारणासाठी, आपल्या राजकीय स्वार्थासाठी, सत्तापदांच्या हव्यासापोटी, राजकीय व्यक्तींनी माणुसकी सोडून जी खालची पातळी गाठली आहे, त्याचे हुबेहूब वर्णन या गीतातून करण्यात आले आहे. विश्वंभर चौधरी नामक तथाकथित समाजसेवक कम राजकारण्याने नुकतेच यांच्यासाठी देशात केवळ सत्तेच्या हव्यासापोटी किती नीच मनुष्य जमात तयार केली गेली, अशा शब्दातील ट्विट करून या प्रवृत्तींची त्यांच्या शैलीत प्रशंसा केली आहे.

अलिकडल्या काळातील उद्धव ठाकरेंची भूमिका, वक्तव्ये बघितली तर खरोखर 'छल और कपट के हांथों अपना बेच रहा ईमान, कितना बदल गया इन्सान...' हे शब्द लागू होताना दिसत आहेत. दिल्ली समोर मुजरा करणार नाही, महाराष्ट्र दिल्ली समोर झुकणार नाही, महाराष्ट्र दिल्लीच्या इशाऱ्यावर चालणार नाही, दिल्लीच्या हुकूमशाहीविरुद्ध झुकणार नाही, वाकणार नाही, अशा अनेक वल्गना उद्धव ठाकरे, त्यांचे चेलेचपाटे करत आले आणि करत असतात. आज तर, 'कितना बदल गया इन्सान'चे मूर्तिमंत उदाहरण उद्धव ठाकरेंनी मुंबईच्या कार्यकर्ता मेळाव्याप्रसंगी दिले. मुख्यमंत्रिपदाच्या हव्यासापोटी गद्दारी करत हिंदुत्वाची कास सोडत, २५ वर्षे जुनी युती तोडणारे उद्धव ठाकरे आज काँग्रेसनं आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, मी त्याला बिनशर्त पाठिंबा देईल, असे आश्वासन दिले. हीच समजदारी जर २०१९ ला दाखवत, हेच शब्द भाजपाला म्हटले असते तर नीलाम झालेली, चव्हाट्यावर आलेली अब्रू वाचली असती; झाकली मूठ राहिली असती! 'घर का ना घाट का' झाले नसते, इटलीच्या मॅडमपुढे मुजरा घालावा लागला नसता, दिल्लीपुढे झुकावे लागले नसते, मुख्यमंत्रिपदासाठी अशी घालमेल नसती, शिवसैनिकच मुख्यमंत्री करेल असे छातीठोक सांगण्याचे धाडस असते, जाहीर सभांमधून शिवसेनेचाच मुख्यमंत्री करू, भगवा फडकवू म्हणता आले असते, नाही का?

बरं; मातोश्रीमधील बाळासाहेबांची खोली ही आमच्यासाठी मंदिर आहे, त्या मंदिरात दिलेला शब्द भाजपाने पाळला नाही, असे वारंवार सांगितले गेले. आजवर या तुमच्या मंदिरात येऊन भाजपाचे लोकं प्रत्येक वाटाघाटी करत आले, शब्द देत आलेत. त्यांनीही नेहमी बाळासाहेबांचा आदरच केला. मात्र, या लोकसभेवेळी तर मविआतील घटक पक्षाचा कोणताही नेता या मंदिराकडे फिरकला नाही. ढुंकून पाहिलं नाही. येत्या विधानसभेच्या निमित्ताने तरी या पवित्र मंदिरात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते नतमस्तक होतील का? म्हणतात ना आधीच ठोकर लागली असेल तर दुसऱ्यांदा माणूस ताकही फुंकून पितो. मग उद्धव ठाकरेला भाजपाकडून दगाफटका मिळाल्यानंतर, पुन्हा दगाफटका होऊ नये म्हणून, काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून वचन घेतले आहे का? नसेल तर कधी घेणार आहेत? या मंदिरात आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाची चर्चा करतील आणि निम्मे निम्मे वर्ष मुख्यमंत्रिपद विभागून देण्याचा शब्द सहकारी पक्षाचे नेते देतील? हा शब्द उद्धव ठाकरे आघाडीतील घटक पक्षांकडून घेणार आहेत की नाही? 'चर्चा करायची असेल तर मातोश्रीवर या' असे कधी खडसावतील? २५ वर्षे जुन्या मित्रावर विश्वास न ठेवता शब्द घेतला होता; मग जुम्माजुम्मा चार दिवसांच्या जवळीक करणाऱ्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवणार आहात का? त्यामागे काय लॉजिक आहे तुमचं? निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपदाचं ठरवू अशी तुमची आजची भूमिका असेल तर हे मनपरिवर्तन कसे काय झाले? हीच उच्च विचारसरणी २०१९ मध्ये कुठे गेली होती? त्यावेळी कोती मनोवृत्ती का दाखविली? अशा अनेक प्रश्नांची उत्तरं आधी या महाराष्ट्राला द्यावी लागणार आहे उद्धव ठाकरेंना... नाहीतर 'समय बड़ा बेढंगा' असल्याने, महाराष्ट्रातील जनता 'आदमी बना लफंगा' म्हणाल्याशिवाय राहणार नाही.

**काँग्रेसचा ढोंगीपणा :** लाडकी योजना आणली, पण द्यायला पैसे कुठे आहे? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला. १५०० रुपयांनी विकत घ्यायला आमचं बहिणींचं तकलादू प्रेम नाही. १५०० रुपये देऊन नात्याचा अपमान केला आहे, असे खासदार सुप्रिया सुळे म्हणत आहेत. १९९ कोटी रुपयांचा खर्च कशासाठी असा आक्षेप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी घेतला आहे. वडेट्टीवार आज बोलले, पण काँग्रेसचा या योजनेला पहिलेपासून विरोध आहे. राज्याचे काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आबा बागुल यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चुनावी जुमला आहे, फसवी आहे, ही योजना राबविणे राज्याच्या हिताचे नसल्याने ती तातडीने रद्द करा अन्यथा न्यायालयात जाऊ, असा इशारा दिला होता. प्रत्यक्षात ही योजना फसवी आणि राज्याच्या हिताची नसेल तर काँग्रेस आणि समविचारी पक्षांच्या आमदारांनी आपल्या मतदारसंघात ही योजना राबविली जाऊ नये, या फसव्या योजनेचा लाभ महिलांनी घेऊ नये, असे आवाहन महिलांना करण्याऐवजी आपल्या कार्यालयासमोर मोठमोठे लाडकी बहीण योजनेचे फलक लावून कार्यालयात फॉर्म भरून घेत आहेत. जे वडेट्टीवार आज या योजनेला विरोध करत आहेत, त्यांचे कार्यकर्तेदेखील या योजनेचे फॉर्म भरत आहेत. लोकसभेत खटाखट योजनेचे फॉर्मदेखील याच वडेट्टीवारांनी भरून घेतले होते. खटाखट पैसे देण्याचे आश्वासन फसवे नाही आणि जे प्रत्यक्षात दिले जात आहे, ते मात्र फसवे? वारे काँग्रेसचे पुरोगामी लॉजिक... ज्या योजनेला आपला विरोध आहे, जी योजना फसवी आहे, त्या योजनेचा लाभ आपल्या मतदार क्षेत्रातील तमाम महिलांनी किंबहुना काँग्रेसला मानणाऱ्या महिलांनी तरी घेऊ नये, असे आवाहन का केले जात नाही आहे? कारण मतांचं राजकारण... दुसरीकडे महिलांच्या हिताच्या या योजनेला आपल्या राजकीय स्वार्थासाठी फक्त बदनाम करण्याचा धंदा चालवला आहे. बरं; झारखंड सरकारने 'मुख्यमंत्री लाडली मंईया योजना' सुरू केली आहे. १००० रुपये प्रत्येक महिलेला दिले जात आहे. येथील सरकार आघाडीतील झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाचे आहे. महसुली, राजकोषीय तूट असलेली झारखंडची अर्थव्यवस्था असून राज्यावर कर्जाचा डोंगर असताना चालविलेल्या या योजनेला काँग्रेसने विरोध केला आहे का? महाराष्ट्र सरकारला दिले जात असलेले ज्ञानाचे डोज काँग्रेसने आपल्या सहकारी पक्षाला पाजले नाही का? काँग्रेसचा ढोंगीपणा या निमित्ताने आता उघडा पडला आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### बलात्काऱ्याचा चौरंगा करा

दिल्लीमध्ये घडलेल्या निर्भया प्रकरणाच्या मनावर कोरलेल्या भीषण आठवणी आपण विसरू शकत नसताना कोलकात्यावरून अजून एक भयानक घटना समोर आली. आजही अशा घटना घडतात आणि माणूस हे घृणास्पद कृत्य करायला धजावतो, याचे एक कारण म्हणजे आरोपीला गुन्हा करूनसुद्धा फार शिक्षा मिळत नाही. खटला कित्येक वर्षे चालू राहतो आणि नंतर थोडीफार शिक्षा मिळते. पीडितेचे आयुष्य एक तर गेले असते किंवा उद्ध्वस्त झाले असते. घरच्यांना जगणे कठीण होऊन बसते. हे सगळे का? मुळात हे घडतेच का? इतिहासापासून आपण काही बोध घ्यावा म्हणून आपण इतिहास शिकतो. पण छत्रपती शिवरायांनी वयाच्या चौदाव्या वर्षी रांझ्याच्या पाटलाला बलात्कारासाठी दोन्ही हात आणि पाय कलम करून त्याचा चौरंगा करण्याची शिक्षा दिली होती, ही गोष्ट केवळ पुस्तकांपुरती मर्यादित ठेवतो. ही शिक्षा शिवरायांनी पाटलाला दिली आणि असे प्रसंग स्वराज्यात घडणे बंद झाले. स्वराज्याचे सुराज्य झाले. गुन्हेगारांमध्ये दहशत बसली. जर आज आपल्या राष्ट्राचे सुराज्य व्हावयाचे असेल, तर बलात्कारासारख्या घृणास्पद किळसवाण्या गुन्ह्यासाठी गुन्हेगाराचा पकडल्याक्षणी चौरंगा करण्याची शिक्षा आणि कायदा अंमलात यायलाच हवा. गुन्हेगाराच्या मनात जेव्हा हात पाय कापल्या जाण्याची दहशत असेल, तेव्हाच हे गुन्हे घडणे बंद होतील.

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

### नियोजनाचा अभाव

काही दिवसांपूर्वी नागपुरात अतिवृष्टी झाली. बऱ्याच कालावधीनंतर पाऊस आल्यामुळे नागपूरकर काही काळ सुखावले असतील. पण अल्पावधीत पावसाने उग्र रूप धारण केले. बघता बघता वस्तीवस्तीत आणि घराघरांत पावसाचा शिरकाव झाला. काही उपाययोजना करण्याच्या आत घरातील वस्तूंना पावसाने आपल्या कवेत घेतले. एकच गोंधळ उडाला.

मानेवाडा बेसा रोडला लागून दिवाण ले-आऊट आहे. त्यातील ८०-९० घरांत एक ते दीड फूट पाणी शिरले. पार्किंगमध्ये पार्क केलेल्या कार, स्कूटर्समध्ये पाणी शिरले.



व्हरांड्यात असलेली विहीर दिसेनाशी झाली. घरातील दिवाण, सोफा, फ्रिज, वॉशिंग मशीन आदीमध्ये पाणी शिरले. ही अवस्था जवळपास ४० मिनिटे होती. होऊ घातलेले नुकसान टाळता येण्यासारखे नव्हते. त्यातल्या त्यात समाधान याचे की, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच नागपूरचे जिल्हाधिकारी दिवाण ले-आऊटमध्य आले. प्रशासकीय यंत्रणेने पंचनामा केला. आपले इतिकर्तव्य पूर्ण केले. एक अध्याय पूर्ण झाला. कवित्व मात्र अजून कायम आहे. अनेकांचे म्हणणे आहे की, मान्सूनपूर्व नाल्यांची सफाई झाली नाही. गडर लाईन्स पूर्णपणे बुजल्या होत्या. नाग नदीला जोडलेल्या नाल्यांची भिंत कमी उंचीची असल्यामुळे नाल्यातून पाणी बाहेर आले आणि घराघरांत शिरले. सिमेंट रोडची उंची मोठी आणि घर खाली अशी अवस्था असल्यामुळे घरात पाणी शिरले. याला नियोजनाचा अभाव म्हटले तर वावगे ठरू नये. यावर त्वरित उपाययोजना करण्याची गरज आहे.

**वसंत पिंपळापुरे**/ नागपूर

### वर्धेत पुतळ्याची अवहेलना

दि. १ ऑगस्ट रोजी भारतीय असंतोषाचे जनक असलेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी होती. या तारखेच्या तरुण भारतात वृत्तपत्रात वर्धा येथील 'गोलबाजारात' असलेल्या लोकमान्यांच्या पुतळ्याविषयी बातमी प्रसिद्ध झाली. घाणीच्या साम्राज्यात असलेल्या त्या अर्धकृती पुतळ्याचे चित्र पाहून प्रथम वाईट वाटले, पण नंतर प्रशासन व वर्धेतील जनप्रतिनिधींबाबत मनात चीड निर्माण झाली. या महाराष्ट्रात निवडक समाजसेवकांचा व स्वातंत्र्यलढ्यातील थोर व्यक्तींचाच सन्मान होणार का? खरं तर 'या सरकारचे व प्रशासनाचे डोके ठिकाणावर आहे का?' असा प्रश्न विचारावा अशी परिस्थिती 'पुरोगामी महाराष्ट्रात' निर्माण झालेली आहे.

टिळकांचा अपमान कधीही सहन केला जाणार नाही. या समस्येबाबत त्वरित कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा, ही विनंती.

**श्रीरंग नारायण फाटक**/९४२०१२३३४५

### बेशिस्त पार्किंगला आवरा हो!

शंकर नगर चौक ते धरमपेठ चौक कार पार्किंग बेशिस्त असते. रस्ता छान केला, पण वाहने पार्क केल्याने रस्ता लहान होतो, जाम होतो तसेच हातठेले, दुकानाच्या जाहिरातींच्या बोर्डमुळे वाहतुकीला अडथळा होतो व अपघात होतात. प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, ही विनंती. भरारी पथकाची व्यवस्था केल्यास निश्चितच फरक पडेल, असे वाटते.

**विजय देशपांडे**/९०९६६५९४७०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com



सोलापूर : सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलाचे नुतन अधिक्षक म्हणून अतुल कुलकर्णी यांनी मावळते अधिक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे यांच्याकडून अधिक्षक पदाचा पदभार स्विकारला.

# विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ अध्यक्षपदी आण्णाप्पा सतुबर



## कार्याध्यक्षपदी डॉ. संतोष राठोड तर प्रसाद गाजरे सचिवपदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ अध्यक्षपदी आण्णपा सतूबर सर यांची निवड झाली. कार्याध्यक्ष पदावर डॉ. संतोष राठोड यांची तसेच उपाध्यक्ष पदावर स्वाती पुंजाळ नागेश बिराजदार व किरण चव्हाण यांची तसेच सचिवपदी प्रसाद गाजरे यांची निवड करण्यात आली.

ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त माजी आमदार शिवशरण आण्णा पाटील,विजय शाबादी बाबुराव लद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत ट्रस्ट अध्यक्ष सुभाष चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.प्रारंभी विजय शाबादी यांनी विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाची ३५ वर्षाची प्रगतीची वाटचाल सांगितली.यावेळी विश्वस्त सदस्य डॉ.मल्लिकार्जुन तरनळळी, शाम धुरी सचिन चव्हाण सर आदींनी मनोगते व्यक्त केली.मावळते अध्यक्ष महेश देवकर यांनी मागील वर्षाचा आढावा सादर केला. सर्व नूतन पदाधिकारी यांचे शिवशरण आण्णा पाटील, ॲड.सोमेश वैद्य युवराज राठोड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. प्रारंभी ट्रस्ट सचिव विश्वनाथ आमणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तसेच मंडळातर्फे कै.राजेश शाबादी यांचे स्मरणार्थ कु.उज्वला दफेदार या अपंग विद्यार्थिनीस डी. बि.एम. शिक्षणासाठी ११०००/- शाबादी परिवाराने दिल्याचे सांगितले. यावेळी निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, महेश घाडगे, सिदराया होर्तिकर आदी उपस्थित होते.

**मंडळाचे इतर पदाधिकारी पुढील प्रमाणे:-**

खजिनदार - राचप्पा कटारे,मिरवणूक प्रमुख - बसवराज स्वामी, प्रमुख सल्लागार - पत्रकार प्रशांत जोशी,पद्माकर कुलकर्णी,उमेश कदम, महिला समिती - सुरेखा गोब्बुर, ज्योती केगावकर, वैशाली माशाळ, मधुमती चाटे, भोसले, मीना गायकवाड, सुजाता म्हेत्रे, सल्लागार - बेळूनगी बिराजदार,उमेश यळसंगी, डॉ. बसवराज बगले, मल्लिनाथ याळगी, सुनील भगवान, महेश देवकर, सचिन चव्हाण, पुरुषोत्तम साखरे, महेश घाडगे, शिवराज कांबळे, सचिन चौधरी, संदीप साळुंके.

# सोलापूर जिल्ह्यात गतवर्षीपेक्षा अभियांत्रिकीला वाढता प्रतिसाद

## सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक पसंतीसाठी सिंहगडची महाविद्यालये आघाडीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यात गतवर्षीच्या तुलनेत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांनी चांगली पसंती दर्शवल्याचे चित्र आहे. या वर्षी सोलापूर शहर व जिल्ह्यात एकूण ५७०८ जागा उपलब्ध आहेत त्यापैकी पहिल्याच फेरीत ४३१६ म्हणजेच सुमारे ७६% जागा भरण्याच्या मार्गावर आहेत. यावरूनच गतवर्षीच्या तुलनेत अभियांत्रिकी साठी विद्यार्थ्यांचा ओढा वाढल्याचे दिसून येत आहे.





बुधवारी प्रथमवर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी पहिल्या फेरीसाठी विद्यार्थ्यांच्या पसंतिक्रमानुसार महाविद्यालये ॲलॉट झाली असून यामध्ये सोलापूर जिल्ह्यात विद्यापीठ सलगनित महाविद्यालयांत केगाव येथील एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयास सर्वाधिक विद्यार्थ्यांनी पसंती दर्शवली आहे.

माहिती तंत्रज्ञानाचे वाढलेले महत्व लक्षात घेता कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन शाखांना विद्यार्थ्यांची सर्वाधिक पसंती असली तरी इलेक्ट्रिकल, सिव्हिल व मेकॅनिकल या मूलभूत शाखांना सुद्धा विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. सिंहगड सारख्या महाविद्यालयांमुळे विद्यार्थ्यांनी पुणे ऐवजी या महत्त्वाच्या ब्रांचेस साठी सिंहगड सोलापूरला पसंती दर्शवली आहे.

सोलापूरच्या एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाला प्रथम पसंती देण्याचे मुख्य कारण म्हणजे २०२३ चा *उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, तसेच चालू वर्षीचा उत्कृष्ट संस्था पुरस्कार याशिवाय नवीन शैक्षणिक धोरणा नुसार विद्यार्थ्यांना मेजर व मायनर डिग्री मिळवण्याची संधी, तसेच प्रथम वर्षातच प्रोजेक्ट बेस लर्निंग ची संकल्पना राबवणे, टीजी स्कीम व मागील दोन वर्षां

## निधन वृत्त...

### सरुबाई माळगे



**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथील रहिवासी सरुबाई बसवण्णा माळगे यांचे वृद्धाकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षाच्या होत्या. त्याच्या पश्चात दोन मुलं, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

### पद्ममिनी चव्हाण



**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

मोहोळ तालुक्यातील शिरापुर (सो) येथील पद्ममिनी विश्वनाथ चव्हाण(वय ८०) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे चार मुले, एक मुलगी, जावई, सूना व नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांच्या त्या काकू होत.

### भिकाजी कांबळे



**मंगळवेढा, दि. १६ ऑगस्ट-**

येड्राव (ता. मंगळवेढा) भिकाजी कांबळे (वय ७८) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. बुलढाणा येथील व्यावसायिक संजय कांबळे यांचे ते वडील, तर श्रीपूर येथील आरपीआय आठवले गट सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख भारत आठवले यांचे ते मेहुणे होत.

### शरद जाधव



**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

डोणगाव रस्ता सलगरवस्ती येथील शरद दत्तात्रय जाधव (वय ५६) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, ३ मुले व २ भाऊ असा परिवार आहे.

### विठ्ठल हत्तीकट्टी



**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

डोणगाव रस्ता सलगरवस्ती येथील विठ्ठल हरिभाऊ हत्तीकट्टी (वय ८७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे २ भाऊ, १ मुलगा, १ मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे.

जा.क्र.नपं/पापु वि./755/2024.
मोहोळ नगरपरिषद कार्यालय,
दिनांक- 16/08/2024.

**मोहोळ नगरपरिषद, ता. मोहोळ, जि. सोलापूर**

**- ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना -**

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद, मोहोळ शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या पाणीपुरवठा विषयक कामाचे ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अर्हताप्राप्त तांत्रिक ब-1 च्या नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-टेंडरद्वारे मागवीत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण 1 काम आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि.17/08/2024 ते दि.25/08/2024 पर्यंत सायं. 05.00 वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती इत्यादींची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

सही/-
मुख्याधिकारी
मोहोळ नगरपरिषद मोहोळ

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व बळेवाडी, ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. सोलापूर सब डी व ता. बार्शी पैकी **मौजे बळेवाडी** येथील **बागायत शेतजमीन** याचा तपशील **गट नं. ३१ याचे क्षेत्र ०१ हे ०५ आर, या जमिनी पैकी उत्तर बाजूची पूर्व पश्चिम पट्टीची संपूर्ण जमीन तिचे क्षेत्र हे. ००-५० आर याचा आकार रु. ०१-४० पैसे यासी चतुःसीमा पूर्वेसः** गट नं. ३४ ची जमीन, दक्षिणेस - सदर गट नं. पैकी कांता मच्छीन्द्र केंदळे यांची जमीन, पश्चिमेस ग. नं. २९, ३० ची जमीन, उत्तरेस बार्शी शिव रस्ता याची पाणी वागणूक व वहिवाट उत्तर बाजूचे रस्त्याने आहे. येणे प्रमाणे चतु:सिमा पूर्वक आतील सर्व तदंगभूत वस्तू वहिवाटीचे हक्कासह **बागायत शेतजमीन.**

सदर **बागायत शेतजमीन** हि **श्री. सुनील दिलीप बोरगावकर** यांच्या मालकीचा असून प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे व सदर प्लॉटच्या ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचे **बागायत शेतजमीन** ते विक्री करू इच्छितात सदर **बागायत शेतजमीन** विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने **श्री. सुनील दिलीप बोरगावकर** यांनी सदरची **बागायत शेतजमीन** विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे. व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर **बागायत शेतजमीनिवर** कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता **खरेदीपूर्व जाहीर नोटीस** दिली. ता. १६/०८/२०२४.

सही/-
ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर
ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर
ॲड. हेमंत भारत रामगुडे
ऑफिस पत्ता :- ३९४५, भवानी पेठ, सोलापूर रोड
रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
पत्ता-इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर
वाहन विभाग कार्यालय - machinarysmc@gmail.com

**ई-निविदा सुचना**

**TENDER ID - 2024 SMC-1071323-1**

सोलापूर महानगरपालिका नगर अभियंता वाहन विभाग मनपाकडील विविध विभागाकडील निष्काषीत/कंडम/स्क्रॅप/निकामी वाहनांची विक्री करणेकामी बाह्यस्थ संस्था निश्चित करणेकामी ई-निविदा केलेली आहे.

सदर कामाबाबत सर्व अटी व शर्ती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.17/08/2024 पासून पहावयास मिळतील.

या कामाबाबत माहिती घ्यावयाची असल्यास नगर अभियंता वाहन विभागाकडे संपर्क साधावा.

कळावे दि.१६/०८/२०२४

सही/-
नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
नवी पेठ, शाखा
पहिला मजला, डागेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१

**मागणी नोटीस U/S 13(2)**
सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ. क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (कर्जदार)<br>**कै. श्री. इस्माईल उमरसाब नदाफ**<br>रा. ११/१ ब, विष्णु अपार्टमेंट पाठीमागे, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर<br>**यांचे कायदेशीर वारसदार व जामिनदार**<br>**१) श्री जैनोद्दीन इस्माईल नफाद**<br>रा. ११/१ ब, विष्णु अपार्टमेंट पाठीमागे, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर<br>**कायदेशीर वारसदार**<br>**१) शरीफबी इस्माईल नदाफ**<br>रा. ११/१ ब, विष्णु अपार्टमेंट पाठीमागे, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर<br>**२) मुबिना अब्दुल नदाफ**<br>रा. २८, मिल्लत नगर, विजापुर रोड, सोलापूर<br>**३) रुबिना उल्लादिन नदाफ**<br>रा. २८, मिल्लत नगर, विजापुर रोड, सोलापूर | ११/०६/२०२४<br>२८/०२/२०२४ | रु. १०,०४,०००/-<br><br>रु. १,९९,४००/-<br><br>रु. १०,००,०००/- | ९८६२०४००००२६६<br>**हौसिंग फायनान्स**<br>८.५०%<br>९८६२०६०००००४५९<br>**टर्म लोन**<br>९.१५%<br>९८६२०५०००००१४०<br>**ओव्हर ड्राफ्ट**<br>११.६५% | रु. ७,३४,८६८.९७ + व्याज + इतर खर्च<br>रु. ३५,४२२.१३ + व्याज + इतर खर्च<br>रु. ९,८४,५१७.२६ + व्याज + इतर खर्च<br>**एकुण येणे रक्कम**<br>रु. १७,५४,८०८.३६ (रुपये सतरा लाख चौप्पण्ण हजार आठशे आठ रुपये आणि छत्तीस पैसे फक्त) त्यावरील व्याज, दंडात्मक व्याज आणि प्रासंगिक खर्च व किंमत | **सर्व्हे नं. ८९ प्लॉट नं. १७ एकुण क्षेत्रफळ १८० स्क्वे.मी. ओपन जागा १८० स्क्वे.मी. गाव - बाळे, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर**<br>**चतुःसिमा पुढील प्रमाणे**<br>पुर्वेस - प्लॉट नं. १६<br>पश्चिमेस - प्लॉट नं. १८<br>उत्तरेस - ओपन जागा<br>दक्षिणेस - रोड |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी ॲक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी ॲक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

दिनांक - ११-०६-२०२४, स्थळ - सोलापूर
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरावा)
सही/-
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडौदा

**निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सोलापूर**
**मनोरमा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर**
**संचालक मंडळ निवडणूक - २०२४**

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय - नवीन जिल्हाधिकारी कार्यालय,
दुसरा मजला, सात रस्ता चौक, विजापूर रोड, सोलापूर-४१३००३.
दूरध्वनी क्रमांकः- ०२१७-२७३१००० ई-मेलः- dcrsolapur@gmail.com

**संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम सन २०२४-२५ ते २०२९-३०**

**(मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ चे तरतुदीनुसार)**

दि मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ व त्याखालील नियम १९(१) व संलग्न परिशिष्टातील (परिशिष्ट क्र. १ ते ८) मधील तरतुदीनुसार मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये, मी, कुमार आशीर्वाद, निवडणूक निर्णय अधिकारी, मनोरमा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर, सोलापूर सदर मल्टिस्टेट सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाची सन २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीकरीता निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निवडणुक कार्यक्रम जाहिर करीत आहे.

संस्थेचे पोटनियम क्र. ३४ नुसार निवडून द्यावयाच्या संचालक मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहिल.

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण सभासदांमधुन निवडून द्यावयाचे संचालक | १२ |
| २ | सभासदांमधून निवडून द्यावयाचे अनुसुचित जाती/जमाती संचालक | ०१ |
| ३ | महिला संचालक | ०२ |
| | **एकूण पदे** | **१५** |

त्यासाठी, मी खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहीर करीत आहे.

**संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वार | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | निवडणूक कार्यक्रम व प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | १७/०८/२०२४ (शनिवार) | स. ११:०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सुचना फलकावर. |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती / दावे दाखल करण्याचा कालावधी | १९/०८/२०२४ ते २४/०८/२०२४ (सोमवार ते शनिवार | स. ११:०० ते दुपारी ३:०० (प्रत्येक दिवशी) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ३ | प्राप्त हरकतीवरील आक्षेपाची सुनावणी | २६/०८/२०२४ (सोमवार) | स. ११:०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्दी | २७/०८/२०२४ (मंगळवार) | स. ११:०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सुचना फलकावर. |
| ५ | नामनिर्देशन पत्रांची विक्री व स्विकृती | २८/०८/२०२४ ते ०४/०९/२०२४ (बुधवार ते बुधवार) | स. ११:०० ते दुपारी ३:०० वा. (प्रत्येक दिवशी) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ६ | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे | ०४/०९/२०२४ (बुधवार) | संध्या. ५:०० वा | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सुचना फलकावर. |
| ७ | नामनिर्देशन पत्रांची छाननी | ०५/०९/२०२४ (गुरुवार) | स.११:०० ते दु. ३: ०० | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय. |
| ८ | वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे | ०५/०९/२०२४ (गुरुवार) | संध्या ०५:०० वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सुचना फलकावर. |
| ९ | उमेदवारी अर्ज मागे घेणे | ०६/०९/२०२४ ते ०७/०९/२०२४ (शुक्रवार ते शनिवार) | स. ११:०० ते दुपारी ३:०० (प्रत्येक दिवशी) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय. |
| १० | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची अंतिम यादी प्रसिध्द करणे व चिन्ह वाटप. | ०७/०९/२०२४ (शनिवार) | संध्या ०५:०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील व संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सुचना फलकावर. |
| ११ | मतदान. (आवश्यक असल्यास) | १२/०९/२०२४ (गुरुवार) | स. ८:०० ते सायं. ४:०० | ठिकाण नंतर प्रसिध्द केले जाईल. |
| १२ | मतमोजणी व निकाल घोषित करणे. | १२/०९/२०२४ (गुरुवार) | मतदान झालेनंतर लगेच. | ठिकाण नंतर प्रसिध्द केले जाईल. |

**कार्यकारी पदाधिकारी निवडसभा**

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वार | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पदाधिकारी निवड प्रक्रिया जाहीर करणे | १२/०९/२०२४ (गुरुवार) | मतमोजणी निकाल जाहीर झालेनंतर लगेच | मनोरमा अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि. सोलापूर प्लॉट नं. २, कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| २ | नूतन संचालकांची सभा, नुतन संचालकांची यादी प्रसिध्द करणे व पदाधिकाऱ्यांची निवड करणे | १३/०९/२०२४ शुक्रवार | स. ११:०० वा नंतर | मनोरमा अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि. सोलापूर प्लॉट नं. २, कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर |

टीप :-
१. निवडणूकीसाठी नामनिर्देशन दाखल करणाऱ्या उमेदवाराने बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ व संस्थेच्या पोटनियमातील तरतुदीमधील पात्रता निकषांची पूर्तता करणे आवश्यक राहील.
२. निवडणूक निर्णय अधिकारी गांचे कार्यालय नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, सात रस्ता चौक, विजापूर रोड, सोलापूर ४१३००३ हे राहील.
३. मतदार यादीची प्रत रुपये ०२ प्रति पान याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात भरणा करुन उपलब्ध करुन घ्यावी.
४. निवडणूक अनामत ठेव म्हणून रु.२,०००/- इतकी राहील. तथापि अनुसुचित जाती/जमाती मतदासंघास रु. ५००/- इतकी राहील. सदर अनामत रक्कम जमा केले बाबतची पावती नामनिर्देशन पत्रासोबत जोडावी.
५. अनुसुचित जाती / जमाती मतदारसंघातील उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशन पत्रासोबत संबंधित प्रवर्गासाठी आवश्यक असणारे सक्षम प्राधिकरणाने दिलेले जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
६. उमेदवारांनी निवडणूक खर्चाचे विवरण पत्र दाखल करणे व आदर्श आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे.
७. निवडणूक चिन्हांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.
८. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे गैरहजेरीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे संबंधीत कर्तव्ये पार पाडतील व कामकाज पाहतील.

स्थळ - सोलापूर
दिनांक - १७/०८/२०२४
शिक्का
सही/-
(कुमार आशीर्वाद)
निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर
मनोरमा मल्टिस्टेट को-ऑपेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय दत्ता गुंगेवाले (वय २६, रा. श्रीराम मंदीराजवळ, धमाका ढोली बाजा, लोधी गल्ली. बेडरपूल, सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याबाबत पिडीतेने फिर्याद दाखल केली आहे. यातील पिडीतेला अजय गुंगेवाले याने १३ फेब्रुवारी २०२३ ते २३ जून २०२४ या कालावधीत लग्नाचे आमिष दाखवून पिडीतेला शहर व आजूबाजूच्या परिसरातील लॉजवर नेऊन अनेकवेळा तिच्या इच्छेविरुध्द शरीरसंबंध केला. त्यानंतर अजय याने लग्नाला नकार दिला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक कुदळे पुढील तपास करीत आहेत.



### तरूणास मारहाण करणाऱ्या ९ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

तुला लई मस्ती आली आहे का असे म्हणून तरूणास मारहाण करणाऱ्या ९ जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नागेश सुरेश पवार (वय १८, रा. निलम नगर, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन दिनेश बासूतकर, तम्मा मंजूळकर, आदित्य कोळी, स्वप्नील पासकंटी, गोविंद दांडगे, विशाल, टायगर अलकुंटे, प्रेम जाधव, प्रविण चौगुले उर्फ पी जी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ ऑगस्ट रोजी निलम नगरातील शरण मठाजवळून नागेश पवार हा घरी जात असताना त्याच्या ओळखीचे दिनेश बासूतकर व इतर सर्वजण हे दुचाकीवरून आले व त्यांनी तुला लई मस्ती आली आहे का, तु चल आमच्या सोबत असे म्हणून त्यास मारहाण करून बळजबरीने दुचाकीवर बसवून चिप्पा मार्केट येथे आणले. त्याठिकाणी नागेश पवार व त्याचा मित्र ओंकार यांना जबर मारहाण करून जर पोलिसांत तक्रार केली तर परत मारू अशी धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात ९ जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.



# शहर गुन्हे शाखेकडून चोरीचे ४ गुन्हे उघड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून गुन्हे शाखेने चौघा चोरट्याना अटक करून त्यांच्याकडून चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणले. अनिल उर्फ मोठा काल्या राजू चौगुले (वय ३२, रा. मार्केट यार्ड, सोलापूर सध्या रा. मौलाना आझाद चैक, नई जिंदगी, सोलापूर), विराज हुसेनी कांबळे (वय २५, कडबा बाजार जवळ, रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर), राकेश मारूती बनसोडे (वय २६, रा. भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर), प्रज्वल नागेश होवाळे उर्फ मिठ्ठा (वय २५, रा. भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.



२६ जुलै २०२४ रोजी रोजी रात्री रूपनरदीन मुहमदसिध्दी मुहमद (वय ३८, रा. अशोक नगर, श्रीग्रास जि, दुमकुर, कर्नाटक) हे त्यांच्या मालकीचा मालट्रक क्र. केए ०६ एसी १४७० मधुन देवरहिपर्णी (गुलबर्गा, कर्नाटक) येथुन तुरीचे १०० किलो वजनाचे एकुण २२५ पोते घेवुन मार्केट यार्ड, सोलापूर येथे विक्रीसाठी आले होते. सोलापूर येथे आल्यानंतर सोलापूर-हैद्राबाद रोडवरील जनावराचे बाजारा जवळील रोडलगत मालट्रक थांबवुन ते गाडीतच झोपी गेले. मात्र सकाळी ते झोपेतुन उठले व मालट्रकची पाहणी केली असता, मालट्रकची ताडपत्री फाटलेली व त्यामधील १०० किलो वजनाचे ४ तुरीचे पोती चोरी झाल्याचे दिसुन आल्याने, त्यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करून गुन्हा दाखल केला.

या गुन्ह्याचा तपास करताना शहर गुन्हे शाखेचे कर्मचाऱ्यांना बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून सोलापूर मार्केट यार्ड मधील फिरस्ता व रेकॉर्डवरील गुन्हेगार अनिल ऊर्फ मोठा काल्या चौगुले व त्याच्या साथीदारांनी ही चोरी असल्याचे समजले. त्यावरून पोलिसांनी अनिल चौगुले याच्या घरातून चोरलेले ४ तुरीचे पोती जप्त केली. पोलिसांनी तपास करून यातील विराज कांबळे, राकेश बनसोडे, प्रज्वल होवाळे यांना ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले. तसेच आरोपी नामे अनिल ऊर्फ मोठा काल्या राजू चौगुले यांचे साथीदार यांनी चोरी केलेल्या २ मोटार सायकली देखील त्याचे कब्जात मिळुन आल्याने, खालील प्रमाणे मोटार सायकल चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, शहर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, अमंलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे यांच्या पथकाने केली.

# विवाहितेस आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

हुंड्यासाठी विवाहितेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह दोघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुजा बापू काळे (वय २०, रा. नुर रेसिडेन्सी अपार्टमेंट, विजापूर रोड, सोलापूर) असे मयत विवाहितेचे नाव आहे.

याबाबत शामल मंगेश शिंदे (वय ४८, रा. ब्लॉक नं. ४०३, बी विंग, नूर रेसिडेन्सी, निर्मिती विहारसमोर, विजापूर रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन उमेश उर्फ बापू रमेश काळे आणि सासू इंदुबाई रमेश काळे (रा. अंबुजवाडी मालवणी, मुंबई, मुळ रा. बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ डिसेंबर २०२२ रोजी पूजा व उमेश यांचा विवाह झाला. विवाहानंतर पूजा ही सासरी नांदत असताना



तुला एक काम येत नाही, तु माझ्या मुलास शोभत नाहीस, तु बुटकी आहेस, माझ्या मुलाचे दुसरे लग्न करून देणार आहे असे वारंवार टोचून बोलून मानसिक त्रास दिला आहे. तसेच उमेश याने मला बायकोची गरज नाही, तु तुझ्या आईवडीलांकडे जा, नाही तर मी मरूण जाईन अशी धमकी देऊन बिअर शॉपी टाकण्यासाठी पैशाची गरज असून माहेरून दोन लाख रूपये घेऊन म्हणून हुंड्याची मागणी केली. सासरच्या मंडळींच्या त्रासास कंटाळून पूजा हिने आत्महत्या केली. म्हणून पूजाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक केंजळे पुढील तपास करीत आहेत.

## घरजागेच्या कारणावरून मारामारी करणाऱ्यांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

घरजागेच्या कारणावरून मारामारी करणाऱ्यांवर सदर बझार पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पुरुषोत्तम नारायण पोबत्ती (वय ५४, रा. उत्तर सदर बझार, गेंट्याल टॉकीजच्या बाजूला, सोलापूर) यांना दिलेल्या फिर्यादीवरुन कुणाल श्रीनिवास पोबत्ती व श्रीनिवास पोबत्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर श्रीनिवास नारायण पोबत्ती (वय ४४, रा. गेंट्याल टॉकीजच्या बाजूला, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन पुरुषोत्तम नारायण पोबत्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत श्रीनिवास पोबत्ती हा पत्नी मुलांबाळासह पुरुषोत्तम यांच्या घरात जबरदस्तीने घुसला व घरजागेस लावलेले कुलूप करवतीने कापून संसारउपयोगी साहित्य बाहेर फेकून देऊन दमदाटी केली. तर पुरुषोत्तम पोबत्ती यांनी श्रीनिवास पोबत्ती यांचा मुलगा कुणाल याने पुरुषोत्तम यास बेडरूमला लावलेली चावी काढून बेडरूम वापरायला द्या असे म्हणाल्यावर त्यास बेडरूममध्ये जाण्यास प्रतिबंध करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हूणन सदर बझार पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हवालदार इप्पलपल्ली तपास करीत आहेत.

## बन्ने खून प्रकरण : आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

शेतीच्या वादातून पत्रा तालमीच्या कार्यकर्त्याचा खून केल्या प्रकरणात तिघां आरोपींचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश आर जे कटारिया यांनी फेटाळला.

महादेव सदाशिव धबाले (वय ३३, रा. पाटील गल्ली, देगाव), अमित उर्फ पप्पू आप्पासाहेब आडके (वय २९, रा. देगाव), विजयकुमार उर्फ बाळू शांतप्पा आडके (वय ३२, रा. पाटील गल्ली, देगाव) अशी जामीन अर्ज फेटाळलेल्यांची नावे आहेत. पुरुषोत्तम दिगंबर बन्ने (वय ४८, रा. उत्तर कसबा, पत्रा तालीम, सोलापूर) असे मयत झालेल्याचे नाव असून याबाबत देविदास दिगंबर बन्ने (वय ४२, रा. पत्रा तालीम, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ जून २०२४ रोजी दुपारी बाळे येथील गट नंबर ४१ /३ या शेतामध्ये ी देविदास बन्ने आणि मयत पुरुषोत्तम बन्ने हे त्यांच्या शेतीची शासकीय मोजणी करण्याकरता शेतामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांना व इतर खाजगी व्यक्तींना घेऊन गेले होते. त्या ठिकाणी आरोपी शांतप्पा आडके, सागर आडके, विजयकुमार उर्फ बाळू आडके यांनी शेतीच्या वादातील राग मनात धरून ७ ते ८ लोकांनी एकत्रित येऊन हातातील लोखंडी कोयता, लोखंडी पाईपने पुरुषोत्तम बन्ने याच्या डोक्यात दोन्ही हाता-पायावर, कमरेवर, शरीरावर, वार करून गंभीर जखमी केले होते. पुरुषोत्तम बन्ने हा गंभीर जखमी झाल्याने उपचारासाठी दाखल केल असता उपचार सुरु असताना २३ जून रोजी मयत झाला. त्यामुळे पोलिसांनी दाखल केलेल्या खूनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात खूनाचे कलम वाढविले. पोलिसांनी शांतप्पा आडके, सागर आडके, विजयकुमार आडके, महादेव धबाले, अमित आडके यांना अटक केली. न्यायालयाने सर्वांना न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर महादेव धबाले, अमित आडके आणि विजयकुमार आडके यांनी जामीन मिळावा म्हणून न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यास सरकार पक्षातर्फे हरकत घेतल्याने विजयकुमार आडके यांनी त्यांचा जामीनाचा अर्ज न्यायालयातून काढून घेतला तर इतर दोन आरोपींच्या जामीन अर्जावर सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींचा जामिनाचा अर्ज फेटाळून लावला. सरकार पक्षाच्या वतीने ॲड. प्रदीपसिंह राजपूत तर आरोपींच्या वतीने ॲड.संतोष न्हावकर यांनी काम पाहिले.

# क्रीडा



### इप्पाकायल शाळेच्या ५ खेळाडूंची पुणे विभागीय सिकई स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळेच्या ५ खेळाडूंची सिकई मार्शल आर्ट स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय शहर स्पर्धेतील कामगिरीवर त्यांची निवड झाली. त्यांना क्रीडा प्रशिक्षक लक्ष्मण चंदनशिवे, गंगाधर खंडागळ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक नागेश सुभाष खुने, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवासा क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम व शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली देणगीदार नरसय्या इप्पाकायल व विश्वस्त रामदास इप्पाकायल यांनी अभिनंदन केले.

**शहर कामगिरी :** १४ वर्षांखालील मुले : ओंकार बालाजी पेदरपेट्टी (२९ किलो, प्रथम), समर्थ दिनकर घोडके (द्वितीय), ऋतिक अंबादास गुंडला, प्रथमेश अजय नराल (तृतीय). १४ मुली : वेन्नेला भास्कर गुंडला (२३ किलो, द्वितीय).



### सुब्रतो मुखर्जी शालेय फुटबॉल स्पर्धेत सेंट थॉमस स्कूलला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

सुब्रतो मुखर्जी शालेय फुटबॉल स्पर्धेत सेंट थॉमस स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले. संघास क्रीडा शिक्षक राजेंद्र गायकवाड, सिल्वेस्टर जॉन व अमित येवलेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक फादर जिसन ॲन्टोनी व व्यवस्थापक फादर पॉल यांनी अभिनंदन केले.

**उपविजेता संघ :** रुशिका चुंगीवाडीयार, सृष्टी मुडके, अदिती बंडे, प्रियल संगवे, सायली जाधव, शिवानी पोखरकर, अक्षरा तावशी, तेजस्वी आनंद, तेजस्वी झेंडेकर, पूर्वी सावंत, माही पुजारी, एकांशी निरंजन, आराध्या वेरूनगीकर, नसरीन ढलायत, सुरवसे, तनिष्का पाटील.

## उमाबाई श्राविका, युनिक स्कूलला दुहेरी मुकुट

**● शालेय रोप स्किपिंग स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

सहकार महर्षी के. वि. गु. शिवदारे स्मृती समारोहनिमित्त झालेल्या शालेय रोप स्किपिंग स्पर्धेत उमाबाई श्राविका प्रशाला व युनिक इंग्लिश मीडियम स्कूलने दोन गटात विजेतपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.



**अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय) :** १४ वर्षांखालील मुले : युनिक इंग्लिश मेडियम स्कूल, मेहता प्रशाला. मुली : उमाबाई श्राविका प्रशाला, जैन गुरुकुल.

१७ वर्षांखालील मुले : युनिक इंग्लिश मीडियम स्कूल. मुली : उमाबाई श्राविका प्रशाला. मुली सिद्धेश्वर कन्या प्रशाला.

जिल्हास्तरीय रोप स्किपिंग आणि युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विचारमंचावर श्री स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे, श्री सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, शिवदारेचे प्राचार्य डॉ. डी एस सुत्रावे, फार्मसीचे प्राचार्य डॉ. जी. के. कापसे, शिवदारे ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या श्रुती गायकवाड, युनिक स्कूलच्या मुख्याध्यापिका पूजा बाजपई, ग्राहक भांडारचे संचालक चंद्रकांत गुरव, अंजली तिवारी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच पीएचडी प्राप्त डॉ. अफाक अन्सारी आणि डॉ. उत्कर्षा शिवशरण यांचाही सन्मान करण्यात आला. प्रस्ताविक व सूत्रसंचालन राजश्री कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय अनुप ढंगे यांनी करून दिला. उपप्राचार्य एम. बी. पाटील यांनी विविध स्पर्धांची माहिती दिली. डॉ. उत्कर्षा शिवशरण यांनी आभार मानले.



### सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या ७ खेळाडूंची सिकई मार्शल आर्ट स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या ७ खेळाडूंची पुणे विभागीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेसाठी निवड झाली. शहर स्पर्धेतील कामगिरीवर त्यांची निवड झाली.

त्यांना क्रीडा शिक्षक गुरुसिध्द होतीकर, प्रचिता जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, सदस्य भिमाशंकर पटणे, मुख्याध्यापिका संगीता गोटे व पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले आहे.

**कामगिरी : प्रथम :** १४ वर्षाखालील : आर्या डोलारे, प्रगती पवार. १७ वर्षाखालील मुली : श्रेया जवळे, वैष्णवी सप्ताळे, वर्षा कंठीमठ, राधिका उडचाण, पवित्रा चांदोडे. **द्वितीय :** १४ वर्षाखालील : राधिका गुरव, मानसी टंकसाळी. १७ वर्षाखालील : तपस्या सारंगमट, अनुष्का माळवदे, दक्षतानया पुकाळे, सृष्टी कोळी, भाग्यश्री माई. **तृतीय :** १४ वर्षाखालील : श्रेया कटके, सोनाली मस्के. १७ वर्षाखालील : कोप्पद, नक्षत्रा भोसले, सुप्रिया घनाते, लक्ष्मी पवार, माधुरी मिसाळ, श्रेया वाले.

## व्हॅलेंटाईन स्कूलच्या थ्रो बॉल व डॉज बॉल संघाचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ७८ वा स्वातंत्र्यदिना निमित्त थ्रो बॉल व डॉज बॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पत्रकार वेणुगोपाळ गाडी यांच्या हस्ते मेडल देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, क्रीडा शिक्षक लावण्या दुस्सा, संतोष पाटील, शिवाजी आवताडे, प्रशिक्षिका मीना दुधनीकर, सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा, उमा कोडम, रेखा बाबानगरे, मेहजबिन शेख, श्वेता पसनूर, राजेश्वरी मदगुंडी, वरलक्ष्मी पलगंटी, मधुस्मिता अच्युगटला, श्रुती नकाते, पल्लवी नागणे आदी उपस्थित होते. अश्विनी बोकडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

## शालेय शहर बुद्धिबळ स्पर्धेत इंडियन मॉडेलच्या घोडके, चिनगुंडे व तापकिरे यांची कामगिरी

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

शालेय शहर बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या साईराज घोडके याने प्रथम तसेच १७ वर्षाखालील गटात ओम चिनगुंडे याने चौथा क्रमांक मिळविला. तसेच इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलच्या स्वानंद तपकिरे याने १४ वर्षांखालील गटात तिसरा क्रमांक मिळविला. या कामगिरीमुळे तिघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक अक्षय माने, अजय चाबुकस्वार, प्रशिक्षक सुमुख गायकवाड व





उदय वगरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, मुख्याध्यापिका मानसी जोशी, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.



**● दक्षिण सोलापूर तालुका क्रिकेट स्पर्धा**

## बोरामणीच्या एसव्हीसीएस हायस्कूलला विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

दक्षिण सोलापूर तालुका क्रिकेट स्पर्धेत बोरामणीच्या एसव्हीसीएस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद संपादिले.

बोरामणी येथील ग्लोबल व्हिलेज स्कूल येथे ही स्पर्धा झाली. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक रवींद्र डोंबाळे, श्री गोकळे, अमोल म्हमाणे, स्नेहल स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक अतनुरे व पर्यवेक्षक बिराजदार यांनी अभिनंदन केले.

**विजयी संघ : १७ वर्षांखालील मुले**

सुजल राठोड (कर्णधार), निखिल चव्हाण (उपकर्णधार), अर्जुन पवार, आकाश चव्हाण, अनुप राठोड, ओंकार राठोड, स्वप्निल राठोड, वैभव पवार९, योगीराज चव्हाण, समर्थ भोसले, ऋतुराज दुपारगुडे, किशोर हक्कीरे, श्रेयश आवटे, कृष्णात खेडे, सुहान नदाफ, दर्शन गोसावी.

**उपविजयी: १४ वर्षांखालील मुले**

रोहन राठोड (कर्णधार), शुभम दुपारगुडे (उपकर्णधार), परशुराम राठोड, प्रथमेश राठोड, अर्जुन राठोड, अनिकेत बेळे, यश बेळे, अजय हलसगे, कृष्णा चव्हाण, सुहास राठोड, आदर्श राठोड, अनिकेत जाधव, अमित हबू, उमेश हबू, सागर हेबळे.

## स्वातंत्र्यदिन विशेष



### अंबादास सरगम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**सोलापूर :** पूर्व विभागातील १२० वर्ष जुन्या पद्मशाली शिक्षण संस्थेच्या नुकत्याच नव्याने सुरू झालेल्या मातोश्री आशाताई अंबादास सरगम सेंट्रल सीबीएसई स्कूल येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व वैविधतेने साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद संस्थेचे विश्वस्त हरीश कोंडा यांनी भुषवले. तसेच विशेष अतिथी म्हणून शाळेचे डोनर निलेश सरगम व पवन पदकी यांचीही उपस्थिती होती. या सर्वांचे स्वागत शाळेच्या प्राचार्या रसिका किल्लेदार यांनी केले. ध्वजारोहणानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम, देशभक्ती गीतांवर नृत्य व भाषणे सादर केली. नर्सरीचे विद्यार्थी भारतीय स्वातंत्र्यवीराच्या वेशभूषेत उपस्थित होते. यावेळी खाऊ वाटप करण्यात आले. आभार शालिनी श्रीगडी यांनी मानले.



### चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत ध्वजारोहण

**सोलापूर :** चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा सोलापूर या शाळेत भारताचा स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले तसेच शाळेत शैक्षाणिक साहित्यांचे उदघाटन करणयात आले. यावेळी हाजी नसीर अहमद खलीफा यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. अध्यक्षस्थानी बशीर अहमद बागवान होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सोशल महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य मन्सुर दलाल, डॉ. परवेज आलम अतनुरकर, सामाजिक कार्यकर्ते अन्वर बागवान, अकील अहमद नालवार व फैज अहमद बागवान उपस्थित होते. यावेळी शाळेत एलसीडी प्रोजेक्टर, स्मार्ट टीव्ही व डेक्सचे उद्घाटन पाहुण्याच्या हस्ते करण्यात आल. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर गीते, भाषणे व सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले तसेच विद्यार्थ्यांनी यावेळी विविध प्रकारच्या वेशभुषा परिधान केले होते. सूत्रसंचालन पटेल जेबा यांनी तर आभार नदाफ आयेशा यांनी मानले.

### संभाजीराव शिंदे विद्यामंदिरात स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

संभाजीराव शिंदे विद्यामंदिर संकुल विडी घरकुल येथे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमांची सुरुवात वंदे मातरम्ने झाली. या कार्यक्रमाला संस्था सचिव महेश कोठे, संस्था सदस्या डॉ. राधिका ताई चिलका, संस्था सदस्य प्रथमेश कोठे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे संस्था सचिव महेश कोठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी इप्पलपल्ली, प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक मल्लाव, कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख व्हटकर, मुख्याध्यापिका मारपल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन जामदार यांनी केले. तर नरुटे यांनी आभार व्यक्त केले.



# सोलापूर शहर मध्य विधानसभा राष्ट्रवादीला द्या

## किसन जाधव यांची अजित पवारांकडे आग्रही मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

आगामी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा निवडून आणून अजित पवार हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे नियोजन करीत आहेत. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांनी मुंबई येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्यालयात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार यांची भेट घेतली त्या भेटीदरम्यान किसन जाधव यांनी अजित पवार यांच्याकडे आग्रही मागणी करीत सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ हे राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी लढवावी यासाठी ही जागा राष्ट्रवादीच्याच वाटेला घ्यावी अशी मागणी किसन जाधव यांनी अजित पवारांकडे केली.

सोलापूर शहरातील तीन पैकी एक जागा राष्ट्रवादीला सुटेल असा विश्वास राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी व्यक्त करत आहेत याच पार्श्वभूमीवर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ ही राष्ट्रवादीला सुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर ही महत्त्वाची भेट आणि चर्चा झाली यावर अजित पवार यांनी सकारात्मक भूमिका घेत या संदर्भात योग्य निर्णय घेण्यात येईल असा विश्वास देखील या चर्चेदरम्यान किसन जाधव यांना अजित पवारांनी दिली. दरम्यान यावेळी किसन जाधव यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात राष्ट्रवादीची संघटनात्मक पक्ष बांधणी करू, शहर मध्य विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचा उमेदवारांने निवडणूक लढवावी त्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उमेदवाराच्या विजयासाठी जोमाने कामाला लागतील असे देखील ते म्हणाले. नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून इच्छा भगवंताची मित्रपरिवार आणि प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या वतीनं अजितोत्सव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये शहर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा, मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना मोफत नोंदणी शिबीर, २२ जुलै रोजी जन्मलेल्या नवजात बालकांच्या नांवे राष्ट्रीयकृत बँकेत पाच हजार रुपये फिक्स डिपॉझिट, क्षयरोग बाधितांना सहा महिन्याचे अन्नधान्य किट यासह विविध विकास कामांचे शुभारंभ आदी कार्यक्रमांचा समावेश होता.



यावेळी किसन जाधव यांनी अजितोत्सव चषक कबड्डी स्पर्धेचे सन्मान चिन्ह अजित पवार यांना देण्यात आले यावेळी विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सह कोषाध्यक्ष संजय बोर्गे, नगरसेवक नागेश गायकवाड, प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, राष्ट्रवादी शहर संघटक माणिक कांबळे, माऊली जरग, महादेव राठोड यांच्यासह इच्छा भगवंताची मित्रपरिवारचे पदाधिकारी व सदस्य यांची उपस्थिती होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे अशा सूचना देखील यावेळी अजित पवारांनी केली.

## नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये स्वतंत्र्य दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिन सोहळा अगदी धूम धामात पार पाडला.

यावेळी माजी सैनिक सुभेदार अंबान्ना गुरुसिद्ध माळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी,सचिवा वर्षाताई विभुते,स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी,प्राचार्या रुपाली हजारे,प्री. प्रायमरी इन्चार्ज अनिता अनगोंडा,ज्यू. कॉलेज प्राचार्या स्मिता कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत शाळेतील स्काउट गाईड विद्यार्थ्यांनी मनमोहक अशा पथ संचललाचे प्रात्यक्षिक दाखवले. तसेच एकात्मतेचा संदेश देणारे सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरणही केले.

याप्रसंगी प्रमुख अतिथींनी सर्व विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले व देशासाठी आपण सदैव तयार राहिले पाहिजे असा संदेश दिला. स्कुलच्या प्राचार्या रुपाली हजारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि या वर्षाभरात भारताने चंद्रयान मोहीम, मोहीम,पॅरिस ऑलंपीक मधील पदक विजेते व विविध क्षेत्रात केलेल्या कार्याची माहिती दिली यामुळे हा स्वातंत्र्यदिन आज मोठ्या आनंदाने देशभरात साजरा होत आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शाळेतील शिक्षिका श्रीदेवी कनके यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तसेच मुख्य अतिथींचे व इतर सर्व शिक्षक विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून करण्यात आला.

# नीलकंठेश्वर प्रशालेत विविध कार्यक्रमांनी स्वातंत्र्य दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

श्री. नीलकंठेश्वर प्रशाला येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्था येथे कार्यरत वैज्ञानिक विनायक नागेल्ली लाभले.तसेच श्री.नीलकंठेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भास्कर आडकी,सचिव रवी नादरगी, आजी व माजी संचालक सदस्य, श्री नीलंकंठेश्वर रथोत्सव कमिटीचे सदस्य, मुख्याध्यापिका नलिनी द्यावरकोंडा, संगीता आडकी,पर्यवेक्षक श्रीधर द्यावरकोंडा, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांची मनोगते,देशभक्तीपर समहूगीत, देशभक्तीपर नृत्याचे सादरीकरण झाले. विनायक नागेल्ली यांनी विद्यार्थ्यांनी आपली जबाबदारी,कर्तव्ये ओळखून स्वतः बरोबरच कुटुंबाची,समाजाची पर्यायी देशाची प्रगती करण्याचे सांगितले. कार्यक्रमाचा शेवट खाऊ वाटपाने करण्यात आला.प्रास्ताविक अंबिका अच्युगटला, सूत्रसंचालन लक्ष्मी कनकी व सोनाली आडकी यांनी केले.

# संविधान जागर यात्रा आज सोलापुरात

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधान जागर समिती महाराष्ट्र आयोजित संविधान जागर यात्रा उद्या (शनिवारी) सोलापूर शहरात येणार आहे. न्यू बुधवार पेठ येथील बॉबी चौकमध्ये सायंकाळी ६ वाजता जाहीर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शाहू, फुले, आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या राष्ट्रीय विचारातून, तसेच या विचारांच्या २५० पेक्षा अधिक संघटना एकत्रित येवून त्यांच्या विचार मंथनातून संविधान विषयी जागृती घडवून आणण्यासाठी ''संविधान जागर'' समिती स्थापन केलेली आहे.

या संविधान जागर समितीच्यावतीने महाराष्ट्रात दि. ९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२४ पर्यंत संविधान जागर अभियान राबविण्यात येणार आहे. सत्ताधारी पक्षाकडून संविधान बदल केला जाईल, असा चुकीचा प्रसार आणि प्रचार केला जात आहे. तो अपप्रचार हाणून पाडण्यासाठी या अपप्रचारावर घणाघात, प्रतिहल्ला करण्यासाठी ही समिती कार्यरत आहे. संविधान बदलले जाईल हा अपप्रचार रोखण्यासाठी सोशल मिडिया, वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक मिडिया, भीम गीते जलसे, व्याख्याने या माध्यमातून जनजागृती करण्यासंबंधी मार्गदर्शन होणार आहे. याद्वारे विरोधकांचे खोटे आरोप मोडून - तोडून टाकण्यात येणार आहेत.

या जागर यात्रेच्या माध्यमातून देश विघातक शक्तिंची पोलखोल करण्याकरिता सोलापूर शहरात १७ ऑगस्ट रोजी संविधान जागर यात्रेचे आगमन होणार आहे, या यात्रेसाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. सर्व समाज बांधवांनी संविधान जागर कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# विहिंपतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त ८८ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

अखंड भारत आणि ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त तसेच पुण्यश्लोक साम्राज्य संघटना वर्धापन दिना निमित्त हत्तुरे वस्ती विमानतळ येथे १५ ऑगस्ट रोजी विहिंप तर्फे भव्य रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी ८८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.




भारत माता पूजन प्रसंगी सीबीआयचे जिल्हा सरकारी वकील प्रदीप सिंह राजपूत, भाजप शहराध्यक्ष नरेंद्र काळे, परिवहन माजी सभापती जय साळुंखे, विश्व हिंदू परिषद विभाग सहमंत्री विजय कुमार पिसे, विश्व हिंदू परिषद जिल्हा मंत्री संजय कुमार जमादार, विश्व हिंदू परिषद धर्म जागरण व धर्मांतरण जिल्हाप्रमुख जयदेव सुरवसे , उपस्थित होते. रक्तदान शिबिरात ८८ रक्तदात्यानी सहभाग नोंदवला. तसेच या कार्यक्रमास बजरंग दल हनुमान प्रखंड सहमंत्री महेश पाटील श्रीराम नवमी समिती होटगी रोड कार्याध्यक्ष राम मोरे आनंद डांगे, पुण्यश्लोक साम्राज्य अध्यक्ष चंद्रशेखर पाटील, प्रदेशाध्यक्ष निखिल घोडके, बजरंग दलाचे श्रीकांत धुमाळ, बजरंग दल हनुमान प्रखंड संयोजक महेश जगझापे, कार्याध्यक्ष दीपक जळके तसेच अक्षय ब्लड बँक आदिंनी परिश्रम घेतले. या शिबिराचे वैशिष्ट्य

# शिवाजी प्रशालेत गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

छत्रपती शिवाजी प्रशालेत स्वातंत्रदिन साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांनी केले. व एनसीसी विद्यार्थांना शपथ दिली. यावेळी व्यापारी आनंद लोणावत, कॅनरा बँक मॅनेजर मोहित सिंग, वल्लभ भांगरिया, अनुप भांगरिया, मेलगे पाटील, आर्मी नाईक उदयसिंग शिंदे लाभले. सुरुवातीस माजी उपमुख्याध्यापक अनिल लोंढे आणि विद्यार्थी यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि ध्वजगीत गायले. प्रशालेतील एनसीसी, आरएसपी, स्काऊट गाईड च्या पथकांनी अध्यक्ष आणि प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देऊन उत्कृष्ट असे संचलन सादर केले. यावेळी अंश शिंदे या मुलाने देशभक्तीपर गीत सादर केले. यावेळी १० वी बोर्ड परीक्षेत प्रशालेत प्रथम आलेला निसर्ग पंडित याचा सत्कार करण्यात आला. तसेच विषयात प्रथम आलेल्या मुलांचाही सत्कार करण्यात आला. राज्यस्तरीय स्क्वॅश स्पर्धेत निवडलेल्या ओम यादव व राष्ट्रीय खेळाडू अमृता गुंफेकर हीचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सारिका पंडित यांनी केले.



# स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी वि. गु. शिवदारे अण्णा

सर्वसामान्य लोकांमधील लोकांकडून असामान्य कामगिरी करून घेणाऱ्या नेत्यांमध्ये सर्वोच्चस्थानी असलेले, देशाच्या सर्वांगीण परिवर्तनात सर्वोत्तम योगदान देणारे, स्वच्छ विचाराने वैचारिक प्रामाणिकपणा जपणारे, थोर व्यक्तीमत्व म्हणजे स्वातंत्र्यसेनानी, सहकार महर्षी वि.गु. शिवदारे अण्णा होय.

१७ ऑगस्ट १९२६ ते ८ ऑगस्ट २००८ असा हा जवळपास ८२ वर्षाचा काळ, कर्तत्वाच्या उत्तुंगाचे वलय, समर्पिताचा आशय आणि चिंतनाचा विषय. त्यांच्या कार्याची, विचाराची उजळणी करताना हे जाणवते की, ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत असलेल्या प्रशासनाच्या सर्व पातळ्यांवरती दूरदृष्टी ठेवून अण्णांनी नेतृत्व केले. अण्णांकडे जन्मजातच विश्वास आणि निष्ठेचे संस्कार असल्यामुळे त्यांनी जनतेपर्यंत आपले उद्दिष्ट पोहोचविले. कल्पलेले लक्ष नियोजनबध्द पध्दतीने, धोरणात्मकरितीने पूर्ण केले. प्रतिकुल परिस्थितीला त्यांनी संधीत रूपांतर करून सर्वसामान्य लोकांकडून असामान्य कामगिरी करून घेतली. म्हणूनच तेच जनतेच लोकनायक बनले. १९६२ ते १९७७ या कालावधीमध्ये अण्णा तीन वेळा आमदार बनले. दक्षिण



सोलापूर तालुका ही कर्मभूमी मानून संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या कार्यकतृत्वाची ओळख करून दिली. विधानसभेत भाषण करताना सामान्य माणसाचे प्रश्न मांडताना महत्वपूर्ण विषयाकडे ते कलात्मक पध्दतीने सभागृहाचे लक्ष वेधायचे. ते मराठी आणि कानडी भाषा या संदर्भात त्यांनी बऱ्याचवेळा कठोर भूमिका मांडलेली दिसून येते. ते म्हणाले होते की, 'मी जर कानडी असलो तरी माझं अस्तित्व, माझं जगणं महाराष्ट्राच्या मातीशी एकनिष्ठ आहे. आम्ही सर्व कानडी भाषक महाराष्ट्रातच राहणे पसंत करू' असे मत विधानसभेत प्रखरपणे मांडली. मराठी माणूस आणि शेतकरी यांच्याशी एकनिष्ठ नातं अण्णांचे दिसून येते. सन १९५९ रोजी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पायाभरणी करून त्यांनी शेतकऱ्याशी असलेले आपले नाते जपले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग या गावी स्वामी समर्थ सूतगिरणी स्थापन करून त्यांनी कामगार वर्गाला औद्योगिकीकरणाशी जोडले.


समाजकारण, सहकार, राजकारण यांच्या आदान प्रदानाच्या नियमाला गती दिली. राजकारण आणि राजकीय तत्वज्ञान यांच्याशी राजकीय सिध्दांताचा संबंध असला तरी त्यापेक्षा सामाजिक जाणीवेचा समाजकारणाचा सिध्दांत वेगळा असतो याचे अचूक ज्ञान अण्णांना अवगत होते. म्हणूनच तेच जेष्ठ सामाजिक तज्ञ, सहकार तज्ञ, शिक्षण तज्ञ, राजनिती तज्ञ बनले. त्यांची भूमिका आज जनतेच्या समोर आहे. अण्णांनी धार्मिक व सामाजिक भेदांच्या दऱ्या बुजविण्याचे काम केले. जनतेशी आपली नाळ जोडून नातेसंबंध जपले. अण्णांनी सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., श्री स्वामी समर्थ सह. सूतगिरणी, वळसंग, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ यांची स्थापना केली. या शैक्षणिक संकुलामध्ये कॉलेज ऑफ फार्मसी, व्ही.जी. शिवदारे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, युनिक इंग्लिश मिडीयम स्कूल, व्ही. जी. शिवदारे बायोटेक्नॉलॉजी कॉलेज असे शैक्षणिक संकुल उभारले. त्याचबरोबर मॉलची संकल्पना अस्तित्वात नसताना अण्णांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. घाऊक व किरकोळ भांडार याची निर्मिती केली. म्हणूनच समाजात त्यांचे स्वतंत्र अस्तित्व उभारले. दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार म्हणून त्यांनी राजकीय क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविला. त्याचबरोबर विधी मंडळात प्रतोद म्हणून त्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे केली. या भाषणाची विरोधकांनीसुध्दा प्रशंसा केली.

अण्णांनी जे स्वीकारले ते आजीवन जीवापाड जपले. व्यक्तिगत अडसर कुठेच येऊ दिला नाही. ज्याला ज्या मार्गाचा अवलंब करावयाचा आहे ते करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. काळाच्या पावला बरोबर चालण्याचा नियम कटाक्षाने पाळला. अडचणी येत गेल्या पण सामाजिक, राजकीय निष्ठा त्यांनी कधी बदलली नाही. त्याप्रमाणे भूमिपुत्राचे नाते विसरले नाहीत. इतिहासाने असे सिध्द करून दाखविले आहे की, जी माणसे अशक्यप्राय गोष्टी प्रत्यक्षात आणण्याचे धाडस करतात तीच माणसे प्रत्येक क्षेत्रातील मानवी मर्यादांचा भंग करून पुढे जातात. मग ती क्षेत्रे विज्ञान, औषधनिर्माण, शिक्षण, कला, क्रिडा, तंत्रज्ञान, राजकारण, समाजकारण, सहकार अशी कोणतीही असोत. याचा मूर्तीवंत अविष्कार म्हणजे अण्णा होत. अण्णा एक सृजनशील नेते होते. त्यांनी अशक्य वाटणाऱ्या गोष्टीवर विचार करून त्यावर अंमलबजावणी केली होती. म्हणूनच त्यांचे नांव इतिहासात कोरले गेले आहे. आपल्या कल्पनाशक्तीच्या मर्यादा ओलांडून जग बदलून टाकणाऱ्या या उत्तुंग व्यक्तीमत्वाला त्यांच्या जयंतीदिनी त्रिवार अभिवादन !

**- डॉ. दामोदर दगडू बनसोडे,**
**व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स, सोलापूर**
**मो.नं. ९६०४३५२७०८**

# स्वातंत्र्य सैनिक मोतीराम सोनार यांचे देशासाठी योगदान

स्वातंत्र्य पूर्वकाळात अंदाजे सन १९३७ ते १९४० या काळात देशातून राज्या राज्यातून इंग्रजांविरोधात अतितीव्र भावना लाट उसळली. सोलापूर येथून हिंदू महासभेचे नेते श्री विष्णूपंत रामराव पाटील (वि. रा.पाटील) यांनी इंग्रजांच्या विरुद्ध चळवळ लढा तिव्र होण्यासाठी हनुमान व्यायाम शाळातील सोलापूर येथील काही निवड मल्ल व देशप्रेम असणाऱ्यामधील श्री मोतीराम दासोब सोनार भुमकर यांना चळवळीत घेवून सभा, मोर्चे, आंदोलने तिव्र केले. यामध्ये इंग्रजांनी सावरकर यांची सुटका करावी व भारत सोडावे. वंदे मातरम् या घोषणा व तिव्रतेची दखल इंग्रजांनी घेवून अनेकांसोबत श्री मोतीराम दासोबा सोनार भूमकर यांना अटक करुन अडीचवर्षे ३० महिन्यांची शिक्षा ठोठावली. उस्मानाबाद, हैद्राबाद (नजीमाबाद) या ठिकाणी तुरंगात ठेवले. शिक्षा भोगत असतानाही झेलर समोर वंदेमातरम् म्हणाल्यामुळे श्री मोतीराम यांना झाडाला बांधून फटक्याची शिक्षणा देवून सुद्धा वंदे मातरम् म्हणाल्यामुळे सात दिवसांची अंधार कोठडीची अत्यंत घातक क्रूर शिक्षा दिली. कालांतराने शिक्षा कालावधी पूर्ण (३० महिन्यांचा) केल्यावर सुटका झाली.



श्री मोतीराम यांच्या या देशासाठीचे योगदान पाहून देश स्वातंत्र्यानंतर सन १९७२/ १५ ऑगस्ट या दिवशी तात्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी श्री मोतीराम यांना दिल्लीत बोलावून सन्मान करुन ताम्रपट बहाल केले. पुढे महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांनी श्री मोतीराम यांना मुंबईत बोलावून महाराष्ट्र शासन सन्मान पत्र गौरवचिन्ह बहाल केले. (दि.३०/११/१९७३ रोजी) पुढे वृद्धापकाळाने श्री मोतीराम दासोबा सोनार (भूमकर) यांनी सन ३१/१/२००० या दिवशी जगाचा निरोप घेतला. अशा अनेक स्वातंत्र्यविरांना व माझे वडील श्री मोतीराम दासोबा सोनार (भूमकर) यांना त्रिवार वंदन अभिवादन. हैद्राबाद येथे दि. २९/१०/१९७२ रोजी धर्मसंस्कृती राष्ट्ररक्षणार्थ आंदोलने सत्याग्रह केल्याने स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतल्याने प्रशस्ती पत्र प्रदान केले.

**- जगदीश भूमकर,**
**सोलापूर**
**९९६०३८३७९२**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मार्ड संघटनेच्या निवासी डॉक्टरांचा संप

## कोलकातामध्ये निवासी महिला डॉक्टरांवर झालेल्या अत्याचाराचा व्यक्त केला निषेध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि १६ ऑगस्ट-**

छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालय अर्थात सिव्हिल हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या मार्ड संघटनेच्या निवासी डॉक्टरांनी बेमुदत संप पुकारला आहे. कोलकाता इथल्या शासकीय दवाखान्यात कार्यरत असणाऱ्या निवासी महिला डॉक्टरांवर झालेल्या अत्याचार आणि खून या गंभीर घटनेचा निषेध व्यक्त करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.



राज्यातील तसेच देशातील विविध शासकीय रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या निवासी महिला डॉक्टर, तसेच नर्स स्टाफ आणि म हिला कर्मचारी यांचे जीवन कठीण झाले आहे. महिला डॉक्टरांवर अत्याचार केले जात आहेत. अत्याचाराचे आणि खूनाचे गंभीर प्रमाण वाढलेले आहे. तरीदेखील याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. पश्चिम बंगाल राज्य शासन आणि कोलकाता इथले स्थानिक प्रशासन या गंभीर सम स्येकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करत आहे. जोपर्यंत मृत पावलेल्या निवासी महिला डॉक्टरांच्या पीडित कुटुंबांना न्याय मिळत नाही. तोपर्यंत संघटना बेमुदत आंदोलन सुरूच ठेवेल असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. यावेळी सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटलच्या ए ब्लॉक समोर यावेळी निवासी डॉक्टरांनी जोरदार निषेध नोंदवत निदर्शने केली. याप्रसंगी वैशंपायन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टर उपस्थित होते.

### महिला डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षा उपलब्ध करावी

देशातील आणि विविध राज्यातील शासकीय रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या निवासी महिला डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे गरजेचे आहे. अशा नंदिनीय घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. या घटनेला चाप बसावा यासाठी सुरक्षा रक्षक उपलब्ध करून द्यावेत अशी आमची संघटनेची तीव्र मागणी आहे.

**- डॉ. शुभांगी चव्हाण,**
निवासी डॉक्टर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर.



**सोलापूर : दैनिक तरूण भारत कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त व्यवस्थापक विनायक पुला यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शरणप्पा शाबादे, सटवाजी गायकवाड, कुलकर्णी, वामन आदी.**


**सोलापूर : तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष, महापालिकेतील गटनेते किसन जाधव आणि ज्येष्ठ पदाधिकारी हेमंत चौधरी आदी.**

## संक्षिप्त वृत्त



### व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मेडीयम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

पूर्व भागातील यल्लालिंग मठ नजीकच्या व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मेडीयम स्कूलमध्ये ७८ वा स्वातंत्र्यदिन पत्रकार वेणुगोपाळ गाडी यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेचा माजी विद्यार्थी तेजस गाडी याचा बी. टेकमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विविध स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी यावेळी देशभक्तीपर भाषण केले तसेच आयपीएल २०-२० वर्ल्ड कप विजेता झालेल्या भारतीय संघाचे सादरीकरण करण्यात आले. मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी यांनी प्रास्तविक केले. अश्विनी बोकडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन वरलक्ष्मी पलगंटी, अरुणा चिलवेरी यांनी केले. आभार माधुरी गाढवे यांनी मानले. कार्यक्रमास उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा आदी उपस्थित होते.

### अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिनाचा सोहळा न्यूज विशेष कार्यक्रमाचे वरीष्ठ व्यवस्थापक राजकुमार आर. के. शास्त्री आणि २०२४च्या माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय श्लोक पुंजाल व देविका डक्का व नंदिनी दोंता व शंकर बिराजदार यांच्या उपस्थितीत पार पडला अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.अजय पोन्नम उपस्थित होते. अंजली रगबले व तोषिता पोन्नम यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध संचलनानंतर विद्यार्थ्यांनी इंग्लिश, हिंदी व मराठीत भाषणे सादर केली. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी २००३ मध्ये जम्मू काश्मीर मध्ये पार पडलेल्या ऑपरेशन सर्पविनाश मध्ये दहशतवाद्यांना कंठस्नान घालताना वीरमरण प्राप्त झालेल्या पॅराट्रुपर संजोग छेत्री यांच्या पराक्रम ावर आधारित नाटिका सादर केली. भरतनाट्यम शास्त्रीय नृत्य परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थीनींना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. राधाराणी रापेल्ली हिने रांगोळीतून नेताजी सुभाषचंद्र बोस यांची प्रतिकृती साकारली. यावेळी संचालिका सुलक्षणा पोन्नम, पर्यवेक्षिका तस्नीम शेख, ज्योती आडम, रजनी सग्गम, चन्नेश इंडी आदी उपस्थित होते.








## प्रिसिजनमध्ये कर्मचारी, अधिकाऱ्यांनी दिली राष्ट्रध्वजास मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

सोलापूर स्थित प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेड कंपनीमध्ये स्वातंत्र दिनी सुरक्षा रक्षकांनी तिरंगा झेंड्यास परेड करून म ानवंदना दिली.

यावेळी कंपनीचे एच आर विभागाचे जनरल मॅनेजर राजकुम ार काशीद म्हणाले, देशभक्त क्रांतिकारणकांच्या बलिदानामुळे आपल्याला हे स्वतंत्र मिळाले आहे, हेय बलिदान व्यर्थ ना जाओ. आज देशाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी शिस्त, सामाजिक स्वच्छता व मेहनत करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव देशपांडे यांनी केले. संदीप पिसके यांनी आभार मानले.

## जिल्हाधिकाऱ्यांनी 'त्या' पुरवठा निरीक्षकांवर कारवाईचे आश्वासन दिल्याने रेशन दुकाने पूर्ववत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

पंढरपूर तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक सदानंद नाईक यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी करिता या मागणीसाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेच्यावतीने संप पुकारण्यात आला होता. स्वातंत्र्यदिनी हे आंदोलन सुरू झाल्यावर जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या आंदोलनाची दखल घेत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना चौकशी अहवालावरून पुढील कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर रेशन दुकाने पुन्हा दुपारपासून पूर्वतत सुरू करण्यात आली.



पंढरपूर तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षकाविरुद्ध आलेल्या तक्रारीवरून प्रशासनाने चौकशी समिती नेमली होती. पण चौकशी समितीचा अहवाल न आल्याने संबंधित पुरवठा निरीक्षकाविरुद्ध अद्याप कारवाई झालेली नाही. त्यामुळे सोलापूर जिल्हा संघटनेने पुणे पुरवठा विभागाचे उपायुक्त, जिल्हा पुरवठा अधिकारी,अन्नधान्य वितरण अधिकारी यांना निवेदनाद्वारे १५ ऑगस्टपासून संपाचा इशारा दिला होता. त्यानुसार संघटनेने स्वातंत्र्य दिनापासून आंदोलन सुरू केले होते. पुरवठा निरीक्षक सदानंद नाईक यांच्याविरुद्धच्या तक्रारीवरून संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांना तात्काळ अहवाल सादर करण्याचे आणि अहवालानंतर ते दोषी आढळल्यास विभागीय चौकशी व निलंबनाची कारवाई करू असे आश्वासन आशीर्वाद यांनी दिले. तसेच जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्रभर चाललेल्या सर्वर डाऊनमुळे अनेक नागरिक धान्यापासून वंचित आहेत. त्यांना पुन्हा वेठीस धरू नका अश्या सूचना देत संप माघार घ्यावा अशी सूचना केल्यनंतर संघटनेने आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले. गुरुवारी दुपारनंतर धान्य वाटपास सुरुवात झाली.

याप्रसंगी जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर, पंचकमिटी शिवकुमार चकोले, बापूसाहेब गंदगे, शिवशंकर कोरे, जिल्हा उपाध्यक्ष वहाब शेख, उमेश आसादे, जिल्हा सचिव राज कमटम, राजशेखर जवळे, बसवराज बिराजदार, वसीम शेख, पंढरपूर तालुकाध्यक्ष शरद पवार, उपाध्यक्ष दिलीप पावले, जिल्हा संघटक समाधान रोंगे यांच्यासह सर्व जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच जिल्हा संपर्क प्रमुख नितीन पेंटर उपस्थित होते.

## रक्षाबंधन १९ ऑगस्ट रोजी दिवसभरात कधीही करता येईल

**पंचागकर्ते मोहन दाते**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

राखी पौर्णिमा अर्थात बहिणीने भावाच्या हाताला राखी बांधणे. याकरिता भद्रा वर्ज्य नाही आणि राखी बांधण्यासाठी कोणत्याही वेगळ्या मुहूर्ताची आवश्यकता नाही. त्यामुळे भद्राचा विचार न करता १९ ऑगस्ट २०२४ रोजी सोमवारी नेहमी प्रमाणे राखीपौर्णिमा साजरी करावी असे पंचागकर्ते मोहन दाते यांनी सांगितले.

पूर्वीच्या काळी रक्षाबंधनाचा अर्थ बहिणीने भावाला राखी बांधणे एवढाच अभिप्रेत नव्हता, त्याकाळी रक्षाहोम करून रक्षासूत्र तयार करून ते राजाला बांधले जायचे, अशा पद्धतीने रक्षाबंधन विधिवत करणाऱ्यांनी भद्राकाल वर्ज्य करावा. तसेच रक्षाबंधन हा मुंज, विवाह, वास्तु प्रमाणे मंगल कार्यासारखे नसून सामाजिक व कौटुंबिक उत्सव असल्याने भद्रा असतानाच्या काळात म्हणजे दिवसभरात आपल्या सोईने केंव्हा ही करता येईल असे आमचे मत असल्याने दाते पंचांगात रक्षाबंधनाची वेळ दिलेली नाही. ज्यांना रक्षाबंधन विधिवत् करावयाचे आहे त्यांनी खालील प्रमाणे विधी करावा व त्यासाठी भद्राकाल वर्ज्य करावा म्हणजे दुपारी १ वाजून ३३ मिनिटानंतर रक्षाबंधन करावे.

येन बद्धो बलीराजा दानवेन्द्रो महाबलः । तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ।।

मात्र या शिवाय प्लास्टिक, स्पंज, इत्यादी पासून तयार केलेली बाजारात मिळणारी वेगवेगळ्या प्रकारची राखी बांधावयाची असेल तर भद्राकाळात सुध्दा असे रक्षाबंधन करता येईल. असा हा बहीण - भाऊ, मित्र, समाज बांधव यांच्यातील सामाजिक सलोखा राखणारा हा रक्षाबंधन उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करावा, असेही दाते यांना सांगितले.



### रक्षाबंधन विधी

तांदूळ, सोने व पांढऱ्या मोहऱ्या किंवा दूर्वा , अक्षता, केशर, चंदन, मोहरी चे दाणे एकत्र करून त्यांची रेशमी कापडात पुरचुंडी बांधून त्याला रंगीत दोरा बांधून रक्षा अर्थात् राखी तयार करावी आणि ती देवघरात कलशावर ठेऊन तिची पूजा करावी. नंतर पुढील मंत्र म्हणत ती राखी बांधावी.

## लेखापरीक्षणातील २७५ त्रुटी काढून टाकण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता

### सीईओ आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली १२ ते १४ ऑगस्ट या कालावधीत महालेखाकार मुंबईकडून महाशिबीर आयोजीत केले होते. या महाशिबिरात जिल्हा परिषद, ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील लेखापरीक्षणातील ३३२ त्रुटी काढून टाकण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली असून, यामध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे व सहकाऱ्यांनी कामगिरी पार पाडली.




या शिबिरात उपमहालेखाकार जिष्णू जे राज, वरिष्ठ लेखापरिक्षा अधिकारी राघवेंद्र राऊत, मोहम्मद रजा, अनिल खरात उपस्थित राहून परिच्छेद निपटारा करणेकामी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेकडे २००५ ते २०२३ अखेर परिच्छेद प्रलंबित असल्याने विशेष महाशिबीर आयोजीत केले होते. या शिबीरात जिल्हा परिषद व ग्रामपंचायत विभाग यांनी ३३२पैकी २७५ परिच्छेदांचा निपटारा करण्याची जिल्हा परिषदेमधील संबधित अधिकारी व कर्मचारी यांनी कामगिरी केली. त्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी मोठया प्रमाणांत प्रलंबित असणारे परिच्छेदांचा निपटारा केलेने सर्वाचे कौतुक केले आहे. महाशिबीर यशस्वी करण्यांस मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) इशाधीन शेळकंदे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी चंदकांत पाटील, सहाय्यक लेखाधिकारी हरीष म्हेत्रस, कनिष्ठ लेखाधिकारी,अंकुश खेलबुडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सिद्धराम बोरुटे यांनी परिश्रम घेतले.

# देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत सोलापूरचा लढा ऐतिहासिक

## ● जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद : जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय ध्वजारोहणप्रसंगी प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास हा सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढ्याचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. ब्रिटिशांच्या १५० वर्षाच्या राजवटीत मार्शल लॉची अंमलबजावणी झालेले एकमेव सोलापूर होते. त्यामुळे सोलापूरचा स्वातंत्र्यलढा हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक ऐतिहासिक लढा होता, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, पालिका आयुक्त शितल उगले-तेली, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, वैशपांयन वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. संजीव ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, तहसीलदार श्रीकांत पाटील उपस्थित होते.



विकासाच्या दिशेने वाटचाल करणारा जिल्हा सर्वच क्षेत्रात चांगली प्रगती करत आहे. सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनही सहकार्य करत आहे. प्रशासनही शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचतील यासाठी प्रयत्नशील असल्याचे, यावेळी आशीर्वाद म्हणाले.

**● जिल्हाधिकारी कार्यालयात पुरस्कार वितरण सोहळा**

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक तीन सोलापूर संतोष कुमार व्यंकटराव देशमुख यांना उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना शाखा जयश्री पंच उत्कृष्ट नायब तहसीलदार, आस्थापना शाखा लक्ष्मीकांत आयगोळे उत्कृष्ट अव्वल कारकून, महसूल शाखा अविनाश स्वामी उत्कृष्ट महसूल सहाय्यक, महसूल शाखा गणेश जगताप उत्कृष्ट शिपाई यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

**● पोलीस आयुक्त कार्यालय**

नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल विशेष सेवा पदक सहाय्यक पोलीस निरीक्षक नानासाहेब बाळू सावंत व पोलीस उपनिरीक्षक नागेश आप्पासाहेब येणपे यांना तर पोलीस दलामध्ये उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सुनील हांडे यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पोलीस आयुक्त एम राजकुमार व पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले. तर जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाचे मुख्य लिपिक शाम सुरवसे यांना लेखाविषयक महत्त्वपूर्ण कामकाज केल्याबद्दल उत्कृष्ट मुख्य लिपिक म्हणून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वातंत्र्यदिन विशेष



### बीबीदारफळ सनराईज पब्लिक स्कूल

**सोलापूर :** स्वातंत्र्य दिनानिमित्त सनराईज पब्लिक स्कूल बीबीदारफळ येथे संगमेश्वर कॉलेजचे क्रीडाशिक्षक प्रा.संतोष खेंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष हनुमंत चव्हाण यांनी अध्यक्षपद भूषवले. याप्रसंगी मुख्याध्यापिका प्राजक्ता चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन माने यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य, डंबेल्स, कवायती व भाषणे सादर करून स्वातंत्र्य दिन साजरा केला.



### शमा उर्दू शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम

**सोलापूर :** शमा उर्दू शाळेत स्वातंत्र दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अय्यूब नल्लामंदू होते. प्राचार्य अबुबकर नल्लामंदूनी सर्वांचे स्वागत करत स्वातंत्र दिवसाचे विषद केले. यावेळी माजी मुख्यध्यापक अ.कुद्दूस नल्लामंदू यांच्या हस्ते मुलाना खाऊ वाटप करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतलेल्या सर्व मुला-मुलींना भेट वस्तू प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आल्या. अबरार अय्यूबनी सूत्रसंचालन केले तर दिलशाद अ. रजाक यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यास्मीन बिजापूरे ,जुबेदा सैदखां, आसिया बिजापूरे, मेअराज अल्लोळी, अबरार अय्यूब परिश्रम घेतले.




### पानगल प्रशालेत ध्वजारोहण

**सोलापूर :** एम.ए.पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एम. ए.पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, बेगम कमरुंन्नीसा कारीगर गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, महिला महाविद्यालय, यु. ई. एस.प्रायमरी स्कूलचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक सहभागी झाले होते. प्रमुख पाहुणे निकहत नल्लामंदू, अल्ताफ सिद्दिकी, हाजरा रचभरे, रुखसाना शेख, आरिफ पठाण होते. कार्यक्रमाची सुरुवात अब्दुल्लाह कमिशनर या विद्यार्थ्याच्या तीलावत ए कुरानने झाली. त्यानंतर आमिर बागवान व कमिशनर या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सूत्रसंचालन डॉ. सुरय्या परवीन जहागीरदार व झाकीर हुसेन शाहपुरे यांनी केले. प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान व डॉ. सुरय्या परविन जहागीरदार यांच्या हस्ते पाहुण्यांच्या सत्कार करण्यात आला करण्यात आले. कार्यक्रमात एम. ए.पानगल व बेगम कमरूंन्नीसा प्रशाले च्या एन.सी. सी कॅडेट्स, आर.एस.पी कॅडेट्सतर्फे मार्च पास करण्यात आले. सदर कॅडेट्स ना एन.सी.सी युनिटचे ए.एन.ओ आरिफ पठाण, नविद मूनशी, अब्दुल खालीक मुल्ला, सईदा दारूवाले, अनिसा नालबंद यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी आफरीन दंडोती, तहसीना पागान, डॉ. निकहत शेख, मुहम्मद अली शेख, वसीम नल्लामंदू उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहसीन माशाळ, मेहमूद खतीब, सना आवटे, इकबाल दलाल यांनी परिश्रम घेतले.



**सोलापूर : भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण करताना जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एकचे चेअरमन डॉ. एस. पी. माने, ज्येष्ठ संचालक विवेक लिंगराज, संचालक तजमुल मुतवली, विशाल घोगरे, चेतन वाघमारे, रोहित घुले, शिवानंद ममाने, श्रीधर कलशेट्टी ,सचिव दत्तात्रय देशपांडे, अशोक पवार, सुभाष काळे, विनोद कदम.**

# शिवालय आश्रम शाळा, ओम वैष्णव महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

**सोलापूर, दि १६ ऑगस्ट-**

शिवालय प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा व ओम वैष्णव कनिष्ठ महाविद्यालय तळे हिप्परगा तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर या आश्रम शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते झाला.



सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. तदनंतर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर, प्राचार्या कांचन वाघचवरे, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. दैनिक तरुण भारत या वृत्तपत्राच्या मुख्य संपादकपदी प्रशांत माने यांची निवड झाल्याबद्दल शाळा व संस्थेच्या वतीने त्यांना श्री विठ्ठलाची मूर्ती शाल देऊन त्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे इयत्ता दहावी व इयत्ता बारावी या वर्गामध्ये प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य वाघचवरे यांच्याकडून रोख रक्कम प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या पोलीस भरतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार सोहळा करण्यात आला. तदनंतर विद्यार्थ्यांनी समूहगीत, कवायत प्रकार, संगीत कवायत, मानवी मनोरे याचे उत्तमरीत्या सादरीकरण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली भाषणे केले यामध्ये त्यांनी देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्याचे अहुती मुळे आपणास हे स्वातंत्र्य मिळाले असे सांगितले.

त्यानंतर मुख्याध्यापिका प्राचार्य यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना अभ्यासात सातत्य, सचोटी, आत्मविश्वास याच्या जोरावर आपण कोणत्याही गोष्टीवर मात करून यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्याचप्रमाणे विविध उदाहरणातून नैतिक मूल्य देशप्रेम याबद्दल सांगितले. त्याचप्रमाणे शाळेतील विविध उपक्रम याबद्दल ही सांगितले. प्रमुख पाहुणे प्रशांत माने यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या गोष्टीतून आपण देशसेवा करू शकतो. याचे उदाहरण सांगितले. आणि अशा छोट्या छोट्या गोष्टीतून आपण देशसेवेचे कार्य करावे असे सांगितले. संस्थापक अध्यक्ष यांनी आपल्या भाषणात देशासाठी बलिदान दिलेल्या थोर हुतात्म्यांची माहिती सांगितली. सूत्रसंचालन नेताजी इंगळे यांनी केले. सुनील दुधाळ यांनी आभार मानले.



## ठोकळ प्रशालेत स्वातंत्र दिनानिमित्त विविध उपक्रम

**सोलापूर, दि १६ ऑगस्ट-** इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विविध उपक्रमांनी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेच्या उपाध्यक्षा शिल्पा ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे तर प्रमुख पाहुणे म्हणून विजापूर रोड पोलीस ठाण्याचे माजी पी.एस.आय. सुरज मुलाणी तर पालक सदस्या कुंभार, स्वामी, कोळे, प्राचार्य डी. डी. गाजरे यांची प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. ही प्रभात फेरी निर्मल सोसायटी, निर्मिती विहार, साई होम्स, आदित्यनगर, आर टी. ओ. कार्यालय, या मार्गावरून काढण्यात आली. विभागीय स्तरावरती निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे तसेच चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांना भेटवस्तू, प्रमाणपत्र, रोख रक्कम, देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त रितेश राऊत, युक्ता महिंद्रकर, सारा शेख, सुशील कोळी, साक्षी राठोड, मयुरी तुरबे स्वाती कुसगल, आराध्या जाधव,समर्थ माने यांनी मराठी, इंग्रजी, कन्नड, गोरमाटी, संस्कृत इत्यादी भाषांमध्ये देशभक्तीपर भावना व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.एच. चव्हाण तर आभार प्रदर्शन यु. एस. पवार यांनी मानले.

## 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' पुरस्कार सोहळ्याची घोषणा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-** 'मराठी कलांचा, गुणांचा प्रतिभा प्रशंसा सोहळा...' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली आहे.

या सोहळ्याच्या निमित्ताने मराठी नाटक-चित्रपट क्षेत्रातील अभिनेते-अभिनेत्री-तंत्रज्ञ एकत्र येणार आहेत.'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' मध्ये सहभागी होण्याकरीता नाटक-चित्रपट निर्मात्यांना प्रवेश अर्ज भरून आपल्या कलाकृतीची एन्ट्री पाठवता येईल.सध्या पुण्यातून विविध क्षेत्रात 'आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज' आपला विस्तार करीत आहे.

## नेताजी शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-** श्रमजीवी नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्षा लक्ष्मी चिलवेरी, सहसचिव बुडप्पा चिकनी, शालेय समितीचे उपाध्यक्षा उमा पगड्याल, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते.

प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर पालक शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षा लक्ष्मी चिलवेरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी इयत्ता दहावी, बारावी,आय. टी.एस. व संगीत परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या राजराजेश्वरी संगीत विद्यालयचे विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. बालरोग तज्ञ डॉ.डी. पी नकाते यांच्यातर्फे विजयालक्ष्मी देगील, शिरीषा बोगा, नरसिम्म अन्नम या विद्यार्थ्यांनीना 'सौ. जनाई मेमोरियल पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले यांच्यातर्फे विजयालक्ष्मी देगील, कोमल मुचंडी, वैष्णवी सुंदूपटला, वैष्णवी घंटे लावण्या मिसालोलू, लहरीका गोने, ललिता रॅका,कावेरी पगड्याल, रक्षिता सुंकनपल्ली व इरेश अक्का या विद्यार्थ्यांना 'शिव-कला पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. कै. मलप्पा धुमशेट्टी यांच्या स्मरणार्थ माजी प्राचार्य सुभाष धुमशेट्टी यांच्याकडून तसेच कै.बसवराज कुंभार यांच्या स्मरणार्थ मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांच्याकडून दहावीत प्रथम आलेल्या विजयालक्ष्मी देगीलला रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला तसेच शिवानंद पुजारी यांच्याकडून 'श्री महासिद्ध विद्या प्रतिष्ठान पुरस्कार' देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नाटिका, गीत सादर केले. त्यानंतर श्रेयस पाटील, श्रेयश चप्पळगे,रिया बारड,सार्थक चिंचोळी, श्रेयश हरसुरे, साईकिरण कैंचगुंडी,अवनी अलदी,अंकिता कस्तुरी, सिद्धिविनायक कुंभार, ओंकार मंगरुळे,स्नेहा म्हेत्रे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले.

## नॅशनल ईटीग्रेटेड मेडिकल असोसिएशनमध्ये ध्वजारोहण



**सोलापूर, दि १६ ऑगस्ट-** निमा सोलापूर शाखेतर्फे दरवर्षाप्रमाणे याही वर्षी निमा भवन येथे ध्वजारोहण निमाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.विनायक टेंभुर्णीकर यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी ध्वजारोहणाचा मान महिला आघडवीच्या सदस्यांना देण्यात आला. झेंडावंदनानंतर राष्ट्रगीत गाऊन राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. कार्यक्रमास निमा वुमन फोरम महाराष्ट्राच्या अध्यक्षा डॉ. मुंडेवाडी, निमा महाराष्ट्र कायदे सल्लागार डॉ.धनंजय कुलकर्णी तसेच शाखेचे सचिव डॉ. सचिन बोंगरगे, खजिनदार डॉ.नागनाथ जिड्डीमनी, महिला आघाडीच्या अध्यक्षा डॉ. सारिका होमकर, खजिनदार डॉ. अगवणे, डॉ . नितीन बलदावा, डॉ.बूब, डॉ. पुजारी, डॉ. कंटीकर, डॉ. सावळे आदींची उपस्थिती होती. डॉ. सचिन बोंगरगे यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.



## अराईज स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-** हत्तुरे वस्ती येथील अराईज इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. ध्वजारोहण माजी मुख्याध्यापक कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख पाहुणे ज्येष्ठ नागरिक नामदेव फुलारे, राम गायकवाड, कांबळे, प्रशांत रेटरे, लक्ष्मण किणीकर, रुद्राप्पा कांबळे, प्रशिक चलवादी, ओंकार हत्तुरे, श्रीशैल प्याड शिंगे, सुरेश हुगार, सिद्धार्थ हत्तुरे, संदेश हत्तुरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. अश्विनी कांबळे यांनी केले. तसेच लहान मुलांना व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. आभार शिक्षिका कस्तुरी मायनाळे यांनी केले.

## स्वातंत्र्याचे रक्षण करणे ही सर्वांचीच जबाबदारी : प्रा. मस्के

**सोलापूर, दि १६ ऑगस्ट-** आज आपण ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यात आपले सोलापूरही मागे नव्हते. आता या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे, असे विचार दयानंद महाविद्यालयातील इतिहासाचे गाढे अभ्यासक निवृत्त प्राध्यापक मारुती मस्के यांनी व्यक्त केले.



राज्य सारखी गृहनिर्माण संस्था आदित्य नगरी येथे पार पडलेल्या झेंडावंदन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन भारत जाधव काका होते. विद्यमान संचालक शहाबुद्दीन हुंडेकरी यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. संचालक गौतम शिंदे यांनी प्रास्ताविक करुन सर्वांचे स्वागत केले. पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन अरुणकुमार धुमाळ यांनी ध्वजगीत सादर केले.प्रा.डॉ महादेव देशमुख, सचिव प्रा.विलास मोरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. संस्था कोषाध्यक्ष बाळासाहेब नागणे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी गृहनिर्माण संस्था तथा आदित्य नागरी पतसंस्थेचे सर्व पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक अधिक संख्येने उपस्थित होते.

# हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रा उत्साहात

### श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा उपक्रम : भारतमातेचा अन् छत्रपती श्री शिवरायांचा झाला जयजयकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे गुरुवारी स्वातंत्र्य दिनानिमित्त हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली. या पदयात्रेत परमपवित्र भारतमातेचा आणि छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा जयजयकार तरुणांनी केला.

दरवर्षी स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे गुरुवर्य श्री संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील गावोगावी हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रा काढण्यात येते. सोलापूर महानगरपालिकेतील शासकीय झेंडावंदनानंतर सोलापूर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वाराजवळून या पदयात्रेस प्रारंभ झाला. पूर्व विभाग सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष संजय साळुंखे यांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे पूजन करण्यात आले. तसेच सामूहिक प्रेरणा मंत्र म्हणण्यात आला. यानंतर पांढरे शुभ्र कपडे आणि वारकरी टोपी परिधान केलेल्या अन् कमरेला भगवा शेला बांधलेल्या तरुणांनी पदयात्रेस प्रारंभ केला. 'पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय', 'धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज की जय', 'भारतमाता की जय', 'हिंदू धर्म की जय' अशा घोषणा देत, राष्ट्रभक्तीपर गीते म्हणत ही पदयात्रा निघाली. सोलापूर महानगरपालिकेजवळून सुरू झालेली ही पदयात्रा चार हुतात्मा पुतळा, सरस्वती चौक, जिल्हा मध्यवर्ती बँक, आझाद हिंद चौक, चौपाड श्री विठ्ठल मंदिर, शिवस्मारक, भागवत चित्रपटगृहमार्गे छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीसमोर विसर्जित झाली. या ठिकाणी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकऱ्यांनी केले. सामूहिक ध्येयमंत्राने पदयात्रेचा समारोप झाला. या पदयात्रेत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाचे धारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## श्री रामलिंगेश्वर संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.द.सोलापूर) श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण संस्थेचे खजिनदार काशिनाथ बिराजदार यांच्या हस्ते झाले. यावेळी २६ विद्यार्थ्यांनी इंग्रजी, हिंदी, मराठी व कन्नड भाषेत मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देऊन सन्मान केला. याप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थीनी सोनाली बिराजदार हिची राज्य पोलिस दलात निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी केले. सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# हर घर तिरंगा अन् सामाजिक उपक्रमांची रेलचेल

## स्वातंत्र्य दिनी सर्वत्र उत्साह; शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था, संघटना, शासकीय कार्यालयात देशभक्तीला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्यांचा ७८ वा वर्धापन दिन जिल्ह्यातील विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयात ध्वजारोहणासह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. बहुतांश ठिकाणी वृक्ष लागवड, वह्या, पुस्तके वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, यशवंत आणि कर्तृत्वान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. प्रभात फेरीसह देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रमही अनेक ठिकाणी झाले. या निमित्ताने हर घर तिरंगा अभियान राबविल्याने संपूर्ण गावे तिरंगामय दिसत होती.



**बलसागर भारत होवो... विश्वात शोभूनी राहो, विजयी विश्व तिरंगा प्यारा.. झेंडा उंचा रहे हमारा.. या उक्तीप्रमाणे अणदूर येथील हायवेच्या उड्डाण पुलावरील कामावरील परप्रांतीय मशीन चालकाने हा २०० फूट उंच ध्वज उभारून भारत मातेला सलाम केला. खरेच त्याचे देशप्रेम पाहून अणदूर परिसरातील नागरिक हरखून गेले. दिवसभर याच उंचच उंच तिरंग्याची चर्चा होती.**



**श्री मद्विरशैव पट्टसाली लिंगायत कोष्टी समाज सोलापूर संचलित चिन्नव्वा राचप्पा बाळी विद्यार्थी वसतिगृह येथे १५ ऑगस्टचे झेंडा वंदन समाज अध्यक्ष रावसाहेब शहाणे-पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी समस्त समाज बांधव व विश्वस्त उपस्थित होते.**

## स्वातंत्र्य दिन उत्साहात



### कुंभारीत महिला बचत गटाकडून हर घर तिरंगा अभियान

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत कुंभारी येथील महिला बचत गटाकडून बुधवारी घरोघरी तिरंगा मोहिमेबाबत लोकांना प्रेरणा देण्यासाठी आणि जागृती करण्यासाठी तिरंगा रॅली काढण्यात आली. कुंभारीच्या सरपंच श्रुती निकंबे, उपसरपंच ॲड. राजशेखर कोरे, मानव संसाधन व्यक्ती तनुजा जवळे, निर्मला जवळे यांनी कुंभारी ग्रामपंचायत येथून हिरवा झेंडा दाखवला. घरोघरी राष्ट्रध्वज लावून मोहिमेबाबत लोकांना जागृत केले. मानव संसाधन व्यक्ती यांच्या नेतृत्वाखाली महिला बचत गटाच्या सदस्यांनी सहभाग घेतला आणि घरोघरी राष्ट्रध्वज फडकवण्यासाठी हर घर तिरंगा मोहिमेबद्दल लोकांना जागृत केले. प्रत्येक घरामध्ये तिरंगा असतो, प्रत्येकाच्या हृदयात तिरंगा असतो , भारत माता की जय, वंदे मातरम् असे म्हणत बचत गटातील महिलांनी प्रत्येक घरापर्यंत तिरंगा पोहोचविला. महिला बचत गटाच्या सीआरपी निर्मला जवळे म्हणाल्या की, हर घर तिरंगा अभियानांतर्गत आजादी का अमृत महोत्सवांतर्गत देशभक्तीची सामूहिक जाणीव प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचे काम महिला बचत गटातील सदस्या करीत असल्याचे सांगितले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य शिवानंद आंदोडगी, सूरज पाटील, सचिन सुतार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### आदर्श पब्लिक स्कूल, ज्युनिअर कॉलेज, कुर्डूवाडी

आदिशक्ती शिक्षण संस्था वेताळवाडी संचलित आदर्श पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज कुर्डूवाडी या ठिकाणी ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान आपल्या पालकांसमवेत हर घर तिरंगा उपक्रमास भरघोस प्रतिसाद दिला. कर्नल दीपक ठोंगे यांच्या हस्ते वीर जवानांना आदरांजली वाहून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आंद्रप्रदेशचे शिक्षण मंडल अधिकारी जयप्रकाश रेड्डी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संचलन, कवायत, समूहगीत, देशभक्तीपर मनोगते, नृत्य सादर करण्यात आले. सूत्रसंचालन दीपज्योती भांगे, महुआ गोस्वामी यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे, संस्थेच्या प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, संचालक मोहन सुरवसे, दयानंद सुरवसे, प्रिंसिपल डॉ. सुधीर हाडके, मुख्याध्यापिका शकीला सय्यद, विभाग प्रमुख आयेशा मुलाणी,ण संचालिका आशाताई सुरवसे, वर्षाताई सुरवसे उपस्थित होते.



### लायन्स क्लब बार्शी, रॉयल, युनिक, चेतना, वृक्षसंवर्धन मंडळातर्फे वृक्षारोपण मोहीम

बार्शीतील सुलाखे हायस्कूल व परिसरात ५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. या वृक्षांचे संवर्धन ही करण्यात येणार आहे. ही मेगा ॲक्टिव्हीटी लायन्स क्लब बार्शी रॉयल, लायन्स क्लब बार्शी, लायन्स क्लब बार्शी युनिक, बार्शी क्लब बार्शी चेतना व वृक्षसंवर्धन, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. यासाठी अमित इंगोले, राहुल माढेकर, शरद पाटील, वृक्षसंवर्धन समितीचे साधारण ५० पदाधिकारी व सदस्य, चारही क्लबचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार व बरेच सदस्य यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. यावेळी लायन्स क्लब बार्शी रॉयलच्या अध्यक्षा वर्षा खांडवीकर, सचिवा अमृता गुंडेवार, खजिनदार राजूर कांकरिया आदी सदस्य व सदस्या उपस्थित होते.



### भगवंत मंदिरात ४८ जणांचे रक्तदान

बार्शी येथील भगवंत देवस्थान ट्रस्ट, बोधराज भक्त मंडळ व भूमी डेव्हलपर्स, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन हभप डॉ. जयवंत बोधले महाराज व आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बार्शी शहर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, एपीआय ढेरे, दादासाहेब बुडूख, जगदाळे, दीपक राऊत, भैय्या बारंगुळे, बापू चोबे, बापूसाहेब कदम, बाबासाहेब वाघ, संदीप नागणे आदी उपस्थित होते. यावेळी ४८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यासाठी श्री रामभाऊ शहा रक्तपेडीचे सहकार्य लाभले.



### विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर

पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्या शकुंतला नडगिरे, हभप ज्ञानेश्वर देशमुख-जळगावकर), व्यवस्थापक मनोज श्रोत्री, विनोद पाटील, राजेंद्र सुभेदार, चंद्रकांत कोळी, बलभीम पावले, सहाय्यक विभाग प्रमुख सावता हजारे, दादा नलवडे, भाऊसाहेब घोरपडे उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास व भक्तनिवास इमारतीस तिरंग्याची आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. मंदिर आकर्षक फुलांनी सजवले होते. मंदिरातील प्रवेशद्वार, चारखांबी, सोळखांबी, मंदिराबाहेर अशा ठिकाणी तीन रंगांच्या फुलांची आरास करण्यात आली होते. सदरची फुलांची आरास श्रीमंत दगडूशेठ मोरया प्रतिष्ठान पुणे यांनी मोफत करून दिली आहे. त्यासाठी त्यांनी केशरी झेंडू, स्पिंगर, शेवंती एक टन फुलाचा वापर केला.विठ्ठल गण सभा ट्रस्ट, तिरुअनंतपुरम यांनी सुमारे एक लाख २५ हजार किंमतीचे अन्नधान्य मोफत उपलब्ध करून दिले आहे. तसेच परंपरेनुसार दुपारी पोशाखावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस अलंकार परिधान करण्यात आले. सलग सुट्ट्यामुळे भाविकांची गर्दी झाली होती. सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने सुरक्षा रक्षकांची नेमणूक, व्हीआयपी दर्शन व्यवस्था निर्बंध, भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजाची संख्याही कमी करण्यात आली. तसेच चांगली स्वच्छता व्यवस्था, मजबूत बॅरेकेटिंग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, साबुदाणा-तांदळाची खिचडी, चहा वाटप करण्यात आले.

### वाय. पी. एज्युकेशन सोसायटी, बार्शी



बार्शी येथील मॉडेल हायस्कूलच्या प्रांगणात ध्वजारोहण बालरोग तज्ज्ञ डॉ. सुनील पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. ऑडिटर पुष्कर लड्डा हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक सचिव चिन्मय वालवडकर यांनी केले.यावेळी सुनील पाटील, भाऊसाहेब कांबळे, रविकिरण पोरे, राजेंद्र शेटे, दिवाकर नारकर, अनंत गायकवाड, नागनाथ देवकते, पुष्पा मोहिते, अनुराधा देशमुख, वैष्णवी हातोळकर, वैशाली कांबळे, म हाजन, संदेश घाडगे, रेखा गुंड, मुख्याध्यापिका शुभदा जोशी उपस्थित होते.



### कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

अक्कलकोट येथील महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिनी ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, दिगंबर जगताप, सिद्रामप्पा पाटील उपस्थित होते. तिरंगा कॅनव्हास, रांगोळी व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी, रविकिरण दंतकाळे, विद्या बिराजदार, निशिगंधा कोळी, पूजा कडगावकर यांनी प्रयत्न केले.



### दत्त प्राथमिक व दिलीपराव सोपल प्रशाला, बार्शी

बार्शीतील दिलीपराव सोपल प्रशाला व दत्त प्राथमिक विद्यामंदिरात स्वातंत्र्य दिन साजरा झाला. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष मोहन ठोंगे होते. यावेळी सचिवा तेजस्विताई ठोंगे, माजी सैनिक दत्तात्रय मोरे निकम मेजर, रंगा लक्ष्मण मोरे, माजी विद्यार्थी अशोक मोरे, अशोक गायकवाड, विनायक सुरवसे उपस्थित होते. प्रास्ताविक युवराज जगताप यांनी केले. अरुणा मठपतींकडून दहावीतील प्रथम माधुरी पांढरे, द्वितीय वेदिका तोडकरी, तृतीय वैष्णवी वाघमोडे यांना रोख बक्षिसे देण्यात आली. सूत्रसंचालन युवराज जगताप यांनी केले तर आभार प्र. मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे यांनी मानले.



### बार्शीच्या सोजर इंग्लिश स्कूलमध्ये वाहतूक नियमांवर प्रात्यक्षिक

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर इंग्लिश स्कूल बार्शीच्या प्रांगणात ७८ वा स्वतंत्रता दिनी डॉ. शीतल काजळे यांच्या हस्ते राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन आणि ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आधार भालेराव, मुख्याध्यापक संदीप पोळ, मुख्याध्यापिका रिटा नेटके, मुख्याध्यापिका गावकरे सचिन शिंदे आदी उपस्थित होते. आरएसपीच्या बाल जवानांनी पथसंचलन करत राष्ट्रध्वजाला म ानवंदना दिली. बॅन्डच्या तालावर वाहतूक नियमांच्या ११ प्रकारांचे प्रात्याक्षिक सादर केले. यासाठी शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे, तुषार गदगी, माणिक कुलकर्णी आणि शिक्षिका सोनाली नष्टे यांनी उत्कृष्ट संगीत संयोजन केले. सूत्रसंचालन बेद्रे व अनंत लंकेश्वर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मोटे यांनी करुन दिला तर आभार प्रदर्शन मस्के मॅडम यांनी केले.



### इरा पब्लिक स्कूल, चिखलठाण

चिकलठाण येथे इरा पब्लिक स्कूलचा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त सैनिक अनिल साखरे होते. यावेळी आकाश पोळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थाध्यक्ष डॉ. ब्रिजेश बारकुंड, उपाध्यक्ष हरिश्चंद्र बारकुंड, सदस्य बाबुराव अवसरे, बाबुराव लबडे, विकास गव्हाणे, वाघमोडे, पाटकूलकर, कोठारी, जाधव, शेवाळे, अध्यक्ष डॉ. बारकुंड, मुख्याध्यापक कसबे, ढेंबरे, ननवरे, माने, वाघमोडे, हराळे आदी उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थी, यशवंत शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. वर्षभर एकही सुट्टी न घेतलेल्या शिक्षिका पटकूलकर यांना रोख ५००० रुपये देऊन गौरविण्यात आले.

## मोडनिंबमध्ये नेत्रदीपक लेझीमचे सादरीकरण



मोडनिंब (ता. माढा) स्वांतत्र्य दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सोसायटी, श्री उमा विद्यालय, संजीवन विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोलिस दूरक्षेत्र आदी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील शाळा, महाविद्यालयात देशभक्तीपर कार्यक्रम, वक्तृत्व, स्नेहसंमेलन पार पडले. दत्त चौक येथे विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकांच्या नेत्रदीपक सादरीकारणाने उपस्थितांची मने जिंकली. शफीक फाऊंडेशन ने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. याबरोबरच शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी सभापती शिवाजी कांबळे, मीनल साठे, सरपंच लक्ष्मी पाटील, ऋतुजा सुर्वे, दत्तात्रय सुर्वे, सोमनाथ माळी, राहुल पाटील, अतुल गाडे, बाबुराव सुर्वे, हनुमंत कुंभार, प्रकाश इंगळे, दिग्विजय कांबळे, दीपक सुर्वे, सदाशिव पाटोळे, नितीन गडधरे, डॉ. संतोष दळवी, सुनील रेपाळ, निलेश गिड्डे, राहुल केदार, राजेश निंबाळकर उपस्थित होते.

### मोडनिंब येथील जि. प. शाळेच्या नवीन खोल्या बांधण्याची मागणी

मोडनिंब जि. प. शाळेच्या १५ खोल्या धोकादायक असून वर्गखोल्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. दोन्ही शाळेत पंधरा वर्गखोल्या धोकादायक झाल्याने दोन सत्रांत शाळा भरविण्याची वेळ शिक्षण विभागावर आली आहे. जवळपास ८५० विद्यार्थी असलेल्या या दोन्ही शाळांच्या पटसंख्येवर होऊ शकतो. धोकादायक वर्गखोल्या पाडून नवीन खोल्या बांधाव्यात अशी मागणी शिक्षक आणि पालकांनी स्वातंत्र्य दिनी केली आहे.




### बार्शीतील श्री वर्धमान जैन वाचनालयातर्फे वाचकांसाठी विमा

बार्शी येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयातर्फे स्वातंत्र्य दिनी श्री जैनाश्रमचे जेष्ठ श्रावक शांतीलाल पुनमिया व ताराबाई पुनमिया यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. मोफत पेपर वाचन विभागतील ३१ वाचकांना एक लाख रुपयांच्या विम्याचे वाटप श्री जैनाश्रमाचे अध्यक्ष जयचंद सुराणा, प्रदीपभाई बागमार यांनी केले. यावेळी सेक्रेटरी आनंद पुनमिया, अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धीरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, प्रमोद भंडारी, रुपेश कांकरिया, अशोक कांकरिया उपस्थित होते. सूत्रसंचालन संचालक धीरज कुंकूलोळ यांनी, प्रास्ताविक संचालक आनंद सुराणा यांनी केले. वाचकांचे डोळे तपासणी शिबीर घेऊन गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# चांदापुरी येथील युवकांची पोलीस दलात भरती

**पिलीव, दि. १६ ऑगस्ट-**

चांदापुरी येथील युवक निहार जमीर पठाण, अलियार खान, अजिज खान पठाण व रणजीत संजय वाघ यांची महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलात निवड झाली.

निहार जमीर पठाण यांची राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ७ दौंड, अलियार खान, अजिज खान पठाण यांची राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १० सोलापूर , रणजीत संजय वाघ यांची राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ३ जालना येथे निवड झाली. चांदपुरीच्या कन्या मनीषा पोपट मगर यांची अकलूज नगरपरिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी तर स्वप्नाली सर्जेराव कोपनर यांची महसूल सहाय्यक अधिकारी मंत्रालय मुंबई येथे एमपीएससीमधून निवड झाली आहे.





## संक्षिप्त वृत्त...



### बार्शीचे सुपुत्र डॉ. सागर कांबळे यांना राज्यपलांच्या हस्ते डॉक्टरेट पदवी प्रदान

**बार्शी, दि. १६ ऑगस्ट-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विदयापीठाचा पदवी दिक्षांत समारंभात बार्शीचे सुपुत्र डॉ. सागर कांबळे यांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते डॉक्टरे पदवी प्रमाणपत्र देण्यात आले. फार्मसी विषयातील तंत्रशास्त्र विद्यापीठाची पहिली डॉक्टरेट त्यांनी मिळवली आहे. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, महिला बालविकासमंत्री अदिती तटकरे, तसेच राज्यशासन नियुक्त कार्यकारी मंडळ सदस्य प्रवीण सरदेशमुख, अकॅडेमिक कौन्सिल मेंबर डॉ. अमित शेष उपस्थित होते. डॉ. अमित शेष यांचे त्यांना योगदान मिळाले. डॉ. सागर कांबळे म्हणाले की, आज माझ्या जीवनातील सर्वात आनंदाचा क्षण आहे. फार्मसी विषयात तंत्रशास्त्र विद्यापीठाची पहिली डॉक्टरेट मिळवणे ते ही महाराष्ट्राचे राज्यपालांच्या हस्ते माझ्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. कॉलेज जीवनापासूनच संघ स्वयंसेवक व विद्यार्थी परिषदेचे काम करत असताना संयम, संघर्ष, व्यवस्थापन काय असते हे शिकायला मिळाले.

### प्रा. डॉ. महेश निकत यांना सह्याद्रीरत्न पुरस्कार जाहीर; रविवारी होणार वितरण

**करमाळा, दि. १६ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त भारत सरकार सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय या विभागात नोंदणीकृत असलेल्या सह्याद्रीरत्न



महाराष्ट्र राज्य संस्थेमार्फत समाज, संस्कृतीचे संवर्धन व लोकशाही विचारांना एकत्र करणारा आणि जगण्याला ध्येय बनवणाऱ्या ऐतिहासिक गुणवत्तेचा सर्वश्रेष्ठ सन्मान व सह्याद्रीरत्न पुरस्कार वितरण सोहळा पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या सह्याद्रीरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान मान्यवरांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. यामध्ये ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट करमाळाचे संस्थापक प्रा. डॉ. महेश निकत यांचा समावेश आहे. प्रा. डॉ. निकत यांनी करमाळासारख्या शिक्षणापासून वंचित असलेल्या तालुक्यातील शिक्षण, सामाजिक तसेच झाडे लावा झाडे जगवा, अपघातग्रस्त लोकांना मदत करणे अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार जाहीर झाल्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक जाधव यांनी सांगितले. रविवारी १८ ऑगस्ट रोजी पत्रकार भवन, पुणे येथे पुरस्काराचे वितरण होणार आहे.



### अभियंत्या मृण्मयी राऊत यांची सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानला पाच हजारांची देणगी

**सांगोला, दि. १६ ऑगस्ट-**

सांगोला येथील रहिवासी व सध्या मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता या पदावर कार्यरत असलेल्या मृण्मयी नंदकुमार राऊत यांना पहिल्यापासूनच सामाजिक कार्याची आवड असल्याने त्यांनी आपल्या पहिल्या वेतनातून सांगोला तालुक्यात सामाजिक कार्यात अग्रगणी असलेल्या आपुलकी प्रतिष्ठान या संस्थेला ५००१ रुपयांची देणगी दिली. त्याबद्दल त्यांच्या कुटुंबाचा आपुलकीकडून सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, अरविंद केदार, महादेव दिवटे, वसंत सुपेकर, चंद्रशेखर कवडे, विकास देशपांडे, अरविंद डोंबे, अण्णासाहेब मदने, सुरेश चौगुले, सिकंदर मोगल, नंदकुमार राऊत, वर्षा राऊत, निखिल राऊत उपस्थित होते.

### दत्तकला इंटरनॅशनल स्कूलच्या राज धायगुडे, संचित होलेची जिल्हास्तरीय योगा स्पर्धेसाठी निवड

**करमाळा, दि. १६ ऑगस्ट-**

दौंड येथे क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे तालुकास्तरीय शालेय योगा स्पर्धा झाली. यात दत्तकला



इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे संचित धर्मराज होले यांनी १७ वर्षाखालील रिद्धीमिक योगा या प्रकारामध्ये प्रथम, राज विशाल धायगुडे १९ वर्षाखालील योगा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. या दोघांची जुन्नरयेथे होणाऱ्या स्पर्धेसाठॅ निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रदीप सुनिल शिवपुजे यांनी मार्गदर्शन केले. संस्थाध्यक्ष रामदास झोळ, उपाध्यक्ष राणादादा सूर्यवंशी, सचिवा माया झोळ, प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर, प्राचार्य नंदा ताटे, प्राचार्य सिंधू यादव, विभाग प्रमुख प्रा. खाडे, प्रा. धर्मेंद्र धेंडे यांनी अभिनंदन केले.

# आता तडजोड नाही... विधानसभा लढवणारच...!

## धनराज शिंदे यांचा निर्धार; दोन महिन्यांपासूनचा संभ्रम संपुष्टात, साहेबांशी गद्दारी करणार नसल्याचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १६ ऑगस्ट-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून जर आपल्याला उमेदवारी मिळाली तर आता तडजोड न करता येत्या विधानसभा निवडणुकीत आपल्या विरोधात साक्षात ब्रह्मदेव जरी उभा राहिले तरीदेखील आपण निवडणूक लढवणारच, असा निर्धार माढा वेल्फेअरचे अध्यक्ष, माजी पं. स. सदस्य धनराज शिंदे यांनी केला आहे. त्यांच्या या निर्धाराने दोन महिने चालू असलेल्या नाट्यमय घडामोडीवर पडदा पडला आहे.

बदल हवा, आमदार नवा हा ट्रेड निर्माण झाला आहे. निमगाव टें-बादलेवाडी ग्रामस्थांशी विचारविनिमय करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये ते बोलत होते. यावेळी माजी सरपंच रविंद्र शिंदे, सुहास शिंदे, पोपट खापरे, जगू चट्टे, नागनाथ शिंदे, बापूसाहेब शिंदे, ग्रा. पं. सदस्य उदय शिंदे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या बैठकीमध्ये अनेक खुलासे व आजपर्यंत उपस्थित झालेल्या प्रश्नांची, चालू असलेल्या चर्चेची उत्तरे धनराज शिंदे यांच्याकडून अगदी दिलखुलासपणे देण्यात आली. मागील काही दिवसांपूर्वी धनराज शिंदे यांनी खा. धैर्यशिल मोहिते-पाटील यांना त्यांच्या अकलूज येथील बंगल्यावर जाऊन भेट घेतली होती. भेटीवर माझ्याबाबत स्वाभिमान गहान टाकल्याचे आरोप झाल्याची टीका झाली. यात मी कुठेही स्वाभिमान गहाण टाकला नसून माढा तालुक्याने लोकसभा निवडणुकीत माहिते-पाटलांना ६५ हजारांचे लीड दिले होते. मी पवार यांची विचासरणी माननारा कार्यकर्ता असून पक्षाचे खासदार म्हणून मला मदत करण्याबाबत भेटण्यास गेलो होतो, असे स्पष्ट केले. ज्यावेळेस घरातील लोक मदत करत नाहीत, त्यावेळेस लोक बाहेरच्यांची मदत घेतात हे नैसर्गिक आहे. कै. भाऊंच्या आमदारकीच्या वेळेस कै. शंकराव मोहिते-पाटील यांनी स्व. इंदरा गांधी यांच्याशी भेट घालून विधानसभेचे तिकीट फायनल करून आमदार केले होते. नंतर मोठ्या दादांना पण माजी मंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी अपक्ष असताना निवडून आणले. मग मी त्यांची मदत घेतली तर चुकले कुठे, असा सवाल धनराज शिंदे यांनी उपस्थित केला. शरद पवारांची विचासरणी मी अंगिकारली असून त्यांच्याशी मी कदापी गध्दारी करणार नाही. मी निवडणूक लढवणारच असे सांगून पुढे धनराज शिंदे म्हणाले, पं. स. सदस्यत्वावेळेस देखील रस्त्यावर उतरल्यांनंतर पद दिले. मात्र सभापतीपदावेळेस आपण कर्तृत्व सिध्द करूनदेखील सभापतीपदापासून दूर ठेवण्यात आले.हा माझ्यावर झालेला अन्यायच होता. मात्र त्याचा या निवडणुकीशी कसलाही सबंध नसल्याचे स्पष्ट केले. त्यांतर मात्र आपणास प्रत्येक वेळेस राजकीय सिस्टीमच्या बाहेर ठेवले. असे असले तरी आपण जिद्ध, चिकाटी, सामाजिक सेवा, शेतकरी हित लक्षात घेऊन आजपर्यंत आपण राजकीय वाटचाल करत असताना देशातून, परदेशातून पैसे गोळा करून आपण शेतकऱ्यांसाठी ओढे, नाले, तळे, विहिरी खोदत बसलो. विद्यार्थ्यांसाठी सायकली वाटत बसलो. पण आपणास कसलीच विचारात घेतले नाही, याची खंत कायम राहिली. मी कोणालाच राजकीय भूमिका बदलावयास सांगत नाही, तर मी स्वत: भूमिका बदलून पवार साहेबांच्या विचाराने आपण स्वतंत्रपणे राजकीय वाटचाल करत आहोत.

### शेतकऱ्यांवर कर्ज काढून त्रास द्यायचा नाही

मी व्यावसायिक विचारसरणीचा नसल्याने मला शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज काढून संस्था बनवायच्या नाहीत अन् त्रासही द्यायचा नाही. मी कोणाची रेष पुसणार नाही. मला राजकारणात पुढे जायचे आहे तर मी माझी रेष वाढवणार आहे. माझे वडील नेहमी सांगतात की राजकारणात अगोदर घर, भावकी व गाव पाठीमागे लागते. आत्ता घर, भावकी आहे. आत्ता गावकऱ्यांकडे देखील मदतीसाठी मागणी करत आहे. यावेळी त्यांनी शिंदेंचे घर फुटले नसल्याचे सांगून आपण पवारांशी गद्धारी करणार नसल्याचे सांगितले.

### धनराज यशस्वी होणारच!

माजी पोलीस निरीक्षक बापूसाहेब शिंदे यांनी आ. बबनराव शिंदे सर्वांचे दैवत आहेत. मात्र धनराज शिंदेसारखा कर्तृत्वान, कामाचा, विश्वासाचा तरूण नेता जिल्ह्यात कोणीच नसल्याचे सांगितले. २००३ साली असेच एक आंदोलन आम्ही मामांच्यासाठी केल्याचे उदाहरण देऊन ते जसे यशस्वी झाले. तसेच धनराज शिंदे यांचेही आंदोलन यशस्वी होईल, त्यासाठी आमची पूर्ण साथ मिळेल, असे ग्रामस्थांच्या वतीने आश्वासन दिले.

# तांदुळवाडीशी आमचे ऋणानुबंध कायम

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील : विजय पवार मित्र परिवारातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ ऑगस्ट-**

तांदुळवाडी आणि पंचक्रोशीतील लोकांनी नेहमीच मला बळ दिले आहे. सहकार महर्षींच्या काळापासूनचे ऋणानुबंध आजही येथील लोक जपताना दिसतात. त्यामुळे या परिसराचे योगदान अविस्मरणीय आहे, असे मत खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

तांदुळवाडी (ता. माळशिरस) येथे विजय पवार मित्र परिवार व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने तांदुळवाडी गणातून पंचायत समिती सदस्य झालेले आणि आता खासदार झालेले धैर्यशील मोहिते-पाटील यांची मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते चंद्रकांत पवार, पै. दत्ता मगर, दत्तात्रय आवताडे, दादासाहेब शिंगाडे, धनू दुपडे, भुजंगराव शिंगाडे, तुकाराम पाटील, प्रसाद दुपडे, नागनाथ दुपडे, संचालक रामभाऊ चव्हाण, सरपंच शशिकांत गायकवाड, अशोक आसबे, रावसाहेब आवताडे, अरविंद जाधव, महेश काळे, विश्वनाथ मगर, सरपंच रणजित जाधव, गणपत उघडे, बाळ निंबाळक, श्रीकांत देशमुख, उदय पाटील, शशिकांत कदम, अॅड. नागेश काकडे, नवनाथ निलटे, बाबा पाटील, हनुमंत निलटे, कैलास कदम, प्रमोद निंबाळकर, मच्छिंद्र जाधव, अमोल राऊत, दादा बाबर, हर्षवर्धन काकडे, मोहन शिंदे, शशिकांत मोरे उपस्थित होते. प्रास्ताविक सहकार महर्षी कारखान्याचे संचालक अॅड.विजय पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रल्हाद भोसले यांनी मानले. कार्यक्रमासाठी सर्जेराव चव्हाण, अजित कदम, विश्वजीत दुधाट, रवि दुधाट, तानाजी कदम, रणजित पवार, वृषभ आसबे, माधव उघडे, आदित्य दुधाट, समाधान कदम, गणेश उघडे, बापू राजगुडे, शहाजी निलटे, विश्वजीत कदम, अवदूत चव्हाण, माऊली सुरवसे, पप्पू दुधाट, विलास कदम, शुभम बांदल, आरिफ मुलाणी, हर्षवर्धन तनपुरे, बबलू पारवे आदीसह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील लोकांनी अलोट गर्दी केली होती.



### जेसीबीतून फुलांचा वर्षाव अन् हत्ती...

जेसीबीतून फुलांचा होणारा वर्षाव, डीजेच्या आवाजावर थिरकणारी पावले, मिरवणुकीत असणारा भव्यदिव्य हत्ती, हलग्यांचा गगनभेदी निनाद आणि धैर्यशील मोहिते-पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है..च्या घोषणा अशा उत्साही वातावरणात तांदुळवाडी आणि पंचक्रोशीतील लोकांनी खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचे स्वागत केले आणि भव्य दिव्य मिरवणूक काढली.

### येणाऱ्या अधिवेशनात आरक्षणावर बोलणार

नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये काही तांत्रिक कारणामुळे आरक्षणाविषयी बोलू शकलो नाही. त्यामुळे ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये येणाऱ्या अधिवेशनात आरक्षणावर बोलणार आहे. या संदर्भात विविध तज्ज्ञांची मते जाणून घेतली आहेत. खा. सुप्रियाताई सुळे यांच्यासोबत देखील चर्चा झाली आहे. त्यामुळे पुढील अधिवेशनात आरक्षण प्रश्नावर बोलणार आहे, असे खा.मोहिते-पाटील यांनी सांगितले.



# दामाजी कारखान्याच्या गळीत हंगामासाठी मिल रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

श्री संत दामाजी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या गळीत हंगामासाठी मिल रोलर पूजन चेअरमन शिवानंद यशवंत पाटील यांनी केले.

शिवानंद पाटील म्हणाले, कारखान्याच्या ऑफ सिझनमधील कामे पूर्णत्वास येत आहेत. येणाऱ्या गळीत हंगामामध्ये एकूण ५ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट संचालक मंडळाने ठेवले आहे. काररखान्याचे व्हाईस चेअरमन तानाजी खरात व संचालक मंडळातील सहकारी यांचे सहकार्याने शासनाने दिलेल्या परवानगीचे तारखेपासून कारखाना सुरु करण्याचा आमचा मानस आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने येणारा गळीत हंगाम निश्चितच यशस्वी होईल अशी ग्वाही त्यांनी दिली. यावर्षी पाऊस चांगला झाल्याने ऊसाची वाढ चांगली झालेली आहे. त्यामुळे येणारा गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने चालणार आहे. मागील हंगामातील ऊस बिले, वाहतूक बिले, कर्मचारी पगार वेळेत देण्याचे काम या संचालक मंडळाने केले आहे. येणाऱ्या गळीत हंगामासाठी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरलेली आहे.याप्रसंगी कारखान्याचे संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, निर्मला तानाजी काकडे, लता सुरेश कोळेकर, कारखान्याचे कार्यकारी संचालक राम पाटील उपस्थित होते.

# आगामी विधानसभा निवडणूक स्वराज्य पक्ष लढविणारच!

## माजी खा. युवराज छत्रपती संभाजीराजे : भोसे येथील शासकीय महामंडळाच्या महाएक्स्पो कार्यक्रमात घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १६ ऑगस्ट-**

लोकसभा निवडणुकीच्यावेळी काही अडचणींमुळे स्वराज्य पक्षाने ती निवडणूक लढवली नव्हती. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये स्वराज्य पक्ष पूर्ण ताकतीने निवडणुकीच्या मैदानामध्ये उतरणार असल्याची घोषणा स्वराज्य पक्षाचे संस्थापक युवराज छत्रपती संभाजीराजे यांनी केली.

स्वराज्य पक्षाच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त भोसे क (ता. पंढरपूर) येथे शासकीय महामंडळाचा महाएक्स्पो आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर,



विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, व्याख्याते श्रीमंत कोकाटे, स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष आयोजक प्रा. महादेव तळेकर उपस्थित होते. यावेळी संभाजीराजेंनी स्वराज्य पक्ष हा सर्व जाती, धर्मांना एकत्र घेऊन पुढे जाणारा पक्ष आहे. समाजाचे भले व्हावे या उद्देशानेच समाजाच्या सर्व घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणाऱ्या महामंडळांना एकाच छताखाली आणून त्याचा सर्वसामान्यांना फायदा होण्याच्या दृष्टीने या एक्सपोचे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेऊन युवकांनी आत्मनिर्भर व्हावे असे आवाहन केले. यावेळी राजरत्न आंबेडकर यांनी केवळ निवडणुकीपुरता फुले, शाहू, आंबेडकरांच्या नावाचा वापर केला जातो. मात्र संभाजीराजे यांच्या आचारात आणि विचारात असा कोणताही फरक दिसत नाही. यापुढे सर्व जाती, धर्मांना सोबत घेऊन आम्ही राजकारण करू असे मनोगत व्यक्त केले. अभिजीत पाटील, श्रीमंत कोकाटे, प्रा. महादेव तळेकर यांचीही भाषणे झाली.

या महामंडळ एक्स्पोमध्ये सर्व जाती धर्माच्या १३ शासकीय महामंडळांचे प्रतिनिधी, जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदाच एका छताखाली येऊन लाभार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी स्वराज्य पक्षाचे पदाधिकारी, विठ्ठलचे संचालक महेश खटके, विजय साळुंखे, अजय जाधव, युवराज सरडे यांच्यासह युवकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### अभिजीत पाटलांना स्वराज्य पक्षात येण्याचे आवाहन

भविष्यात जनतेसमोर स्वराज्य पक्ष हाच एकमेव पर्याय असणार आहे. त्यामुळे सध्या इकडे-तिकडे जाऊ पाहणाऱ्या अभिजीत पाटलांनी स्वराज्य पक्षाच्या छताखालीच निवडणूक लढवावी, असे आवाहन युवराज छत्रपती संभाजीराजे यांनी केले.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रा. नीना कदम सेट परीक्षा उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ ऑगस्ट -**



पुणे विद्यापीठाच्या वतीने सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता एप्रिल महिन्यात घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (SET) मध्ये तुळजापूर येतील प्रा. नीना कदम उत्तीर्ण झाल्या. त्या तुळजापूर येतील पुजारी कुटूंबातील आहेत. घरात शैक्षणिक वातावरण नसताना, अगोदरपीएचडी नंतर सेट सारखी कठीण परीक्षा पास होऊन तुळजापूर तील मुलींसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. या यशासाठी त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रा. नीना बाळासाहेब कदम सध्या JSPM² विद्यापीठ पुणे येथे कार्यरत आहे. त्यांना धानय्या कवडगीमट यांचे मार्गदर्शन लाभले. त्या तुळजापूर भाजयुमोचे शहराध्यक्ष राजेश्वर बाळासाहेब कदम यांच्या मोठ्या भगिनी आहेत.



# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येऊन काम करूया : पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**

केंद्र आणि राज्य सरकारच्या अनेक योजना, उपक्रम, अभियान व मोहिमा आहेत. जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी योजना, उपक्रम, मोहिमा व अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सूक्ष्म नियोजनातून यंत्रणांनी काम करावे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी यासह सर्वांनी एकत्र येऊन काम करूया. असे प्रतिपादन पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी केले. १५ ऑगस्ट रोजी ७८ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर, बुबासाहेब जाधव, खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. कैलास पाटील, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत पुढे म्हणाले, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा पुरोगामीत्वाचा वारसा जपत महाराष्ट्राने महिलांना केंद्रस्थानी ठेवून विकासाची वाटचाल सुरू केली आहे. लेक लाडकी योजना आणि आता राज्य सरकारची महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना यासह अनेक लोककल्याणकारी योजना सुरू केल्या आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्य सरकारची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना असून जिल्ह्यातील पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी यंत्रणांनी अतिशय काळजीपूर्वक घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले. त्यामुळे कोणतीही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी जिल्हाधिकारी यांनी अनेक वेळा संबंधित यंत्रणांच्या बैठका घेतल्या. २ लाख ८१ हजार ३२२ महिलांचे १४ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले.जिल्ह्यातील ३ लाख २४ हजारपेक्षा जास्त पात्र महिलांना लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला महिलांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यास सुरुवात झाली आहे. युवा वर्गासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. जिल्ह्यातील १०२ शासकीय कार्यालयांनी २२५८ पदे अधीसुचित केले असून आतापर्यंत प्रत्यक्ष ११० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी विविध कार्यालयात रुजू झाले आहे.उर्वरीत प्रशिक्षण पदासाठीची प्रक्रिया गतीमानतेने सुरू आहे, असे प्रा.डॉ. सावंत यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये दहनशेड नाही तेथे दहनशेड बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सन २०२३-२४ मध्ये २६ कोटी ७५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगून प्रा.डॉ. सावंत म्हणाले, काही बांधकामे पूर्ण झाली आहे. उर्वरित बांधकामे सुरू आहे. ३६१ गावांमधून दहन किंवा दफनभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने शासकीय जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यापैकी २१० गावांमधून शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. खाजगी जागा थेट खरेदी पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन समितीतून ४ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला खरेदी प्रक्रिया काही गावात पूर्ण झाली असून उर्वरित गावातून देखील खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी विविध आरोग्यविषयक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सर्व आरोग्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांची आरोग्यविषयक तपासणी, उपचार व देखभाल करण्यात येत आहे. प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन योजनेअंतर्गत ५० खाटांचे क्रिटिकेअर युनिटच्या बांधकामासाठी २३ कोटी ७५ लक्ष रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. ३६१ कोटी रुपये निधीतून ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खरीप हंगाम २०२३ च्या दुष्काळात बाधित १ लाख २२ हजार शेतकऱ्यांना १४५ कोटी १३ लाख रुपयांचा निधी त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात आल्याचे सांगून प्रा.डॉ. सावंत म्हणाले की,ई-पीक पाहणी प्रकल्प जिल्ह्यात राबविला जात आहे. ई- पीक पाहणी प्रत्येक शेतकऱ्यांनी नोंदवून घ्यावी. त्यामुळे कृषी पतपुरवठा करणे सुलभ होणार आहे. पिक विमा आणि पीक पाहणी दावे तात्काळी निकाली काढता येतील. पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई देताना ही माहिती उपयोगाची ठरणार आहे. जिल्ह्यातील ७०० रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात आले. या शेतरस्त्यांचा १७ हजार शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ६५३ किलोमीटरचे रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आल्याचे प्रा.डॉ. सावंत यांनी सांगितले.

मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवक- युवतींसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून काम करण्यात येत असल्याचे सांगून प्रा. डॉ. सावंत म्हणाले की, जिल्ह्यातील २७४१ लाभार्थ्यांचे १८० कोटी रुपये कर्ज बँकांनी मंजूर केले.महामंडळाने १८ कोटी ४ लाख रुपये लाभार्थ्यांना व्याज परतावा केला. सन २०२३-२४ या वर्षात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत नुकसानाकरिता ५ लक्ष ७२ हजार शेतकऱ्यांना २९७ कोटी रुपये विमा भरपाई वितरित करण्यात आली. महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४४ हजार ६६४ शेतकऱ्यांना १३० कोटी ५८ लक्ष रुपयांचा लाभ देण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ११ हजार २४९ घरकुले, रमाई आवास योजनेअंतर्गत १३ हजार ३२४ घरकुले, शबरी आदिवासी आवास योजनेअंतर्गत ३०६ घरकुले पूर्ण झाली. मोदी आवास योजनेच्या २२७४ घरकुलांपैकी ४५० घरकुलाची कामे पूर्ण झाल्याचे प्रा.डॉ. सावंत यांनी सांगितले.

ध्वजारोहणानंतर पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी स्मृतिस्तंभास पुष्पचक्र वाहिली. कार्यक्रमाला माजी सैनिक, विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पडवळ यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...



### श्री तुळजाभवानी मंदिरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**तुळजापूर, दि.१६ ऑगस्ट -**

श्री तुळजाभवानी मंदीरातील राजेशहाजी महाध्दार श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानच्या प्रशासकीय अधिकारी तथा तहसिलदार माया माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी देविचे महंत तुकोजी बुवा, धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक सिध्देश्वर इंतुले, अभियंता राजकुमार भोसले, जयसिंग पाटील, प्रशांत चव्हाण, प्रविण अमृतराव, महेंद्र आदमाने, पीआरओ मोटे, गणेश नाईकवाडी उपस्थितीत होते.



### कदेर ग्रामपंचायत कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**कदेर, दि.१६ ऑगस्ट -**

उमरगा तालक्यातील कदेर गावातील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गावचे सरपंच सतीश जाधव, उपसरपंच राणी राठोड, ग्रामविकास अधिकारी राजपूत व्ही.जी., तलाठी. सुमैया इब्राहिम बागवान, सुनील पाटील, पी.डी. जाधव, दयानंद जाधव, प्रवीण जाधव, कमलाकर चौधरी, शाम चौधरी, मीनाक्षी जाधव, गोविंद भोसले, राहुल मानेगोपाळे, भास्कर कदम, भारत भाले, गणेश पाटील, विश्वंभर सुरवसे, प्रकाश जाधव, महादेव साखरे, जिल्हा परिषद प्रशालेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### लोटस पोदार लर्न स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**उमरगा, दि.१६ ऑगस्ट -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. या हरघर तिरंगा महोत्सवात लोटस पोदार शाळेने देखील विषेश सहभाग घेतला. या शुभदिनी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष व्यंकट अरगडे उपस्थित होते व या दिनी प्रशालेतील ध्वजारोहणाचा मान प्रतिवर्षा प्रमाणे इयत्ता दहावीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मिळतो यावर्षी ध्वजारोहण वैष्णवी चव्हाण या विद्यार्थीनीने केले.

## धाराशिव विद्यापीठ उपकेंद्रात पेटची परीक्षा व्हावी

### विद्यापीठ विकास मंचाची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**




धाराशिव जिल्ह्यात वेगवेगळ्या विषयातून उच्च शिक्षण घेऊन अनेक संशोधन करणारे विद्यार्थी तयार व्हावेत यासाठी धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसरात पेटसाठी घेण्यात येणारी पात्रता परीक्षेचे केंद्र सुरू व्हावे, अशी मागणी अभाविप संचलित विद्यापीठ विकास मंचाने प्रकलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, धाराशिव येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्र परिसरात वेगवेगळ्या विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेऊन संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन पात्रता परीक्षा पेट देण्याचे केंद्र सुरू व्हावे जेणेकरून धाराशिव सारख्या मागास जिल्ह्यात अनेक संशोधन संशोधक तयार होतील. विद्यार्थ्यांच्या संशोधन दृष्टीला वाव मिळावा आणि जिल्ह्यातील अनेकानेक संशोधक विद्यार्थी तयार व्हावेत यासाठी विद्यापीठ उपकेंद्रात पेट परीक्षेचे केंद्र तात्काळ सुरू व्हावे तसेच यासाठीची तोंडी परीक्षा व्हायव्हा उपकेंद्रात घेण्यासही विद्यापीठाने परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर सिनेट सदस्य देविदास पाठक, प्रा. नाना गोडबोले आणि विद्यापीठ विकास मंचाचे आदित्य सुधीर पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अचलबेट देवस्थान येथील महिला केंद्राचे आ. चौगुले यांच्या हस्ते भूमिपुजन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील अचलबेट देवस्थान हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून या ठिकाणी उमरगा तालुक्यासह शेजारी निलंगा व कर्नाटक राज्यातून हजारोच्या संख्येने भक्तगण येत असतात. या भक्तांमध्ये महिला भाविकांची संख्या लक्षणीय असते. या अनुषंगाने येथे महिला केंद्र बांधकामासाठी निधी मंजूर करण्याची मागणी आ. ज्ञानराज चौगुले यांच्याकडे करण्यात आली होती. यानुसार त्यांनी ३० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून दिला असून गुरुवार दि.१५ रोजी त्यांच्या हस्ते या कामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

यावेळी करण गायकवाड, हभप. हरी लवटे, शिवाजी माडीवाले, युवराज जाधव, पंडीत शिंदे, नेताजी पाटील, विजय शिंदे, बालाजी माणिकवार, प्रवीण साठे, ज्ञानेश्वर पाटील, पवन जाधव, शिवशंकर जाधव, शिवपुत्र ख्याडे, पंचाप्पा ख्याडे, दिपक स्वामी, बसवराज स्वामी, जगु कस्तुरे, कमलाकर आळंगे, बालाजी माने, ईश्वर माळी, रणजित जाधव आदी उपस्थित होते.

## भोईराज तरूण गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी रोहित डुकरे यांची निवड

**नळदुर्ग, दि.१६ ऑगस्ट -**

नळदुर्ग येथील भोईराज तरुण गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी रोहीत डुकरे यांची निवड करण्यात आली आहे.



आगामी काळात साजऱ्या होणाऱ्या श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर नळदुर्ग येथील भोईराज तरुण गणेश मंडळाची नविन कार्यकारणी निवडण्यासाठी नुकतीच बैठक संपन्न झाली.

या बैठकीत मंडळाची नविन कार्यकारीणी निवडण्यात आली ती पुढील प्रमाणे. उपाध्यक्ष अभिजित पुदाले, सचिन बंदीछोडे, कोषध्यक्ष राहुल दासकर, सचिव अक्षय भोई, प्रविण दासकर.

मंडळाच्या या बैठकीस भोई समाजाचे शहराध्यक्ष सुनिल उकंडे, प्रकाश दासकर दीपक डुकरे, भानुदास पुदाले, रवी सुरवसे यांच्यासह भोई समाज व भोईराज तरुण गणेश मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## वेतन थकल्यामुळे न.प. सफाई कामगाराकडून आत्मदहन करण्याचा प्रयत्न

**मुख्याधिकारी वड्डेपल्ली यांना धरले धारेवर... पंधरा दिवसात पगार देवु; लेखी आश्वासनानंतर आत्मदहन मागे...**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१६ ऑगस्ट -**

प्रशासनाचा धिकार असो सफाई कामगार मजुरांचे पैसे मिळालेच पाहिजे गुत्तेदारांना अटक करा असे म्हणत नगर परिषदेतील रोजंदारी सफाई मजूर कामगाराने दि.१५ ऑगस्ट रोजी नगरपरिषद इमारतीवर चढून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला यावेळी शिवसेना (उबाठा) पक्षाचे धाराशिव जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील यांनी प्रशासनातील अधिकारी मुख्याधिकारी मनीषा पडेपल्ली यांना सफाई मजूर कामगाराचे ११ महिन्याचे थकीत पगार तात्काळ देण्यात यावे या मागणीसाठी त्यांना चांगलेच धारेवर धरले होते.



रोजंदारी सफाई मजूर कामगारांनी आमच्या मागण्या मान्य करा नाहीतर आम्ही नगर परिषदेच्या इमारतीवरून उड्या टाकून आत्मदहन करणारच असा पवित्रा घेतला होता. परंतु पोलीस प्रशासन तसेच नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष रणजीत पाटील व कामगार यांच्याशी सविस्तर चर्चा होऊन कामगारांना पंधरा दिवसात पगार देऊ असे लेखी आश्वासन दिल्याने सफाई कामगारांनी तात्पुरते आत्मदहन आंदोलन मागे घेतले. स्वातंत्र्यदिनी च थकीत वेतनासाठी कामगारांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने परंडा शहरात एकच खळबळ उडाली.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## पावसाने दडी मारल्याने नळदुर्ग परिसरातील सोयाबीनसह अन्य पिके धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ ऑगस्ट -**

गेल्या पंधरा दिवसांपासुन पावसाने दडी मारल्याने सोयाबीनसह अन्य पीके कोमेजुन चालली आहेत. पिके ऐन फुल व फळ धारणेत असतानाच पावसाने दडी मारली आहे. येत्या दोन चार दिवसात पाऊस झाला नाही तर खरीपातील सोयाबीनसह इतर सर्व पिके जळुन जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच पाऊस चांगला झाला होता त्यामुळे खरीपाची पेरणी वेळेवर झाली. त्यानंतरही वारंवार पाऊस पडत गेल्याने खरीपातील सोयाबीनसह इतर सर्व पिके अतीशय जोमदारपणे आली. त्यामुळे शेतकरी अतिशय आनंदात होता. मात्र शेतकऱ्यांच्या या आनंदाला कुणाची दृष्ट लागली माहित नाही. आज पुन्हा एकदा तुळजापुर तालुक्यावर निसर्ग कोपला आहे. पावसाने गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासुन दडी मारली आहे.

पावसाने मोठी दडी मारल्यामुळे आज शेतकरी भांबावुन गेला आहे. नुसत्या पावसाने दडी मारली नाही तर वातावरणाताही प्रचंड उष्णता निर्माण झाली आहे. अतिशय कडक उन्ह पडत आहे. त्यामुळे एकीकडे पावसाची उघडीप आणि दुसरीकडे प्रचंड उष्णता यामुळे चांगली बहारदार व जोमदार आलेली खरीपातील पिके आज कोमेजुन चालली आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. यावर्षी वेळेवर पाऊस झाल्यामुळे कधी नाही ते खरीपातील सर्वच पिके अतिशय चांगल्या प्रकारे आली होती. मात्र आज परीस्थिती अतिशय बिकट बनली आहे. पावसाने मोठी उघडीप दिल्याने आज खरीप हंगामच वाया जाणार की काय अशी शक्यता निर्माण झाली आहे.

येत्या दोन चार दिवसात पाऊस झाला नाही तर खरीपतील सोयाबीनसह इतर पिके जळुन जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



## संक्षिप्त वृत्त...




**धाराशिव:** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद धाराशिव शाखेच्या वतीने ७७ व्या स्वतंत्र दिनानिमित्त जिजाऊ चौक ते छ.शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य मशाल यात्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित अभाविप धाराशिव शहर मंत्री अनिकेत कोळगे, प्रमुख वक्ते अजय जानराव, सहमंत्री विजय इसाके, यात्राप्रमुख जयराम गंभिरे, अनुजा पोतदार, कृष्णामाई थिटे, आधी विद्यार्थी, प्राध्यापक व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



### प्रतिष्ठान भवन येथे स्वातंत्र्य दिन साजरा

**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**

भारतीय जनता पार्टी कार्यालय प्रतिष्ठान भवन धाराशिव येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अनंत देशमुख, संपत डोके, बापू पवार, लाटे, झुंबर आबा, गवळी, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजे निंबाळकर, किशोर पवार, मेसा जानराव, संग्राम बनसोडे, सागर दंडनाईक यांसह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १७ आणि १८ ऑगस्ट रोजी विशेष मतदार नोंदणी शिबीर

**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**

विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी १७ आणि १८ ऑगस्ट या दिवशी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरावर विशेष नोंदणी मोहीम शिबिरे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेमार्फत आयोजित केली जाणार आहे. या शिबिरामध्ये पात्र मतदारांचे मतदान नोंदणी अर्ज नमुना क्रमांक ६, वगळणी अर्ज क्रमांक ७ आणि मतदार यादीतील दुरुस्तीबाबत नमुना क्रमांक ८ अचे अर्ज मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) यांचेमार्फत स्वीकारले जाणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या विशेष मतदार नोंदणी शिबिरामध्ये सहभागी व्हावे.आपले नाव मतदार यादीत असल्याबाबत पडताळणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांनी केले आहे.



### कृषी विभागाच्या वतीने शेती शाळेचा आयोजन

**उमरगा, दि.१६ ऑगस्ट -**

सोयाबीन मूल्य साखळी अंतर्गत तालुक्यातील गुंजोटी येथे कृषी विभागाच्या वतीने शेती शाळा आयोजित करण्यात आले होते. सदरची शेती शाळा उपविभागीय कृषी अधिकारी असलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी सुरेश बाबुराव पाटील यांची शेती शाळेच्या प्लॉटची पाहणी करून सोयाबीन पिकावर पडलेल्या किडी व रोगाची पाहणी केली. त्यानंतर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र आंबेजोगाई येथील शास्त्रज्ञ डॉक्टर वसंतराव सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले. उपस्थित शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील उद्भवलेल्या किडी व रोगाविषयी तसेच पाणी देण्याच्या पद्धतीवर शास्त्रज्ञ यांना प्रश्न विचारून आपले शंका समाधान करून घेतले त्यानंतर विभागीय कृषी सहसंचालक लातूर दिवेकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. एकात्मिक कीड व्यवस्थापन याविषयी तसेच उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढविणे बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी रितापुरे यांनी सोयाबीन वरील किडी व मित्र किडी यांची माहिती व ओळख करून दिली. यावेळी मंडळ कृषी अधिकारी डी.व्ही मुळे, कृषी पर्यवेक्षक भोसले पी.एस, कृषी सहाय्यक अतुल गायकवाड,पाटील पि.के, जाधव डी.बी, पाटील आर.डी, व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध उपक्रम

**आलूर, दि.१६ ऑगस्ट -**

आलुर येथे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत,जि.प.शाळा,जि.प.कन्या शाळा,विवीध कार्यकारी सोसायटी येथे ध्वजारोहण करण्यात आले,जि.प शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तसेच मदरसा मेराजुल उलुम येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त माजी सैनिकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि मदरसा मेराजुल उलुमच्या वतीने स्वातंत्र्य सैनिक माजी सैनिकांना फेटा, शाल, श्रीफळ देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी सैनिक, भिमराव इंगळे, नेपाल सिगं गहेरवार, सोमय्या स्वामी, बाबू राव बिराजदार, सुभाष खडके, संजय कासार, सोमनाथ भालके, नितिन बोळदे, नागण्णाप्पा ब्याळीकूळे, अल्लाउद्दीन जेवळे, इलाही कूरणे, हुच्चे गुरुजी, मकतुम जमादार, आझाद मिर्झा, तय्यब अली जमादार, सत्तार जेवळे, निजाम हूच्चे, राम गुरव, अमुर्त गुरव, सुरेश इगंळे, मारूती गुडंगे, बाबू जेवळे, मदरसा मेराजुल उलूम कमेटीचे सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्राचार्य वेदकुमार वेदालंकार यांना जीवन साधना पुरस्कार समारंभ पूर्वक प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त प्राचार्य वेदकुमार वेदालंकार यांना जीवन साधना पुरस्कार विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी आणि माजी कुलगुरू डॉक्टर माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते समारंभ पूर्वकप्रदान करण्यात आला.




यानिमीत्ताने विद्यापीठ उपपरिसरातील हिरवळीवर कुलगुरू प्रा.डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते विद्यापीठाचा ध्वज फडकविण्यात आला. सत्कारमूर्ती माजी प्राचार्य तथा जेष्ठ साहित्यिक आणि शिक्षणतज्ञ, डॉ. वेदकुमार वेदालंकार, प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.माणिकराव साळुंखे, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रा.डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. अंकुश कदम, बसवराज मंगरूळे, विद्यापीठ उपपरिसराचे संचालक प्रा.डॉ. प्रशांत दीक्षित व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र-कुलगुरू प्रा.डॉ.वाल्मिक सरवदे यांनी केले. रुसा माध्यमातून अनेक प्रकल्प सुरु केले आहेत. एनआयआरएफ मध्ये भारतात आपले विद्यापीठ पहिल्या पन्नास मध्ये आहे. नविन शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी कार्य शाळा घेण्यात आल्या आहेत. कुलगुरुंचे चांगले मार्गदर्शन लाभत आहे. प्रशासन कर्मचारी बाबतीत चांगला विचार करित आहे. उपपरिसर वर्धापन दिनानिमित्त वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना जीवनसाधना पुरस्काराने सन्मानित करण्यात येते, असे विचार प्र-कुलगुरू प्रा.डॉ.वाल्मिक सरवदे यांनी व्यक्त केले आहेत. उपपरिसराच्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षण व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल माजी प्राचार्य तथा जेष्ठ साहित्यिक आणि शिक्षण तज्ञ प्रा.डॉ. वेदकुमार वेदालंकार यांना जीवनसाधना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जीवनसाधना पुरस्कार मानपत्र वाचन डॉ. महेश्वर कळलावे यांनी केले. डॉ.वेदकुमार वेदालंकार यांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा हिंदी अनुवाद केला आहे. अनेक संस्कृत ग्रंथाचा हिंदी अनुवाद त्यांनी केला आहे. जीवन के स्वर आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. सामवेद या ग्रंथाचा हिंदी अनुवाद, संत एकनाथ महाराज यांच्या अभंगाचा हिंदी अनुवाद करण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. जीवनसाधना पुरस्कार सत्कारमूर्ती डॉ. वेदकुमार वेदालंकार यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी म्हटले कि जीवन साधना, अलौकिक कार्य अध्यात्मिक प्रेरणेने केले आहे.

या कार्याची नोंद घेऊन विद्यापीठाने पुरस्कार दिल्याबद्दल त्यांनी विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. छावा ग्रंथाचे भाषांतर हिंदीमध्ये आठ महिन्यात केले. दिव्य प्रेरणेने सर्जनशील कार्य करणे शक्य झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पुरस्कार देऊन गौरव केला, त्याबद्दल मी धन्य आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या तीन कादंबऱ्या व वीस कथांचा हिंदीत अनुवाद केला. समारंभाचे प्रमुख अतिथी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा डॉ. माणिकराव साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. या सत्काराच्या कार्यक्रमाने भारावून गेलो आहे, असे त्यांनी म्हटले. सत्कारमूर्ती डॉ. वेदकुमार वेदालंकार यांना शतकोत्तर कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यापीठ उपपरिसरातील सर्व शैक्षणिक विभागाचे कार्य प्रशंसनीय आहे.

जगात अशक्य अशी कोणतीही गोष्ट नाही. वीस वर्षांत विद्यापीठ उपपरिसराची प्रगती अभिमानास्पद झालेली आहे. एखाद्या शिक्षण संस्थेचे मूल्यमापन किती विद्यार्थी जीवनात यशस्वी झाले आहेत यावर अवलंबून आहे. त्यांनी विद्यापीठ उपपरिसरातील रसायनशास्त्र विभागाचे विशेष कौतुक केले. नेट, सेट परिक्षेत रसायनशास्त्र विभागातील ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. स्टेम सेल मधुन उपचारासाठी किडनी, हृदय तयार करता येते. लोकांमध्ये जिज्ञासा निर्माण करणे हे विद्यापीठाचे काम आहे. एकविसाव्या शतकात देश महासत्ता बनत आहे. आपली सर्वात मोठी शक्ती विविधता आहे. जगात सगळ्यात गरीब लोक आपल्या देशात आहेत. कृषी संस्कृतीतून आपण ज्ञान संस्कृतीकडे प्रवास करीत आहोत. विद्यापीठाने चांगले मनुष्यबळ निर्माण केले पाहिजेत. भविष्यातील शिक्षण कसे देणार आहोत, याचाही विचार केला पाहिजे. माहिती देणे, शिक्षण देणे, नाविन्यपूर्ण पद्धत विकसित करणे, या पद्धतीने शिक्षण दिले पाहिजे. बहु विद्याशाखीय शिक्षणाच्या माध्यमातून जगासमोर असलेले प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असे प्रतिपादन प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी हित, कर्मचारी हित, जपणे हे संस्थेचे महत्वाचे कार्य आहे. एनआयआरएफ मूल्यमापनात देशातील राज्य विद्यापीठामध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ४६ वा क्रमांक आला आहे. यश सांघिक प्रयत्नामुळे प्राप्त झाले आहे.

कोणतीही आपत्ती इष्ट आपत्तीत रुपांतर करता येते. सत्कारमूर्ती डॉ. वेदकुमार वेदालंकार यांचे अप्रकाशित साहित्य विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्याची ग्वाही, त्यांनी दिली. कार्याच्या माध्यमातुन प्रशासकीय आणि गुणवत्तेची शिस्त लावणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरु प्रा.डॉ.विजय फुलारी यांनी केले. सत्कारमूर्ती डॉ.वेदकुमार वेदालंकार यांनी त्यांची साहित्य संपदा ज्ञानेश्वरी, कुलगुरु प्रा. डॉ. विजय फुलारी, प्र- कुलगुरु, प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे, व्यवस्थापन परिषद सदस्य बसवराज मंगरुळे, यांना भेट दिली.

या कार्यक्रमासाठी व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन जाधव, डॉ. गजानन सानप, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. संजय साळुंके, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. वैशाली खापर्डे, प्रा. डॉ. भगवान साखळे, डॉ. गौतम पाटील, डॉ. भारत खंदारे, दत्तात्रय भांगे, डॉ. व्यंकट लांब, डॉ. अपर्णा पाटील, काशिनाथ देवधर, अधिसभा सदस्य देविदास पाठक, नाना गोडबोले, प्रा. डॉ. भास्कर साठे, वित्त व लेखाधिकारी श्रीमती सविता जंपावाड, डॉ. दत्तात्रय भांगे, आदि उपस्थित होते.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, स्वातंत्र्य सैनिक बुबासाहेब जाधव, विद्यापीठ उपपरिसराचे माजी संचालक प्राचार्य डॉ. रमेश दापके, प्राचार्य डॉ. अशोक मोहेकर, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख आणि प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, प्राचार्य डॉ. सुनील पवार, प्राचार्य डॉ. गुलाब राठोड कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विक्रम शिंदे आणि. डॉ. महेश्वर कळलावे यांनी केले. विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर यांनी आभार व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर २० वा वर्धापन दिन सोहळ्यास उपपरिसरातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, बहुसंख्येने उपस्थित होते.

## महाविकास आघाडी १७५ जागा जिंकेल; शिवस्वराज्य यात्रेत जयंत पाटील यांनी व्यक्त केली अशा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ ऑगस्ट-**

महाराष्ट्रात महाविकास आघाडी १७५ जागा जिंकेल असा अशा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी तुळजापूर येथे शिवस्वराज्य यात्रेनिमित्ताने आयोजीत जाहीर सभेत व्यक्त केली आहे.

यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादीचे कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे, खा.अमोल कोल्हे, जीवन गोरे, विलास लावांड, जिल्हाध्यक्ष संजय दुधगावकर, युवती प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर, संजय निबाळकर, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, धर्यशिल पाटील, अमर चोपदार, मिनाक्षी पाटील, श्वेता दुरुगकर, भरत जाधव, नागेश पाटील, बसवराज पाटील यांच्यासह अनेक पदधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पाटील म्हणाले की, दोन्ही पक्ष फोडल्याने याचे किंमत कमी झाल्याचे सांगून विधानसभा निवडणुकीत पैशाचा पाऊस पडेल यातुन पुढे येवुन महाविकास आघाडीला सत्तेत आणा असे आवाहन केले.

विधानसभा उमेदवारी बाबतीत जागा वाटप निर्णयानंतर निर्णय होईल असे स्पष्ट केले.

यावेळी बोलताना सुप्रियाताई पवार म्हणाल्या, आमच्या काळात वीस रेल्वे संपादीत जमिनीला कवडीमोल भाव दिल्या बद्दल नाराजी व्यक्त करुन रेल्वे मंत्री अश्विनी वैभव यांना या बाबतीत भेटुन शेतकऱ्यांन वर झालेला अन्याय दुर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे यावेळी सांगितले.

यावेळी बोलताना आमोल कोल्हे म्हणाले की, जगदंबेची पवित्रभूमी असुन यांनी पक्ष फोडले पण महाराष्ट्राच्या जनतेने येथे गद्दारांना स्थान नाही हे लोकसभेत दाखवुन दिल्याचे स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीत ७५ हजाराने महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणा असे आवाहन केले.

प्रारंभी प्रास्तविक करताना सक्षणा सलगर म्हणाल्या की, अनेक शेतकरी सर्वसामान्यांच्या तरुणांना आमदार खासदार पवार साहेबांनी केले या मतदार संघात बदल व नवा सर्वसामान्याचा चेहरा हवा अशी मागणी असुन मी सर्वसामान्य घरातील शेतकऱ्यांची कन्या असल्याने मला संधी द्यावी, अशी मागणी केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रवादीकाँग्रेस युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणा सलगर यांनी केले तर आभार धर्यशिल पाटील नादुरीकर यांनी मानले यावेळी प्रचंड संख्येने कार्यकते उपस्थितीत होते.

## महिला विद्यार्थी डॉक्टरवरील अत्याचाऱ्यांवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट-**

कलकत्ता येथील घटनेच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या आंदोलनास इंडियन मेडिकल असोसीएशनच्या, महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटना व वैद्यकीय महाविद्यालय वैद्यकीय अधिकारी संघटनेच्यावतीने काळ्या फिती लावून कामकाज करीत पाठिंबा दिला आहे.

तसेच संबंधितावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनावर डॉ.सचिन देशमुख, डॉ.स्मिता गवळी, डॉ.आदिनाथ राजगुरु, डॉ.चंचला बोडके, डॉ.निता पौळ, डॉ.कौशल्या राजगुरु, डॉ. ज्योती कानडे, डॉ.मिलिंद पौळ, डॉ.सुधीर मुळे, डॉ.विशाल वडगावकर, डॉ.सुश्रुत डंबळ, डॉ.विरेंद्र गवळी, डॉ.सुजितकुमार रणदिवे, डॉ.विनोद महिंद्रकर, डॉ.महेश गुरव, डॉ.महेश पाटील, डॉ.दत्ता चौरे, डॉ.शिवानंद देवपूजे, डॉ.प्रवीण कुदळे, डॉ.भिमदीप टोपे, डॉ.रोहन आर्वीकर, डॉ. प्रतीक सुर्यवंशी डॉ.श्रध्दा मुळे यांच्या सह्या आहेत.

### आ.चौगुलेंच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन

**लोहारा, दि.१६ ऑगस्ट-**

आ.ज्ञानराज चौगुले यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत लोहारा तालुक्यातील भोसगा येथील अंबाबाई मंदिर व संत सेवालाल महाराज मंदिरसमोर सभामंडप बांधणे, १० लक्ष रूपये व अल्पसंख्याक विकास निधीतंर्गत कब्रस्थानास संरक्षक भिंत बांधणे असे एकुण २० लक्ष रूपये निधी मंजुर केला आहे. या कामांचे भूमि पूजन दि.१५ ऑगस्ट रोजी आ. चौगुले यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमात उपस्थितांना त्यांनी तालुक्यात केलेल्या विकास कामांसह भोसगा येथे केलेल्या विकास कामांचा पाढा वाचत शासनाने जाहिर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण व लाडका भाऊ सह इतर अनेक योजनांचा लाभ सर्वांनी घ्यावे, असे आवाहन केले.

## श्री सिध्दीविनायक परिवाराचा अभिनव उपक्रम

### माजी आ.सुजितसिंह ठाकुर यांच्या हस्ते श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेटच्या दैनंदिन आर्थिक माहिती फलकाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट-**

धाराशिव येथील श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट सोसायटीच्या मुख्य शाखा येथे संस्थेच्या दैनंदिन आर्थिक ताळेबंद दर्शवनारी माहिती फलकचे उद्घाटन माजी आ.सुजितसिंह ठाकुर यांच्या शुभहस्ते व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजी धनाजी काळे, तसेच सहकार अधिकारी बालाजी सावतर, सहकार बोर्ड मधुकर जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले.

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट मागील दशकांपासून धाराशिवकरांच्या विश्वासास पात्र ठरलेली संस्था असून २६ हजारपेक्षा जास्त खातेदारांनी या संस्थेच्या माध्यमातून आपले समाधानी आर्थिक व्यवहार केलेले आहेत.



संस्थेने आपल्या सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार यांना आपली दैनंदिन आर्थिक स्थिती माहिती करून देण्यासाठी एक अभिनव उपक्रमाद्वारे दैनंदिन आर्थिक माहितीचा फलक संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या बाहेर लाऊन एक आदर्श पारदर्शक व्यवहाराचा पायंडा निर्माण केला आहे. असे माजी सुजितसिंह ठाकुर यावेळी म्हणाले.

श्री सिध्दीविनायक पारिवारची समाजातील विश्वासाहर्ता पारदर्शकता व नाविन्यपूर्ण उपक्रम या संपूर्ण परिवारासाठीच्या महत्वाच्या बाबी आहेत, असे धनाजी काळे यावेळी म्हणाले.

या कौतुकास्पद उपक्रमाचे स्वागत संस्थेच्या सर्व ठेवीदार सभासदांच्या माध्यमातून होत आहे.

यावेळी संस्थेचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी, राजेश जाधव, प्रतिक देवळे, दिनेश कुलकर्णी, गणेश कामटे, ॲड.नितीन भोसले, अरविंद गोरे, जाहीर चौधरी, किशोर तिवारी, देविदास कुलकर्णी, नितीन हुंबे, लक्ष्मण शिंदे, प्रशांत वाघमारे, योगेश कुलकर्णी, रणजित भोरे, नितीन भोसले यांच्यासह मल्टीस्टेटचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## आयटीआय व जलसंपदाची जागा वैद्यकीय महाविद्यालयाच्या ताब्यात

### लवकरच सुसज्ज इमारत उभारणार : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट-**

राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व जलसंपदा विभागाची मोकळी जागा वैद्यकिय शिक्षण विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात आली आहे. धाराशिवच्या तहसीलदारांनी ८ हेक्टर ३० गुंठे जागा शासकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्या ताब्यात दिली आहे. लवकरच या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची सुसज्ज इमारत उभारणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.




सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत असलेली ही जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. विद्यार्थी, रूग्ण आणि रूग्णांच्या नातेवाईकांच्या दृष्टिने ही जागा सोयीची आहे. मात्र काही जणांनी वैयक्तिक स्वार्थासाठी पोहनेर रस्त्यावरील खाणीजवळील अडगळीच्या जागेत वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी याबाबत बैठक घेवून तातडीने जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास प्रत्यार्पित करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने कौशल्य विकास व जलसंपदा विभागाकडून जागेचा ताबा महसूल विभागाने शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्याकडे सोपविला आहे. जागा ताब्यात आली आहे.

आता या जागेवर सुसज्ज इमारत उभारण्यात येणार आहे. संकल्पना स्पर्धेच्या माध्यमातून इमारतीच्या उत्कृष्ट आराखड्याची निवड करण्यात आली आहे. त्याकरिता ५१३ कोटी रूपयांचा सुधारीत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे दाखल करण्यात आला असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची ५ हेक्टर ३० गुंठे जागाही शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या ताब्यात आली आहे. तुर्तास याच ठिकाणच्या उर्वरित जागेत आयटीआय सुरू राहणार आहे.

पुढील काळात राष्ट्रीय महामार्गालगतच असलेल्या शासकीय तंत्रनिकेत महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जागेत आयटीआय स्थलांतरीत होणार आहे आणि त्यानंतर आयटीआयच्या ठिकाणी वैद्यकिय शाखेशी निगडीत असलेले दंत महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, भौतिकोपचार शास्त्र, फार्मसी यासारखे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. येथे एक परिपूर्ण अत्याधुनिक वैद्यकिय संकुल निर्माण करण्याचा आपला मानस असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे. जलसंपदा विभागाच्या ३ हेक्टर जागेत वस्तीगृह, वैद्यकिय अधिकारी आणि कर्मचार्यांसाठी निवासस्थाने प्रस्तावित असल्याचेही त्यांनी सांगितले.

# जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१६ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य शासकीय समारंभात जिल्हाधिकारी अभिजीत यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत सकाळी ९.०५ वाजता हर्षोल्हासात त्यांनी ध्वजवंदन केले. यावेळी जिल्हावासियांना त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्यासाठी अनेकांना पुरस्कार बहाल केले. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आज धुळे येथे ध्वजवंदन केले. तथापि, स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर नांदेड जिल्ह्यातील तमाम नागरिकांना त्यांनी शुभेच्छा संदेश दिला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय मधील या सोहळ्याला आज ध्वजवंदन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्याचे ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित या समारंभास विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

ध्वजवंदनानंतर सलामी देण्यात आली. परेड कमांडर पोलीस निरीक्षक अविनाश धोंडगे यांनी सलामी पथकाचे नेतृत्व केले.



पोलीस दलाच्या सलामीनंतर राष्ट्रगीत, राज्यगीत नंतर जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी उपस्थित मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक, त्यांचे कुटूंबिय यांची त्यांनी आस्थेने विचारपूस केली. वीरमाता, वीरभगीनी यांच्यासह या विशेष कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांना भेटून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, माजी विधान परिषद सदस्य अमर राजूरकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार बी.आर. देशमुख, माजी आमदार गंगाधर पटणे आणि स्वातंत्र्य सैनिकांचे वारस आदीची उपस्थिती होती.

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय समाजात फुट पाडणारा : प्रा. कवाडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१६ ऑगस्ट -**

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण वर्गीकरणाचा घेतलेला निर्णय हा असंवैधानिक असून सामाजिक फुट निर्माण करणारा असल्याची प्रतिक्रिया पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्टीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दिली आहे.

नांदेड येथे पिपल्स रिपब्लिकन पार्टीची राज्यस्तरीय बैठक नांदेडात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या निमित्ताने ते नांदेड येथे आले असता पत्रकारांशी बोलत होते. यावेळी पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदिप कवाडे, प्रदेशाध्यक्ष गणेश उनवने, कार्याध्यक्ष चरणदास इंगोले, प्रदेश महामंत्री बापूराव गजभारे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.जोगेंद्र कवाडे म्हणाले की, आरक्षण वर्गीकरणाच्या घेतलेल्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने विचार करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत विचार न केल्यास संसदेचे विशेष अधिवेशन घेवून हा निर्णय रद्दबातल करावा, देशात अनुसूचित जातीला १३ टक्के तर अनुसूचित जमातीला ७.५ टक्के आरक्षण आहे. आरक्षणाचे वर्गीकरण केल्यास शुन्यच्या प्रमाणात याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे संसदेचे विशेष अधिवेशन घेण्याची मागणी यावेळी प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे देशातील सर्व मागासवर्गीय संघटनांनी हा निर्णय रद्द करण्याची मागणी केली असून, दि.२१ ऑगस्ट रोजी भारत बंदचे आवाहन देखील केले आहे.

पिपल्स रिपब्लिकन पार्टीची शिवसेना एकनाथ शिंदे यांच्याशी आघाडी आहे. परंतू लोकसभा निवडणुकीत मित्र पक्षांना जो सन्मान द्यायला पाहिजे होता किंवा ज्या पध्दतीचा समन्वय साधण्याची गरज होती, तसे करण्यात आले नाही. त्यामुळे मित्र पक्षामध्ये नाराजी आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान महायुतीमधील घटक पक्षांशी समन्वय साधावा, असेही ते यावेळी म्हणाले. त्याचबरोबर महायुतीकडे पीआरपी पाच जागेची मागणी करणार आहे. योग्य चर्चा न झाल्यास राज्यात ३१ उमेदवार स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच देगलूर-बिलोली मतदारसंघातून बापूराव गजभारे हे संभाव्य उमेदवार असतील, अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली.




या पत्रकार परिषदेस प्रदेश संघटक प्रमोद टाले, नंदकुमार गोधने, राजू मोरे, युवा आघाडीचे कपिल लिंगाये, वैलास बोमल, मृणाल गोस्वामी, विलास निकाळजे, अरुण गायकवाड, गजानन माने, जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, महानगराध्यक्ष साहेबराव सोनकांबळे, आकाश गजभारे, संघरत्न कंधारे, राजेंद्र हिवाळे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

## गोपाळचावडीच्या नुतन सरपंच सुरेखा लाखे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,१६ ऑगस्ट -**

गोपाळ चावडी ग्रामपंचायतच्या नव्याने निवड झालेल्या सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते दिनांक १५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्यदिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय येथे राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आला.



नांदेड शहरजवळील व सिडको हडको परिसरातील गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालय येथील सरपंच पदासाठी एक विशेष बैठकी दिनांक १४ ऑगस्ट रोजी घेऊन त्यात सदरील सरपंच पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. तत्कालीन सरपंच गिरजाबाई डाकोरे यांनी राजीनामा दिल्या नंतर निवडणूक घेऊन १४ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता नूतन सरपंच पदी सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी पिठासीन अधिकारी तथा एच. एन. सुजले गावकर, तलाठी आर.एन. भिंगोरे, ग्रामविकास अधिकारी पी.डी. उबाळे यांच्या उपस्थित निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी ग्रामपंचायतचे उपसरपंच साहेबराव सेलूकर यांच्यासह सर्व सदस्य व ग्रामस्थांची उपस्थित होते. सरपंच पदाची निवडून झाल्यानंतर लगेचच स्वातंत्र्यदिनानिमित्त नूतन सरपंच सौ. सुरेखा लाखे यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालय येथे राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

# 'तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड' कार्यक्रमास उत्सफुर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१६ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त दि. १५ ऑगस्ट रोजी ' तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड' हा विविध कलागुणांचा महोत्सव आयोजित करण्यात आला .

भाजपाचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड आयोजीत हा कार्यक्रम स्व. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या पुतळ्यासमोर सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. यां कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, माजी आ. अमर राजुरकर , महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपा नेते प्रविण साले, मिलिंद देशमुख, देविदास राठोड, सचिन उमरेकर, विजय गंभीरे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रध्वजाला सलामी व राष्ट्रगीताने झाली. तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड या कार्यक्रमात अनेकांनी देशभक्तीपर रॅप गाणे गायले. जगदंबा ढोल ताशाच्या गजरात राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले. या शिबिरात अनेकांनी स्वंयस्फुर्तीने सहभाग नोंदवला.

तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड व मित्र मंडळाने परीश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र शासनाचा अल ईम्रान प्रतिष्ठानला जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

**बिलोली**-महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेडच्या वतीने अल ईम्रान प्रतिष्ठान बिलोली या संस्थेला दि.१५ आगस्ट २०२४ रोजी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष डा.मोहसीन खान यांना जिल्हा युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास व्यासपिठावर जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार,महानगरपालिकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी महेश डोईफोडे,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,अप्पर जिल्हाधिकारी बोरगावकर,ना. तहसिलदार मकरंद दिवाकर,जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार ठेंभरे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.सदरिल कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले.अल ईम्रान प्रतिष्ठानला मिळालेल्या पुरस्काराबद्दल नेहरु युवा केंद्रांच्या संचालिका चंदा रावळकर,क्रीडा अधिकारी प्रविण कोंडेकर,संजय बेतीवार,राहुल श्रीमनवार,चंद्रप्रकाश होनवडजकर,बालाजी शिरशीकर,शिवकांता देशमुख सह संतोष कणकवार,संजय चव्हाण,आनंद जोंधळे,मोहन पवार,सुभाष धोंगडे,यश कांबळे,विद्यानंद भालेराव,ज्ञानेश्वर थोटे,नगरसेवक प्रतिनिधी आजम बेग,कैलास गायकवाड,विनोद कुटे पाटील यांच्यासह पत्रकार,मित्र परिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### जुना लोह्यात श्रीमद् भागवत कथा ज्ञानराज सोहळा

**लोहा** -श्री संत मोतीराम महाराज यांच्या पुण्यतिथी व श्रावण मासानिमित्त जुन्या लोह्यातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दि. १६ ते २२ ऑगस्ट दरम्यान सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात श्रीमद् भागवत कथा व ज्ञानराज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सदरील सोहळ्यात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## अर्धापूरच्या अमोल सरोदेला महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,१६ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य शासकीय समारंभात जिल्हाधिकारी अभिजीत यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत सकाळी ९.०५ वाजता हर्षोल्हासात त्यांनी ध्वजवंदन केले. यावेळी जिल्हावासियांना त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्यासाठी अनेकांना पुरस्कार बहाल केले.



अर्धापूरच्या अमोल जयशिला उद्धवराव सरोदे यांनी युवक विकासाच्या कार्यामध्ये उत्तम कामगिरी करून समाजातील असंघटित युवांना संघटीत करून तरुणांच्या व नागरिकांच्या सुप्त गुणांना संधी देऊन भरीव योगदान दिले. या सामाजिक कार्याची दखल घेऊन वर्ष २०२१-२०२२ साठीचा जिल्हा युवा पुरस्कार जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते १० हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी हा पुरस्कार अमोलने वडील उद्धवराव सरोदे व आई जयशिला सरोदे यांच्या समवेत स्वीकारला.

**पुरस्कार प्रेरणा देणारा : अमोल सरोदे**

पुरस्कार हा अजून काम करण्याची प्रेरणा देतो आणि जबाबदारी वाढते. समाजाला आपलं काहीतरी देणं लागतं ह्या भूमिकेतून समाजाच्या सेवेसाठी मी तत्पर असेन. हा पुरस्कार मी माझ्या आईवडिलांना समर्पित करतो, अशी प्रतिक्रिया जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त अमोल सरोदे यांनी दली.

# ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यास हजाराचे संख्येने सामील व्हा : बद्दीवार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,१६ ऑगस्ट -**

विचार उद्याचा ओबीसीच्या भवितव्याचा तुमचे आमच्या अस्तित्वाचा हा बुलंद आवाज घेऊन ओबीसी आरक्षण बचाव मेळावा दिनांक १८ ऑगस्ट रोजी भोकर येथे मोंढा मैदान येथे होणार असून या मेळाव्यास हजारोच्या संख्येने किनवट माहूर मतदारसंघातून उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा अध्यक्ष रमेश बद्दीवार यांनी केले आहे.

ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्याचे नेतृत्व प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली होऊ घातलेल्या ओबीसी आरक्षण बचाव मेळावा दिनांक १८ ऑगस्ट रोजी भोकर येथे होणार असून या मेळाव्यात जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावे सदरील मेळाव्यात जातनिहाय जनगणना करणे, मराठा व इतर कोणत्या जातीचा नव्याने ओबीसी मध्ये समावेश करू नये, महाराष्ट्र सरकारने मागील सप्टेंबर २०२३ दिवस पासून दिलेले सर्वच खोटे ५८ लाख कुणबी प्रमाणपत्र रद्द करणे, सगळे सगे सोयरे अध्यादेश रद्द करणे, २०२०३ पासून खोट्या कुणबी प्रमाणपत्रावर नोकरीवर उपस्थित झालेल्या सर्वाना कमी करून टाकने, खोटे पुरावे सादर करून प्रमाणपत्र सादर करणाऱ्या वर गुन्हा दाखल करणे यासह इतर मागण्या घेऊन ओबीसीचा बुलंद आवाज करण्यासाठी व झोपलेल्याचे सोंग घेतलेल्या शासनाला जागे करण्यासाठी दिनांक १८ ऑगस्ट रोजी भोकर येथील मोंढा मैदान येथे भव्य स्वरूपाचे ओबीसी आरक्षण बचाव मेळावा आयोजित केला असून या मेळाव्या जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गोल्ला समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश बद्दीवार यांनी केले आहे



## उमरीच्या मॉडर्नने प्रभातफेरीतून दिला पर्यावरणाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,१६ ऑगस्ट -**

उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र दिनाचे निमित्ताने शहराच्या मुख्य रस्त्यावरुन सायकल रॅली काढून पर्यावरणाचा संदेश दिला.

शाळेत सकाळी ७:३० वाजता आदर्श शिक्षिका म्हणून सन १९९७ ला राष्ट्रपती पुरस्कार मिळालेल्या सौ. कुमुदिनी अरविंद ढवळेकर यांचे हस्ते झेंडावंदन झाले. त्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्याने शालेय विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली त्यात शाळेचे बँडपथक, स्काऊट, गाईड चे विद्यार्थी, तसेच इको क्लब अर्थात पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचे समुहाने काढलेली सायकल रॅली प्रभात फेरीचे प्रमुख आकर्षण होते. शिस्तबध्द निघालेली प्रभात फेरी, भारतमाताकी जय, वंदेमातरमच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेले होते. सायकल रॅलीचे शहरातील नागरिकांनी व पालकांनी कौतुक केले. ह्या रॅलीत नर्सरी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा संजय कुलकर्णी, संचालिका सानिका कुलकर्णी आणि सर्व स्टाफने मेहनत घेतली.

## प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांना आरोग्यरत्न रत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,१६ ऑगस्ट -**

पुरुषोत्तम धोंडगे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकशाही न्युज चॅनलच्यावतीने आरोग्यरत्न सन्मान २०२४ हा पुरस्कार मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दि.१४ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी,माजी खासदार व आमदार डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ लोहा- कंधार तालुक्यातील प्रत्येक गाव,वाडी,तांडा व शहरातील वयोवृद्ध व्यक्तींच्या डोळ्याचे शिबिर आयोजित करुन मोफत शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेऊन अंधमुक्तीचा संकल्प केला. व ३ हजार लोकांच्या डोळ्यांची यशस्वी शस्त्रक्रिया पहिला टप्प्यात पार पडली. प्रत्येक शिबीरासाठी गावागावात प्रा.पुरुषोत्तम धोंडगे व त्यांची पत्नी मनिषाताई धोंडगे उपस्थित होत्या. . या सर्व बाबींची दखल घेऊन लोकशाही न्यूज चॅनलच्या वतीने प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांना दिलेल्या पुरस्कारामुळे कंधार व लोहा तालुक्यात त्यांचे कौतूक होत आहे.




## नारायणा प्रशासकीय सेवा महाविद्यालयच्या वतीने स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,१६ ऑगस्ट -**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक संलग्नित नारायणा प्रशासकीय सेवा महाविद्यालय लोह्याच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेव योजना अंतर्गत श्रमदानाने राष्ट्रपुरुष,स्वातंत्र्य सैनिक यांच्या पुतळे परिसरात स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकानी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून स्व. शांतिदुत गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यान, हुतात्मा स्मारक परिसरात स्वच्छता मोहीम राबवून जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी कै. भाई केशवराव धोंडगे, राष्ट्रपुरुष वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून परिसर स्वच्छ सुंदर ठेवण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या मोहिमेत नारायणा प्रसाकिय सेवा महाविद्यालयातिल प्राचार्य शिवाजी केंद्रे, प्रा. प्रवीण मुंडे, प्रा. महेश टाकणखार, प्रा. नबील नवाब, प्रा. रितेश बोरोळे तसेच सुमन केंद्रे मॅडम व कांता केंद्रे सोबतच महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न केला.

## श्री सुभाष शुगर व शिऊर कारखाना येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,१४ ऑगस्ट -**

श्री. सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी ता. हदगाव व शिऊर साखर कारखाना म. वाकोडी ता. कळमनुरी या दोन्ही कारखान्यांमध्ये स्वतंत्र्याच्या दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांच्या मुलांपैकी गुणवंत विद्यार्थ्यांचा कारखाना व्यवस्थापनाच्या वतीने प्रशस्तीपत्र व रोख रक्कम आणि साखर बॅग देऊन गौरव करण्यात आला तर या गौरव वितरणाचे यंदाचे हे चौथे वर्ष होते.

स्वातंत्र्याच्या दिनानिमित्त श्री. सुभाष शुगर या साखर कारखान्याच्या प्रांगणात दीपक शंकरराव पवार ( टर्नर ) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच शिऊर साखर कारखाना वाकोडी ता. कळमनुरी येथे शेख सय्यद शेख वाहिद यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला श्री. सुभाष शुगर कारखाना हडसणी व शिऊर साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख यांच्या संकल्पनेतून आपल्या कारखाना कर्मचाऱ्यांच्या मुला-मुली पैकी जे विद्यार्थी दहावी व बारावी मध्ये चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले त्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने स्वातंत्र्यदिनी सन्मान करण्याची सलग चार वर्षाची परंपरा कायम राखली आहे. या गौरव सोहळयात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, रोख ५००० रु. आणि साखर बॅग देऊन सन्मान करत असतात त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री सुभाष शुगर कारखानाच्या प्रांगणात पार पडलेल्या कार्यक्रमात जनरल मॅनेजर राजेश मानधना , मधुकर पतंगे, हेडे, गीते, अविनाश सूर्यवंशी, गावंडे ,शेतकी अधिकारी किशोर वानखेडे तसेच शिऊर साखर कारखाने येथे पण त्याचप्रमाणे कार्यक्रम पडला यावेळेस जनरल मॅनेजर संभाजी नातू ,सोमापा, दोन्ही कारखान्यात सदरील कार्यक्रमाच्या वेळी सर्व अधिकारी कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

# 'शक्तीपीठ' मार्ग स्थगितीसाठी बंटी पाटलांची भेट; जिल्ह्यातील कृती समिती सोबत चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,१६ ऑगस्ट -**

नागपूर गोवा शक्तीपीठ मार्ग उभारणीसाठी भाजप शिंदे सरकारच्या हालचाली वाढल्या असून जवळपास ८४ हजार कोटी रुपये खर्चून महामार्ग उभारला जाणार आहे. नांदेड जिल्ह्यातील जवळपास सहाशे हेक्टर सुपीक तर मराठवाड्यातील अडीच हजार हेक्टर जमीन यामध्ये अधिग्रहित होणार आहे. त्यामुळे नागपूर ते कोल्हापूर या प्रस्तावित रस्त्यावरील सर्वच शेतकरी महामार्गाच्या विरोधात उभे असून पश्चिम महाराष्ट्रात या आंदोलनाचे प्रमुख आ. सतेज उर्फ बंटी पाटील नांदेड येथे आले असता स्थानिक शेतकरी व कृती समितीने भेट घेत रस्त्याच्या स्थगितीसाठी काय काय करता येईल यावर विस्तृत चर्चा केली.

बंटी पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच विधिमंडळात शेतकऱ्यांना देशोधडीला लावू पाहणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा अशी प्रखर भूमिका मांडली. तसेच पाटील पश्चिम महाराष्ट्रात शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात असलेल्या शेतकऱ्यांना नेतृत्व दिल्याने तेथील शेतकऱ्यांचा आवाज सरकारच्या कानावर गेला आहे. मराठवाड्यातील आंदोलन आणि रणनीती ठरविण्यासाठी शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे संयोजक संगमनाथ आवर्डे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे हनुमंत राजेगोरे, प्रा. संदीपकुमार देशमुख, धोंडिबा कल्याणकर, सुभाष मोरलवार, आनंदा देशमुख, नवनाथ कऱ्हाळे, गोविंद घाटोळ, शहानंद मुधोळ यांनी बंटी पाटील यांच्या सोबत भरत इ स्केअर येथे भेट घेत चर्चा केली.

**शक्तीपीठ मार्ग गोव्याच्या भल्यासाठी: प्रा. संदीकुमार बारडकर**

नागपूर - गोवा शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्र लुटून गोव्याच्या भल्यासाठी उभा करण्यात येणारा मार्ग होय. सरकारच्या ठेकेदारांची यातून चांदी होणार असून शेतकऱ्यांच्या घरादारावर नांगर फिरवला जाणार आहे. देवाला जाण्यासाठी अनेक महामार्ग असतांना येथील तरुण गोव्यात लवकरात लवकर पोहोचावा म्हणजेच केवळ गोव्याच्या भल्यासाठी, तेथील दारू व्यावसायिक, मटका, आणि केसिनो वाल्यांना मालामाल करण्यासाठी हा रस्ता उभा केला जाणार आहे. तो रस्ता रद्द होणे आवश्यक असून शेतकरी वाचविण्यासाठी मोठे जनानोंदलन करण्याचा इशारा प्रा. संदीपकुमार देशमुख बारडकर यांनी दिला आहे.



CMYK

लातूर
# दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## निलंगा येथे अवयव दान रॅलीचे आयोजन




**निलंगा, दि. १६ ऑगस्ट-**
जागतिक अवयव दान दिनाच्या निमित्ताने निलंगा येथील महाराष्ट्र फार्मसी कॉलेज आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने अवयव दान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, वैद्यकीय व्यावसायिकांनी आणि स्थानिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होवून रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे उदघाटन प्राचार्य डॉ. भगवत पौळ, प्राचार्य डॉ. सिध्देश्वर पाटील, डॉ. वडवणे यांच्या हस्ते झाले. उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. सय्यद, डॉ. बिट्टे , समुपदेशक ए. ए. पठाण, जाधव सिंधू, लॅब टेक्नीशियन लोंढे, एल.ए.सी. कर्मचारी खुडके सिस्टर, झरे सिस्टर आणि रुग्णवाहिका चालक प्रदीप कदम यांची उपस्थिती होती. रॅलीत बी.फार्म व डी.फार्मचे अनेक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅली आयोजनासाठी डॉ. अमोल घोडके आणि डॉ. सुनील गारड यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.



## संक्षिप्त वृत्त



### जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये घेण्यात आली तिरंगा प्रतिज्ञा

**लातूर, दि. १६ ऑगस्ट-**
हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान लातूर जिल्ह्यात मोठ्या उत्साहपूर्ण सुरू आहे. या अभियानांतर्गत आज जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी संबंधित कार्यालयाचे प्रमुख व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. जिल्ह्यात ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ९ ऑगस्ट रोजी सकाळी तिरंगा यात्रेने या अभियानाला सुरुवात झाली. त्यानंतर निबंध स्पर्धा, तिरंगा रॅली, घरोघरी आणि कार्यालयांवर तिरंगा लावणे आदी उपक्रम आयोजित करण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानांतर्गत १४ ऑगस्ट रोजी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांमध्ये तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. या उपक्रमामध्ये अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.



### जागृती कारखान्यावर लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृती दिनानिमित्त वृक्षारोपण

**लातूर, दि. १६ ऑगस्ट-**
राज्यात खासगी साखर कारखान्यात सर्वाधिक उस उत्पादक शेतकऱ्यांना भाव देणाऱ्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर कारखान्यावर लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त कारखान्याच्या वतीने बुधवारी अधिकारी कर्मचारी कामगार यांनी एकत्र येऊन स्मृतीस्थळाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच कारखाना परिसरात वृक्षा रोपण करण्यात आले. यावेळी जागृती शुगरचे सरव्यवस्थापक गणेश येवले, मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, डिस्टलरी इनचार्ज विलास पाटील, डे.चीफ इंजिनियर अक्षयकुमार सुर्यवंशी, डे. चीफ केमिस्ट ज्ञानेश्वर जाधव यांच्या सह विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी कामगार मोठया प्रमाणावर उपस्थित होते.




### कला खेळातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व घडवावे : धनंजय कुलकर्णी-तुंगीकर

**लातूर, दि. १६ ऑगस्ट-**
स्वातंत्र दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी गुणवत्तेबरोबरच कला आणि खेळामधून व्यक्तिमत्व घडवावे यासाठी शाळा हे उत्तम माध्यम आहे असे मत केशवराज शैक्षणिक संकुल समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी-तुंगीकर यांनी व्यक्त केले. स्वातंत्रदिनाच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य.संजय गुरव विद्यासभा संयोजक.महेश कस्तुरे व मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपस्थित होते. सुरुवातीला स्वातंत्र्यदिनानिमित्त.धनंजय तुंगीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी इयत्ता पाचवी मधील सचिन जाधव, गौरवी पवार, तनिष्का फुटाणे अथर्व उदबुके, अमन पटेल, चैतन्य हसुळे, अनुष्का गुरव, अन्वित माजलगावकर, रोहित बिराजदार, अनुश्री सोळंके, आदर्श भंडारे ,श्रेया बेद्रे ,ओवी जगताप ,तेजस्विनी गायकवाड व इयत्ता आठवी मधील सृष्टी श्रीमंगले, मानसी काटकर, श्रेया कुरमुडे, रुपेश काळे वेदांत शेळगे, अमृता गोस्वामी साईनाथ सुरवसे, अभिनव वडुळकर स्नेहा रणदिवे, आर्या तुगावकर, ऋतुराज माडे, नम्रता पंडित, अक्षता पोटे, श्रावणी चव्हाण, पंकज देमगुंडे, अथर्व लोंढे, प्रणव फड, राधिका बिडवे,अमित गायकवाड,पृथा इटोलीकर, शिवलिंग साकोळकर या शिष्यवृत्तीधारक गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक महादेव गोंदरकर यांनी केले तर निकालाचे वाचन आदिनाथ कदम यांनी केले कार्यक्रम प्रमुख म्हणून प्रज्ञा नाईक.शैलेश सुपलकर यांनी काम पाहिले सामूहिक पद्य सादरीकरण कांचन तोडकर व त्यांचा चमू यांनी केले. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन स्मिता मेहकर यांनी केले. सामुहिक कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लातूर जिल्ह्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा


दैठणा येथील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.


केंद्रीय विद्यालयात चाकूर येथे शिक्षकांचा गौरव करण्यात आला.


लालबहादूर शास्त्री शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आला.

**रामराव पाटील, दैठणा**
दैठणा (ता.शिरूर अनंतपा) येथील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम अनेकांच्या उपस्थितीत पार पडला याप्रसंगी जिल्हा परिषद शाळा दैठणा व रामराव पाटील विद्यालय दैठणा या दोन्ही शाळेने एकत्रितपणे कार्यक्रम घेऊन शिरूर अनंतपाळ तालुक्यामध्ये या दोन्ही शाळेकडून एक आदर्श दाखवून देण्यात आलेला आहे. याप्रसंगी दोन्ही शाळेचा शिक्षक वर्ग व विद्यार्थी मित्र आणि दैठणा गावातील अनेक नागरिक याप्रसंगी उपस्थित असलेले दिसून आले दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या कलागुणांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश पाटील हे विराजमान होते तर या कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी संस्थेचे जेष्ठ संचालक कल्याणराव बिरादार संस्थेचे सचिव व जिल्हा मध्यवर्तीचे संचालक व्यंकटराव बिरादार गणेश पाटील व्यंकटराव मुळे विश्वनाथ तोटे सूर्यभानजी हुले शहाजी कांबळे चंद्रराव बिरादार शिवाजी बिरादार दैठणा गावचे सरपंच शेषरावजी कांबळे उपसरपंच योगेश बिरादार तंटामुक्तीचे अध्यक्ष रामेश्वर बिरादार सुखदेव पाटील विश्वजीत सांगवे व दैठणा येथील समस्त गावकरी वर्ग या सर्वांकडून याप्रसंगी उपस्थिती लावण्यात आली. सूत्रसंचालन विलास हसबेसर, विठ्ठल कदम यांनी केले तर राजीव गुडे यांनी आभार मानले.

**लालबहादूर शास्त्री शाळा, उदगीर**
लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, प्रमुख वक्ते म्हणून म्हणून माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष संतोष कुलकर्णी व माधव केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ स्वंयसेवक षण्मुखानंद मठपती,अर्थ समिती अध्यक्ष गजानन जगळपुरे,मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे,माजी नगरसेवक राजकुमार चव्हाण व अविनाश हेरकर, माजी विद्यार्थीनी ज्योती पाटील पटवारी,बालवाडी अध्यक्षा अंजली नळगीरकर, संतोष जिरोबे, विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी उपस्थित होते. सर्व मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांच्या हस्ते प्रमुख ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सर्व मान्यवरांचे शाळेच्या वतीने गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी केले, सूत्रसंचलन श्याम गौंडगावे यांनी तर,आभार श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी यांनी मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमासाठी,विद्यार्थी, सर्व शिक्षक कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले होते.

**केंद्रीय विद्यालय चाकूर**
केंद्रीय विद्यालय सीमा सुरक्षा बल चाकूर येथे १५ ऑगस्ट २०२४ या स्वतंत्रता दिनी सहायक प्रशिक्षण केंद्राचे महानिरीक्षक विनीत कुमार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य हरीश कटारिया, बावा प्रमुख सहायक प्रशिक्षण केंद्र चाकूरचे नविता शर्मा, मनीषा कटारिया, मुख्याध्यापक गोविंद सूर्यवंशी,मदन पाल सिँह समादेष्टा, डॉ. के.एन.कुमार,मुख्य वैद्यकीय अधिकारी, राजेंद्र सिंघ राठौर डिप्टी कमांडट, अतुल सिंघ सहायक कमांडट व रणधीर सिंघ सहायक कमांडट मान्यवर उपस्थित होते. विद्यालयामार्फत विविध देशभक्ति पर गीत, समूह गीत,भाषण विद्यार्थ्यांनी नृत्य सादरिकरण केले. विद्यालया मार्फत समाजातील दानशुर व्यक्तिंचे व विद्यालय वर्ग दहावी व बारावीचा निकाल १०० टक्के लागला यासाठी विषय शिक्षकाना प्रशंसा प्रमाणपत्र देण्यात आले यात.डॉ.संजय हुडगे, डॉ. श्रीनिवास हसनाले, डॉ. अमोल शिवनगे व मोहिब पठान व शिक्षक पन्नालाल इंगोले व सतीश फुलारी यांना विद्यालयाचे चेअरमन विनीत कुमार, महानिरीक्षक सहायक प्रशिक्षण केंद्र चाकूर यांच्यामार्फत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सर्व कार्यक्रम यशस्वितेसाठी विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी, पालक व बीएसएफ जवानांनी परिश्रम घेतले.


शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, शिरूर अनंतपाळ**
शिरूर अनंतपाळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने पक्ष कार्यालयावर ध्वजारोहण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शिरूर अनंतपाळ तालुक्याचे तालुकाध्यक्ष विठ्ठलराव पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. व प्रतिमेचे पूजन शहर अध्यक्ष अनिल देवगरे यांनी केले. यावेळी पक्ष कार्यालयात प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी यांची तालुका अध्यक्ष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत अब्दुल अजीज मुल्ला तालुका कार्याध्यक्ष यांनी प्रत्येक विकास काम असो की शासकीय कमेट्या असो यामध्ये भाजपचे आ, माजी मंत्री संभाजीराव पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित दादा गट यांच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही की विकास निधीमध्ये सहभाग दिला जात नाही त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते वंचित आहेत, अशी प्रतिक्रिया अनिल देवगरे ,नियोजन सभापती बाळू भाऊ शिवणे ,प्रदेश सचिव शेख महेताब यांनी व्यक्त केली. यामध्ये युवा अध्यक्ष सुरज चव्हाण यांच्याशी विठ्ठल पाटील यांनी दूरध्वनीवरून संपर्क केला असता चव्हाण यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री पवार यांच्या सोबत २० ते २२ तारखेपर्यत संबंधित विकास कामे व कार्यकर्त्याला येणाऱ्या अडचणी, व तालुक्यातील व विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी यांची मुबंई येथे बैठक लावून तोडगा काढू, असे आश्वासन यावेळी दूरध्वनी वरून चव्हाण यांनी दिले. यावेळी अनिल देवंगरे, तालुका कार्याध्यक्ष अब्दुल अजीज मुल्ला, महाराष्ट्र प्रदेश सचिव तुषार मादळे, अल्पसंख्याक प्रदेश सचिव महेताब शेख, अर्थ व नियोजन सभापती . बाळु शिवणे, नगरसेवक . माधव संभाळे, केदार लोंढे, चंद्रकांत कांबळे, संदीप सगरे, औदुंबर शिंदाळकर, सुरेश पाटील आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# लोकनेते विलासराव देशमुख यांचा प्रवास प्रेरणादायी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १६ ऑगस्ट-**
लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख यांचा राजकीय प्रवास हा खरोखरच एक प्रेरणादायी प्रवास होता. एका सामान्य ग्रामीण भागातील तरुणाला राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रातील कॅबिनेट मंत्री बनवणारा हा प्रवास त्यांच्या कर्तृत्वाचे प्रमाण आहे. ग्रामीण भागातील जीवन जगल्यामुळे आदरणीय विलासराव देशमुख यांना शेतकरी आणि त्यांच्या समस्यांची खोलवर जाणीव होती. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून ग्राम विकासाचे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले सिंचन सुविधा, कृषी यांत्रीकरण आणि कृषी पूरक उद्योगांना चालना देऊन कृषी क्षेत्राचा विकास केला.

### विलासबाग बाभळगाव येथे जनसमुदायाच्या उपस्थितीत स्मृतिदिनानिमीत्त आदरांजली अर्पण



लोकनेते विलासराव देशमुख यांना विलासबाग, बाभळगाव येथे प्रारंभी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी पालकमंत्री तथा आ. अमित देशमुख, आमदार धिरज देशमुख, विलास साखर कारखाना चेअरमन वैशाली देशमुख, रीड लातूरच्या संस्थापीका दिपशीखा देशमुख, अभिजीत देशमुख,डॉ.सारिकादेशमुख,जयसींह देशमुख यांनी आदरणीय विलासराव देशमुख यांना पुष्पांजली अर्पण केली. देशमुख कुटूंबियाकडून आदरांजली अर्पन केल्यानंतर क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी आमदार त्र्यंबकराव भिसे, माजी आमदार सुधाकर भालेराव, विचारवंत उल्हास पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे, मुख्यकार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, निवासी जिल्हाधिकारी जळगाव विजयकुमार ढगे, अतिरीक्त पोलीस अधिक्षक अजय देवरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नरे, अविनाश कोरडे, तहसीलदार सौदागर तांदळे, आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अशोकराव पाटील-निलंगेकर, जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव, यांनी आदरांजली अर्पन केली. यावेळी विक्रांत गोजमगुंडे, सर्जेराव मोरे, शाम भोसले, ललीत शहा, ॲड. दिपक सूळ, गणपतराव बाजूळगे, ॲड.व्ही.बी.बेद्रे, यशवंतराव पाटील, जगदीश बावणे, व्हा.चेअरमन लक्ष्मण मोरे, ॲड. समद पटेल, लक्ष्मणराव देशमुख, जितेद्र देहाडे, धिरज पाटील, प्रमोद जाधव, विजय देशमुख, रविंद्र काळे, अनंतराव देशमुख, कल्याण पाटील, अभय सांळूके, प्रशांत पाटील, श्रीपतराव काकडे, शिला पाटील, विदया पाटील, संतोष सोमवंशी, सजीव देसाई, ए.आर. पवार, आर.बी.माने, बी.व्हि. मोतीपवळे, चेअरमन बादल शेख, राजाभाऊ जाधव, युवराज देशमुख, अमरखानापूरे, महादेवजटाळ, राजेश्वर देशमुख, अनुप शेळके, डॉ. अरविंद भाताब्रे, गणेश एसआर देशमुख, कैलास पाटील, संभाजी रेडडी, शिवाजी जवळगेकर, लक्ष्मण कांबळे, गिरीष ब्याळे, लोकमन पत्रकार चंद्रकांत झेरीगुठे, देवीदास जमदाडे, पप्पू देशमुख, व्यंकटेश पूरी, चंद्रशेखर दंडीमे, संतोष देशमुख, हरीभाऊ गायकवाड, रामराजे आत्राम, चंद्रकांत मददे, बकंट पाटील, राजकुमार पाटील, अविनाश देशमुख, गोविंद बोराडे, सुनील पडीले, उपसरपंच गोविंद देशमुख, ॲड. प्रविण पाटील, व्यंकटेश पुरी, रमेश देशमुख, एजाज शेख, बालाप्रसाद बिदादा, इम्रान सय्यद, अनिल चव्हाण, संगीता मोळवणे, चांदपाशा इनामदार, निलेश देशमुख, संजय माने, अशोक अग्रवाल, शाहूराज पवार, शरद देशमुख, प्रदिप राठोड, दिलीप माने, अमर मोरे, दिपक पटाडे, इश्वर चांडक, भारत लाड, गुरुनाथ गवळी, आनंद वैरागे, लालासाहेब देशमुख महाराज, आबासाहेब पाटील उजेडकर, तानाजी फुटाणे, एजाज शेख, सुंदर पाटील कव्हेकर, भैरवनाथ सुर्यवंशी, दिपक राठोड, दिनेश नवगीरे, नागसेन कामेगावकर, बालाजी सांळूके, सुभाष घोडके, मदन भिसे, पंडीत ढमाले, प्रविण सूर्यवंशी, लक्ष्मण पाटील, लिंबराज पवार, नवनाथ काळे, काकासाहेब घुटे, महेश काळे, प्रविण कांबळे, अविनाश बट्टेवार, एन.आर.पाटील, अतुल देऊळगावकर, शफी शेख, ॲड. अंगद गायकवाड, मारुती पांडे, चंद्रकांत देवकते, तानाजी सुर्यवंशी, चंद्रकांत चिकटे उपस्थित होते. याप्रसंगी सुप्रसिद्ध संगीतकार पंडित शौनक यांनी संतवाणी कार्यक्रम सादर केला. त्यांना संजय हिंगणे, पंकज शिरभाने, तुकाराम आव्हाड यांनी संगीत साथ दिली, तर संगीत संयोजन तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी केले. सूत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे यांनी केले.

**विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन**
गुरुवारी, १४ ऑगस्ट रोजी विलासबाग, बाभळगाव येथे भावदर्पण हा कार्यक्रम सादर करण्यात आला. लातूरसह राज्यभरात यानिमित्ताने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांचा १२ वा स्मृतिदिन निमित्ताने बाभळगाव येथील विलासबाग येथे देशमुख कुटूंबिय, मराठवाडयासह राज्यभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी तसेच मोठया जनसमुदायाच्या उपस्थितीत सार्वजनीक आदरांजली वाहण्यात आली.



### स्वातंत्र्यदिनानिमित्त २३ कोटींच्या सुधारणा कामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १६ ऑगस्ट -**
औसा मतदारसंघातील २३ कोटीं रुपयांच्या ४ रस्ते सुधारणा कामाचे तसेच औसा तालुक्यातील ८ मंडळधिकारी व ४७ तलाठी कार्यालय व शासकीय अधिकारी ,कर्मचारी निवासस्थान बांधकामाचा शुभारंभ आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

औसा विधानसभा मतदारसंघातील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामांना कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून कामे पूर्ण करण्यात येत आहेत. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मतदारसंघातील औसा ते औसा तांडा ६ कोटी ५० लक्ष श्रीक्षेत्र गोपाळपूर, औसा ते खानापूर तांडा २ कोटी औसा ते आलमला १० कोटी ५० लक्ष व आलमला रस्त्यावरील सुटलेल्या रस्त्याची पुलासह सुधारणा करणे ४ कोटी या २३ कोटींच्या ४ विकासकामांचे भूमिपूजन आ अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी औसा तालुक्यातील ८ मंडळ अधिकारी व ४७ तलाठी कार्यालय बांधकामासाठी ८ कोटी २५ लक्ष रुपये तर औसा येथील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे करिता निवासस्थान बांधकाम करण्यासाठी १५ कोटी रुपये निधी आ अभिमन्यू पवार यांनी मागे मंजूर करुन आणला होता, सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय व शासकीय निवासस्थान बांधकामाचा यावेळी प्रत्यक्षात शुभारंभ करण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, शहराध्यक्ष सुनील उटगे, माजी नगरसेवक बंडू कोद्रे, अड परिक्षीत अभिमन्यू पवार, बाजार समितीचे संचालक विकास नरहरे, बांधकाम विभागाचे अभियंता रोहन जाधव, गोपाळ धानुरे, लहू कांबळे, इम्रान पटेल, इम्रान सय्यद, अक्रम खान, बांधकाम उपअभियंता साठे, आदी उपस्थित होते. मतदार संघातील चारही रस्ते ग्रामीण भागातील अनेक गावांना औसा शहराशी जोडतात, त्यामुळे कामे पूर्ण झाल्यानंतर औसा शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनाही याचा फायदा होणार आहे. मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय व शासकीय अधिकारी निवासस्थान बांधकाम पूर्ण झाल्यानंतर औसा तालुक्यातील नागरिकांना अधिक सुलभपणे शासकीय सेवा प्रदान करता येणार आहेत.